


# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अमरावती, मंगळवार १० मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




## सोने-चांदीचे दर घसरले

**जळगाव /प्रतिनिधी**-अमेरिका-इजरायल आणि इराण यांच्या मधील युद्धाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये रू पयांची किंमत घसरत चालली आहे. असे असताना सोन्याचे दर वाढतील असा अंदाज वर्तवला जात होता. पण गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या



आणि चांदीच्या दरात घसरण होत असल्याच पाहायला मिळाले. जळगावातील सराफा बाजारात सोन्याची किंमत प्रति तोळा १५०० रू पयांच्या आसपास घसरण नोंदवण्यात आली आहे. मागील दोन दिवसांच्या तुलनेत सोने आणि चांदीच्या दरात मोठी घसरण झाली आहे. आज ९ मार्च रोजीआठवड्याच्या पहिल्याच दिवशी खरेदीदारांना मोठा फायदा झाला आहे. अमेरिका इजरायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर सोने आणि चांदीच्या दरात मोठी वाढ झाली होती. पण आठवड्यात सोन्याच्या दराला पुन्हा एकदा उतरती कळा लागल्याचे दिसतेय. शनिवारच्या तुलनेत आज सोमवारी सराफा बाजारात घसरण पाहायला मिळाली. सोन्याचे दर १,६१००० वरून १,५९ , ५०० रू पयांवर आले आहे. मागील दोन दिवसाच्या तुलनेत सोन्याच्या दरात पंधराशे रू पयांची घसरण झाली आहे. जीएसटीशिवाय सोन्याचे दर १६१००० वरून १५९५०० वर खाली आले आहेत. तर चांदीच्या दरात ही दोन दिवसात दोन हजार रू पयांची घसरण होउन चांदीचे दर जीएसटी २६८००० हजार रूपयांवरून २६६००० वर खाली आले आहेत.

## उष्णतेची लाट; तापमान 41 अंश पार

**मुंबई / प्रतिनिधी-**महाराष्ट्रात सध्या उष्णतेचा पारा झपाट्याने वाढत चालला आहे. होळी सण पार पडल्यानंतर तापमानात आणखी वाढ झाली आहे.



सोमवारी ९ मार्च रोजी हवामान खूप गरम होते. दुपारच्या वेळी सूर्याचा प्रकोप जाणवला. राज्याचे कमाल तापमान सुमारे ४१ अंश सेल्सियसच्या वर गेले आहे. त्यामुळे उष्णतेची तीव्रता जास्त जाणवू शकते. नागरिकांनी शक्यतो दुपारच्या वेळेत बाहेर जाणे टाळावे, असा सल्ला देण्यात आला आहे. जास्त वेळ उन्हात राहिल्यास उष्माघात, डोकेदुखी किंवा चक्कर येण्यासारख्या समस्या होउ शकतात. त्यामुळे बाहेर पडताना टोपी, छत्री किंवा स्कार्फचा वापर करावा. हलके आणि सैल सूती कपडे घालावेत. दिवसभर पुरेसे पाणी पिणे, लिंबूपाणी, ताक किंवा नारळपाणी पिणेही आरोग्यासाठी चांगले ठरेल. लहान मुले, वयोवृद्ध आणि आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. दुपारच्या वेळेत शक्यतो घरात किंवा सावलीत राहण्याचा प्रयत्न करावा. बाहेर काम करणा-या लोकांनी मध्ये मध्ये विश्रांती घ्यावी. तसेच उन्हात जास्त वेळ राहिल्यास डोळ्यांचे संरक्षण करण्यासाठी गॉगलचा वापर करावा. शरीरात पाण्याची कमतरता होउ नये यासाठी वारंवार पाणी पिणे आवश्यक आहे.

## इराण-इस्त्रायल युद्धाच्या झळा स्मशानभूमीला

### पुण्यातील गॅस दाहिन्या बंद

**पुणे /प्रतिनिधी-** इस्त्रायल आणि इराणमध्ये गेल्या काही दिवसांपासून महायुद्ध सुरु आहे. दोन्हीकडून एकमेकांना दमदार प्रत्युत्तर दिले जात आहे. शनिवारी इराणच्या मोठ्या तेल शुद्धीकरणाच्या प्रकल्पावर हल्ला करण्यात आला या हल्ल्यामुळे मोठा भडका उडाला. या युद्धाची झळ



भारतवासियांना देखील बसली आहे. भारतात घरगुती गॅसचा तुटवडा जाणवू लागला आहे. अलीकडेच गॅस बुकिंगच्या नियमांमध्ये बदल करण्यात आले. त्यानंतर आता पुणे शहरातील समशानभूमीच्या महानगरपालिकेच्या गॅस आधारित विद्युत दाहिन्या तात्पुरत्या बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. भारत सरकारच्या अधिपत्याखालील पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने जारी केलेल्या आदेशानुसार, देशभरात उपलब्ध असलेल्या प्रोपेन व ब्यूटेन या घटकांचा वापर प्रामुख्याने घरगुती एलपीजी पुरवठ्यासाठी प्राधान्याने करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. गॅस उपलब्धतेमध्ये तुटवडा निर्माण झाल्यामुळे पुढील आदेश येईपर्यंत आहेत. नागरिकांची गैरसोय होउ नये यासाठी विद्युत दाहिनी व अढऊ प्रणालीवर आधारित दाहिन्या सुरू ठेवण्यात येणार आहेत.वैकुंठ स्मशानभूमी येथे कार्यरत असलेल्या तीन गॅस दाहिन्या तात्पुरत्या बंद राहतील. त्याऐवजी नागरिकांच्या सोयीसाठी तेथील पाच विद्युत दाहिन्या कार्यरत ठेवण्यात येणार आहेत. अशी माहिती पुणे महानगरपालिकेच्या विद्युत विभागामार्फत देण्यात आली आहे. आखातातील युद्धामुळे पेट्रोलियम पदार्थांची पुरवठा साखळी खंडित होण्याची स्थिती उद्भवू शकते. त्यामुळे स्थानिक पातळीवर पेट्रोल- डिझेलचा तुटवडा निर्माण होउ शकतो. पेट्रोल- डिझेल अत्यावश्यक सेवेत येते. आपात्कालीन परिस्थितीमध्ये अत्यावश्यक सेवा पुरविणा-या शासकीय वाहनांना इंधन तुटवडा निर्माण होणार नाही.

# इराण युद्धावर दोन्ही सभागृहांत गदारोळ

## चर्चेची मागणी: सरकारने म्हटले-अध्यक्षांना हटवण्याच्या प्रस्तावावर चर्चेसाठी तयार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुस-या टप्प्याच्या पहिल्या दिवशी लोकसभा आणि राज्यसभेत अमेरिका-इस्त्रायल आणि इराण युद्धावर जोरदार चर्चा झाली. विरोधकांनी पश्चिम आशियातील युद्धोत्तर परिस्थितीवर चर्चा करण्याची मागणी केली. दरम्यान, परराष्ट्रमंत्र्यांनी प्रथम राज्यसभेत आणि नंतर लोकसभेत आखाती देशांमधून भारतीयांच्या परतीच्या तयारी आणि उर्जा संकटाबद्दल भाष्य केले.







राज्यसभेत विरोधी पक्षांनी सभात्याग केला. जयशंकर म्हणाले, 'सध्या इराणच्या नेतृत्वाशी संपर्क साधणे कठीण आहे, परंतु भारत शांतता आणि संवादाच्या बाजूने आहे.' लोकसभेतही विरोधी पक्षांनी परराष्ट्रमंत्र्यांना बोलण्यापासून रोखले. त्यांच्या भाषणादरम्यान त्यांनी गोंधळ घातला. खासदारांनी 'आम्हाला चर्चा हवी आहे' अशी घोषणाबाजी केली.

दरम्यान, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना हटवण्याच्या मागणीच्या विरोधकांच्या प्रस्तावावरील चर्चेत गदारोळ झाला. केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू म्हणाले, 'आम्ही चर्चेसाठी तयार आहोत. तुम्ही त्यावर चर्चा करू शकता.'परराष्ट्र मंत्र्यांनी सांगितले- ६७,००० नागरिक आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून आले आहेत.मुंबईच्या शिपिंग डायरेक्टरेट जनरलने १४ जानेवारी रोजी भारतीय खलाशांना सांगितले होते की त्यांनी दूतावासाच्या सल्ल्याचे पालन करावे आणि अनावश्यकपणे किना-यावर ये-जा करणे टाळावे.पश्चिम आशियातून आपल्या लोकांना परत आणण्याचे पूर्ण प्रयत्न केले जात आहेत. ८ मार्चपर्यंत आपले सुमारे ६७,००० नागरिक आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून आले आहेत.संबंधित मंत्रालये प्रतिसाद देण्यासाठी समन्वय साधत आहेत. युद्ध सतत वाढत आहे. या भागात सुरक्षा परिस्थिती खूपच बिघडली आहे. खरे तर, युद्ध इतर देशांमध्येही पसरले आहे. यामुळे विनाश आणि मृत्यू वाढत आहेत.इस्त्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यात युद्ध सुरू आहे, इतकेच नव्हे तर काही आखाती देशांवरही हल्ले झाले आहेत. इराणमध्ये नेतृत्वाच्या स्तरावर अनेक लोक मारले गेले आहेत, तसेच या भागात पायाभूत सुविधाही उद्ध्वस्त झाल्या आहेत.यावेळी नेतृत्व स्तरावर इराणसोबत संपर्क साधणे स्पष्टपणे कठीण आहे. इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांनी इराणी युद्धनौका लावनला कोची बंदरावर नांगरण्याची परवानगी दिल्याबद्दल भारताचे आभार मानले आहेत.

**काँग्रेस खासदाराने विचारले - सरकार चर्चेपासून का पळत आहे?**

काँग्रेस खासदार डा. सय्यद नसीर हुसेन म्हणाले, 'आम्हाला पश्चिम आशियातील संकट आणि त्यामुळे निर्माण झालेल्या उर्जा संकटावर थोडक्यात चर्चा हवी होती. असे दिसते की अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आमचे ब?स बनले आहेत, ते आम्हाला कोणाकडून तेल खरेदी करायचे हे सांगत आहेत. ही परिस्थिती का उद्भवली आहे? आम्हाला भारताचे परराष्ट्र धोरण, उर्जा संकट निवारण आणि भारतीयांच्या सुरक्षिततेवर चर्चा करायची आहे. निवेदने देण्यात काही अर्थ नाही, कारण आम्ही सरकारला कोणतेही प्रश्न विचारू शकत नाही. सरकार चर्चेपासून का दूर जात आहे?' पश्चिम आशिया वादावर भाजप खासदार आणि माजी परराष्ट्र सचिव हर्ष श्रृंगला म्हणाले, 'परराष्ट्र मंत्री जयशंकर यांनी राज्यसभेत स्वतःहून निवेदन दिले आहे. त्यांचे विधान या मुद्द्यावर सरकारची भूमिका पूर्णपणे स्पष्ट करते. सरकार परिस्थितीवर लक्ष ठेवेल.'

**अखिलेश यादव म्हणाले -** भारताच्या परराष्ट्र धोरणावर चर्चा करणे आवश्यक आहे. समाजवादी पक्षाचे खासदार अखिलेश यादव म्हणाले, 'आपण कोणाकडून तेल खरेदी करायचे हे अमेरिका ठरवत आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणावर संसदेत चर्चा झाली पाहिजे.'लोकसभा अध्यक्ष जगदंबिका पाल म्हणाले, 'मी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना विचारतो की, तुम्ही जे करत आहात त्यातून देशाला काय फायदा होईल? आजचा प्रस्ताव विरोधी पक्षाने आणला होता. सरकार त्यावर चर्चा करण्यास तयार आहे. पण तुम्ही लोक आजच्या अजेंड्याबद्दल गंभीर नाही.' ओम बिर्ला म्हणाले आहेत की ते अध्यक्षपदावर बसणार नाहीत, पण तुम्ही चर्चेत भाग घेत नाही आहात. हा विरोधकांचा बेजबाबदारपणा आहे. जेव्हा तुम्हाला बोलण्यासाठी आमंत्रित केले जाते तेव्हा तुम्ही बोलत नाही आहात. विरोधी पक्ष त्यांना हवे तेव्हा सभागृह चालवू शकतो. अध्यक्ष तुम्हाला तसे करण्याची परवानगी देत आहेत. वेणुगोपालजी, मी तुम्हाला सांगतो की पंतप्रधान राजीव गांधी म्हणाले होते की या सभागृहाची एक महान परंपरा आहे आणि तुम्ही त्यांच्याशी सहमत असलात किंवा नसलात तरी ते सभापतींना प्रश्न विचारू शकत नाहीत. यानंतर, कामकाज दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

## घरगुती सिलेंडरची बुकिंग आता 25 दिवसांनी होईल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकारने घरगुती एलपीजी सिलेंडरच्या रिफिल बुकिंगच्या नियमांमध्ये बदल केला आहे. आता ग्राहक एक सिलेंडर बुक केल्यानंतर दुसरा सिलेंडर २१ दिवसांऐवजी २५ दिवसांनंतरच बुक करू शकतील. म्हणजेच, सरकारने रिफिल बुकिंगचा किमान प्रतीक्षा कालावधी ४ दिवसांनी वाढवला आहे.मध्य पूर्वेतील तणावाच्या पार्श्वभूमीवर सरकारने गॅसची साठेबाजी रोखण्यासाठी आणि सर्व ग्राहकांना समान पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी हे पाउल उचलले आहे. सरकारी सूत्रांनी वृत्तसंस्था पीटीआय (PTI) ला ही माहिती दिली आहे. सरकारी सूत्रांनुसार, गेल्या काही काळापासून असे दिसून येत होते की, गरज नसतानाही लोक सिलेंडर बुक करून साठा करत होते. प्रतीक्षा कालावधी २५ दिवस केल्याने अनावश्यक बुकिंगला आळा बसेल. यामुळे ज्यांना खरोखर गरज आहे, त्यांना सहजपणे सिलेंडर मिळू शकेल.

**पेट्रोल-डिझेलच्या किमती सध्या स्थिर राहतील-**सरकारी सूत्रांनुसार, पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये सध्या वाढ होण्याची शक्यता नाही. अधिका-यांचे म्हणणे आहे की, जोपर्यंत



आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत १३० डालर प्रति बॅरलच्या पुढे जात नाही, तोपर्यंत देशांतर्गत बाजारात किमती स्थिर राहतील. सध्याच्या अंदाजानुसार, कच्चे तेल १०० डालर प्रति बॅरलच्या आसपास राहण्याची अपेक्षा आहे.

**देशात इंधनाची कोणतीही कमतरता नाही-**इंधनाच्या पुरवठ्याबाबत सरकारने स्पष्ट केले आहे की, देशातील कोणत्याही पेट्रोल पंपावर तेलाची टंचाई नाही. पुरवठा साखळी पूर्णपणे सामान्य आहे. भविष्यातील कोणत्याही संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी भारताने 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' व्यतिरिक्तइतर मार्गांनी कच्च्या तेलाची खरेदी (सोर्सिंग) वाढवली आहे. यामुळे सागरी मार्गात कोणत्याही तणावाच्या स्थितीत पुरवठ्यात अडथळा येणार नाही.

**एव्हिएशन टर्बाइन इंधनाचाही पुरेसा साठा-**विमानांमध्ये वापरल्या जाणा-या एव्हिएशन टर्बाइन फयुएल म्हणजेच ॠक्क बाबतही सरकारने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. अधिका-यांनी सांगितले की, देशाकडे ॠक्क चा पुरेसा साठा आहे आणि घाबरण्याची गरज नाही. भारत केवळ ॠक्क चा उत्पादक नाही, तर तो निर्यातही करतो. त्यामुळे विमान सेवांवर कोणताही परिणाम होणार नाही.

**इतर देश भारताकडून सल्ला मागत आहेत-**उर्जा व्यवस्थापनाच्या बाबतीत भारत जगातील अनेक देशांपेक्षा चांगल्या स्थितीत दिसत आहे. सरकारी सूत्रांनी सांगितले की, बदलत्या जागतिक परिस्थितीत भारताची तयारी पाहून अनेक देशांनी नवी दिल्लीशी संपर्क साधला आहे. त्यांना भारताचे स्टॉक व्यवस्थापन आणि पुरवठा साखळीची रणनीती समजून घ्यायची आहे.

## मुख्यमंत्र्यांकडून भारतीय संघाचे कौतुक

**मुंबई/प्रतिनिधी :**भारतीय क्रिकेट संघाने काल अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी मैदानावर झालेल्या टी२० विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात न्यूझिलंडचा पराभव केला. याबरोबरच भारताने सलग दुस-यांदा टी-२० विश्वचषकाचे जेतेपद पटकावले. ३ वेळा टी-२० विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिला संघ ठरला आहे.



यानंतर सर्व स्तरातून भारतीय संघाचे कौतुक केले जात आहे. यादम्यान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील भारतीय संघाचे अभिनंदन केले आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आयसीसी टी२० वर्ल्ड चॅम्पियनशीपमध्ये पुन्हा एकदा भारतीय संघाने भारताचा तिरंगा झेंडा फडकवला आहे. भारत पुन्हा चॅम्पियन झालेला आहे, काल अनेक रेकार्ड तोडत ज्या प्रकारे न्यूझीलंडचा पराभव भारताने केला, टी२० सामन्यांच्या इतिहासात फायनलमध्ये अशा प्रकारचा स्कोअर करणं आणि समोरच्या टीमला अशा प्रकारे गारद करणं हे देखील नवीन रॅकार्ड आहे.काल संजू सॅमसन, अभिषेक शर्मा यांनी ज्या प्रकारे बॅटिंग केली त्यामुळे एक अतिशय सालिड फाऊंडेशन भारताला मिळालं. बालिंगमध्येही जसप्रीत बुमराह यांनी ज्या प्रकारे पूर्ण सिरीजमध्ये, अतिशय इकानामीने बालिंग केली. कालही त्यांनी ज्या प्रकारे न्यूझीलंडच्या टीमला गारद केलं, ते विलक्षण अशी बालिंग आपल्याला पाहायला मिळाली. अर्थात एकूणच टीमचा परफार्मन्स उत्तम राहिला आहे. केवळ एक सामना आपण हारलो, बाकी कुठल्याच सामन्यात आपण पराजित झालो नाही. एक स्पष्ट विजय आपल्या संघाने मिळवला आहे. त्यामुळे सूर्यकुमार यादव आणि संपूर्ण टीम या सर्वांचं मी मनापासून अभिनंदन करतो. आपल्या मुंबईच्या खेळाडूंनी देखील या टीममध्ये उत्तम खेळ केला, त्यामुळे शिवम, सूर्या अलकीव या सगळ्यांचे मी अतिशय मनापासून अभिनंदन करतो असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## मुलींना शाळेतच मिळणार स्वसंरक्षणाचे धडे

**मुंबई/प्रतिनिधी :** येत्या जून महिन्यापासून मुलींना शाळेतच स्वसंरक्षणाचे धडे मिळणार असल्याची घोषणा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली. यावेळी त्यांनी कमवा व शिका योजनेतून विद्यार्थ्यांना दरमहा २ हजार मानधन देण्याचीही घोषणा केली आहे. जागतिक महिला दिनानिमित्त सांगलीत आज कन्या सबलीकरण उपक्रमांतर्गत मोफत सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. या उपक्रमांतर्गत कराटे प्रशिक्षण घेतलेल्या जवळपास १ हजार मुलींना मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते यलो बेल्ट ग्रेड प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी बोलताना मंत्री पाटील म्हणाले, महिला सबलीकरणासाठी केवळ महिलांनीच नव्हे तर सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. सांगली जिल्ह्यात महिला सबलीकरणासाठी आम्ही एक नवा प्रयोग केला. त्यात ५० शाळांमधील ३६ हजार मुलींना दर आठवड्याला शनिवारी १ तास कराटे व ज्युडोचे प्रशिक्षण दिले. त्यातील १५ हजार ५०० मुलींना आज आम्ही पहिला यलो बेल्ट दिला. त्यापुढचे बेल्ट मिळवण्यासाठी जे शुल्क द्यावे लागेल ते प्रशासन देईल. येत्या जून महिन्यापासून प्रत्येक शाळेत मुलींना स्वसंरक्षणासाठी लाठ्याकाठ्याचे प्रशिक्षण मिळेल. सद्यस्थितीत राज्यातील विविध महाविद्यालयांत शिकणा-या ५ लाख मुलींना सध्या क?लेज फी लागत नाही. वसतिगृह शुल्क लागत नाही. याशिवाय त्यांना कमवा व शिका योजनेंतर्गत दरमहा २ हजार रुपयांचे मानधनही देण्यात येईल, असे ते म्हणाले. यावळी खासदार विशाल पाटील यांच्यासह आमदार इद्रिस नायकवडी, जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलिस अधीक्षक संदीप घुगे यांच्यासह इतर अधिकारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.




# विश्वचषकाचा विजयी जल्लोष, अनेक ठिकाणी गालबोट

## सांगली, अकोला, पुणे आणि अमरावतीमध्ये दगडफेकीच्या घटनांमुळे तणाव

**पुणे/प्रतिनिधी :** टीम इंडियाने आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा ९६ धावांनी धुव्वा उडवत नवा इतिहास रचला आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारताने विजय मिळवत विजेतेपदावर नाव कोरले. या ऐतिहासिक विजयानंतर संपूर्ण महाराष्ट्र आनंदाने न्हाउन निघाला. मात्र या जल्लोषाला काही ठिकाणी गालबोट लागल्याच्या घटना समोर आल्या आहेत. एकीकडे सर्वत्र विश्वविजेतेपदाचा जल्लोष सुरु असताना दुसरीकडे महाराष्ट्रातील सांगली, पुणे, अकोला आणि अमरावतीमध्ये तणावाच्या घटना समोर आल्या आहेत.

**■ सांगलीत फटाक्यांच्या आतिषबाजीमुळे मोठी दुर्घटना**

सांगलीच्या मिरजेतील लक्ष्मी मार्केट परिसरात विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी हजारो नागरिक जमले होते. सुरु वातीला शांततेत चाललेल्या या जल्लोषात काही तरु णांनी हुल्लडबाजी सुरु केली. पोलिसांनी वारंवार सूचना देउनही गोंधळ थांबत नसल्याने अखेर पोलिसांनी सौम्य लाठीमार करत गर्दीला पांगवले. यामुळे काही काळ परिसरात तणाव निर्माण झाला होता. तर दुसरीकडे, सांगली शहरात मारुती चौकात फटाक्यांच्या आतिषबाजीमुळे एक मोठी दुर्घटना टळली. आतिषबाजीची ठिणगी एका दुकानाच्या छतावर साचलेल्या पालापाचोळ्यावर पडल्याने अचानक आग लागली. मात्र, लागलीच आगीवर नियंत्रण मिळवले. ज्यामुळे मोठी वित्तहानी टळली.

**■ अकोल्यात फटाके फोडण्यावरून दोन गटांत वाद**

अकोल्यातील हरिहरपेठ भागात परिस्थिती गंभीर बनली होती. टी-



२० विश्वचषकातील विजयानंतर फटाके फोडण्यावरून दोन गटांत वाद झाला. याचे रूपांतर भीषण दगडफेकीत झाले. सोनटक्के प्लाट आणि गाडगेनगर भागात दोन गट आमनेसामने आल्याने चारचाकी वाहनांची तोडफोड करण्यात आली. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. यात २ ते ३ नागरिक आणि काही पोलीस कर्मचारी किरकोळ जखमी झाले आहेत. अतिरिक्त पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. तर दोषींवर गुन्हे दाखल करण्यासाठी सध्या कोंबिंग ऑपरेशन सुरू आहे.

**■ पुण्यात हुल्लडबाजी**

पुण्यातील प्रसिद्ध फर्ग्युसन रोडवर म्हणजेच ऋङ्क रोडवर तरुणांनी विजयोत्सव साजरा करताना मोठ्या प्रमाणात हुल्लडबाजी केली. तरुणाईची अलोट गर्दी आणि हुल्लडबाजीमुळे वाहतूक कोंडी झाली होती. अखेर पोलिसांनी बळाचा वापर करत तरु णांना पांगवल्याचे पाहायला मिळाले.

**■ अमरावतीत अंगावर फटाके फोडले-**तसेच अमरावती शहरातील राजकमल चौकात काही तरु णांनी चक्क एकमेकांच्या अंगावर फटाके फेकत जल्लोष केला. या जीवघेण्या प्रकारामुळे पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत मोठा बंदोबस्त तैनात केला. त्यानंतर गर्दी पांगवली.

**■ धुळे, भंडा-यात फटाक्यांची आतिषबाजी**

त्यासोबतच धुळे शहरात तरुणांनी ढोल-ताशांच्या गजरावर आणि डीजेच्या तालावर नाचत विजयाचा आनंद लुटला. तर भंडा-यातील मुस्लिम लायब्ररी चौकात क्रिकेट प्रेमींनी मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतिषबाजी करत भारतीय संघाला शुभेच्छा दिल्या.

# अचलपूर बस स्थानकाचे बांधकाम तत्काळ थांबविण्यासाठी पुरातत्व विभागाची नोटीस

## बांधकामास परवानगी न घेतल्याचा दिला ठपका

**अचलपूर/प्रतिनिधी-** अचलपूर शहरातील बस स्थानक पुनर्बांधणीचे काम प्रगतीपथावर आहे .पण पुरातत्व विभाग नागपूरने अचलपूर शहरातील बस स्थानकाचे बांधकाम तात्काळ थांबवण्यासाठी परतवाडा बस आगाराचे आगार प्रमुख यांना नोटीस बजावलेली आहे. जीवनपुरा गेट ऐतिहासिक परकोट पासून १२८ मीटर परिसरातील हद्दीत सुरू असलेल्या अचलपूर बस स्थानकाचे बांधकामास परवानगी न घेतल्याचा ठपका सुद्धा पुरातत्त्व विभाग नागपूरने या नोटीस च्या माध्यमातून ठेवला आहे. यामुळे ते बांधकाम अवैध असल्याचा पुरातत्त्व विभागाचा नोटीस वर उल्लेख असल्यामुळे परतवाडा आगार प्रमुखांना या संदर्भात लेखी अहवाल व खुलासा पुरातत्व विभाग नागपूरने मागितला आहे . त्यामुळे गेल्या ४० वर्षापासून त्या जागेवर अचलपूर बस स्थानक असताना नेमकी ती जागा कोणाची आहे ? याबाबत अनेक प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. दुसरीकडे अचलपूर शहरातील ऐतिहासिक परकोट भिंत नामशेष होण्याच्या मार्गावर असताना पुरातत्व विभाग नागपूरने कोणतीही दखल व उपाय योजना राबवलेली नाही. आणि अचलपूर शहरातील नागरिकांसाठी गेल्या ४० वर्षानंतर भव्य दिव्य बस स्थानक निर्माण होत असताना ही बजावलेली नोटीस संदर्भात तिव्र रोष नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे .

अमरावती जिल्ह्यात नव्हे तर संपूर्ण विदर्भात ऐतिहासिक शहर म्हणून अचलपूर शहराला ओळखले जाते .गेल्या ३५ ते ४० वर्षांपूर्वी



जीवनपुरा गेट जवळ अचलपूर शहरात भव्य - दिव्य बस स्थानकाची निर्मिती करण्यात आली होती. पण परतवाडा शहरात सुद्धा बस स्थानक निर्माण झाल्याने विविध कारणामुळे हे बस स्थानक इतिहासात जमा होण्याच्या मार्गावर होते. यामुळे पुन्हा या बसस्थानकाला नव संजीवनी मिळावी यासाठी शासनाकडून जवळपास साडेचार कोटीच्या निधीतून भव्य दिव्य बस स्थानक इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे . अचलपूर शहरातील नागरिक व प्रवासी वर्गांना बाहेरगावी जाण्यासाठी विविध बसेस फे-या इथून उपलब्ध होणार आहे .आणि आर्थिक भुर्दंड सहन करून परतवाडा बस आगारात जावे लागणार नाही. मात्र यावर्षी फेब्रुवारी महिन्यात भारतीय पुरातत्व सर्वेक्षण अधीक्षक कार्यालय नागपूर विभागाकडून परतवाडा बस आगार प्रमुखांना नोटीस बजावण्यात आली .या मध्ये नमूद करण्यात आले की , अचलपूर शहरातील जीवनपुरा गेट जवळ बस स्थानकाचे निर्माण कार्य सुरू आहे .जीवनपुरा गेट ऐतिहासिक परकोट असून १२८ मीटर मध्ये या बस स्थानकाचे काम सुरू असल्याने १९५८ खंड २० क नुसार सक्षम प्राधिकारी क्षेत्रीय निरीक्षक पश्चिम क्षेत्र भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण मुंबई राष्ट्रीय स्मारक प्राधिकरण सायन फोर्ट पूर्व ची कोणती ही अनुमती घेतलेली नाही. यामुळे नियमाचे उल्लंघन झाल्याने कारवाई करण्याचा इशारा सुद्धा या नोटीस द्वारे देण्यात आलेला आहे .आणि येत्या सात दिवसात या बांधकाम संदर्भात लेखी खुलासा सुद्धा परतवाडा आगार प्रमुखांकडून भारतीय पुरातत्त्व विभाग नागपूरने नोटीसद्वारे मागितलेला आहे. व तत्काळ अचलपूर बस स्थानकाचे निर्माण कार्य थांबवण्याचा उल्लेख सुद्धा या नोटीस मध्ये करण्यात आलेला आहे. पण बस स्थानकाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे .इलेक्ट्रिक फिटिंग चे काम प्रलंबित आहे. त्यामुळे ही नोटीस प्राप्त झाल्याने अनेक चर्चांना उधान आलेले आहे . ४० वर्षापूर्वी अचलपूर शहरातील जीवनपुरा गेट जवळ भव्य दिव्य बस स्थानकाचे निर्माण करण्यात आली होते. गेल्या ४० वर्षापासून अचलपूर शहरातील बस स्थानक त्या परिसरात आहे . पण आताच पुरातत्त्व विभागाने ही नोटीस बजावल्याने अनेक प्रश्न निर्माण झालेले आहे. गेल्या ४० वर्षापासून तिथे बस स्थानक असताना या संदर्भात पुरातत्त्व विभागाने नोटीस का बजावली नाही ? हा प्रश्न निर्माण झाला आहे . अचलपूर शहरातील अनेक ठिकाणी ऐतिहासिक परकोट भिंत नामशेष होत आहे. याकडे मात्र पुरातत्त्व विभाग नागपूरचे अधिकारी - कर्मचारी कोणती दखल घेत नाही .आणि अचलपूर शहरातील नागरिक व प्रवाशांसाठी बस स्थानक निर्मितीच्या माध्यमातून मोठी सुविधा उपलब्ध होत असताना १२८ मीटर हद्दीत परिसरात ते बस स्थानक अवैध बांधकाम दाखविल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे . महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून कोणता खुलासा केला जाणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने सुद्धा पुरातत्त्व विभाग नागपूरची परवानगी बस स्थानकाच्या बांधकामासाठी का घेतली नाही ? व स्थानिक नगर परिषद प्रशासनाची परवानगी बांधकामासाठी घेतली होती का ? हा सुद्धा प्रश्न निर्माण झालेला आहे .या नोटीस ची प्रतिलिपी आयुक्त कार्यालय अमरावती ,पोलीस अधीक्षक अमरावती ,अचलपूरचे तहसीलदार ,नगरपरिषद प्रशासन, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अचलपूरचे अधिकारी यांना दिलेली आहे .

**या संदर्भात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे बांधकाम विभागाचे अधिकारी किरण इंगळे यांच्याशी संपर्क साधला असताना ,त्यांनी ही नोटीस प्राप्त झाली असून बस स्थानक चे बांधकाम ४० वर्षापूर्वी ही करण्यात आले होते .यामुळे स्थानिक प्रशासनाची परवानगी होती. यासंदर्भात कागदपत्र सादर करून लेखी खुलासा केला जाणार आहे,असे सांगीतले.**

# भाडे स्लीपरचे, प्रवास मात्र साध्या बससारखा; सुविधा मात्र शून्य

**खल्लार/प्रतिनिधी -**

अकोट-दर्यापूर अमरावती मार्गावर धावणा-या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बस क्र श्प् ०९ क्श् ९७४४ या स्लीपर बसचे भाडे प्रवाशांकडून पूर्ण आकारले जात असले तरी बसमध्ये अपेक्षित सुविधा नसल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. प्रवाशांच्या म्हणण्यानुसार स्लीपर बसचे भाडे जास्त असूनही बसमधील सुविधा अत्यंत निकृष्ट दर्जाच्या आहेत.

या मार्गावरील बस प्रवास साधारण दोन ते तिन तासांचा असून अकोट अमरावती अंतर ९० किमी आहे. साधारण बसचे भाडे सुमारे १२५ रुपयांपासून सुरू होते.काही स्लीपर बस मध्ये त्याहून अधिक भाडे आकारले जाते.

मात्र एवढे भाडे देउनही प्रवाशांना योग्य सुविधा मिळत नसल्याची ओरड नागरिकांची आहे.

अनेक बसमध्ये स्वच्छता नाही, फॅन बंद,लाईट बंद,चार्जिंग पाइंट काम करत नाहीत, तसेच स्लीपर बेडची स्थितीही खराब आहे. काही ठिकाणी पडदे फाटलेले, एसी व्यवस्थित चालत नाही किंवा बस वेळेवर धावत नसल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत.

प्रवाशांच्या मुख्य तक्रारीत स्लीपर बेडची स्वच्छता नसणे,चार्जिंग पाइंट व लाईट बंद,बस वेळेवर न धावणे,तिकीट दर जास्त असूनही सुविधा अपुरी असणे आदि आहेत. प्रशासनाने या मार्गावरील खासगी स्लीपर बसची तपासणी करून नियमांनुसार सुविधा देण्यात यावे अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

दर्यापू-अमरावती मार्गावरील स्लीपर बसमध्ये योग्य सुविधा नसल्याने प्रवाशी वर्गाने संताप व्यक्त केला आहे. भाडे मात्र पूर्ण मात्र आतमध्ये सुविधा शून्य यावर प्रशासनाने लवकरात लवकर तपासणी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# अंबरनाथ येथील कंपनीत एका मागोमाग अनेक स्फोट

## एमआयडीसीत श्री गणेश केमिकल कंपनीला लागली प्रथम आग

अंबरनाथ : येथील आनंद नगर एमआयडीसीत श्री गणेश केमिकल्स कंपनीमध्ये सायंकाळी सहा वाजताच्या दरम्यान मोठी आग लागली. या आगीनंतर कंपनीत रासायनिक ड्रमचे मोठमोठे स्फोट होउ लागल्याने संपूर्ण आनंद नगर एमआयडीसीमध्ये भीषणता निर्माण झाली होती. श्री गणेश केमिकल्स कंपनीत अचानक आग लागल्यानंतर अवघ्या काही मिनिटानंतर या आगीने रौद्ररूप धारण केले. या कंपनीत रासायनिक साठा मोठ्या प्रमाणात असल्यामुळे अनेक स्फोट कंपनीत झाले. या स्फोटांचा हादरा दोन किलोमीटर अंतरापर्यंत कंपन्यांना जाणवला. एवढेच नव्हे तर कंपनीच्या परिसरात असलेल्या इतर कंपन्यांमध्ये देखील ही आग आल्याने एकच आहाकर माजला होता. कंपनीतील ड्रमचे स्फोट झाल्यानंतर संपूर्ण रासायन एमआयडीसीच्या रस्त्यावर पसरले होते त्या ठिकाणी देखील रस्त्यावर आग लागली होती. आगीचा रौद्ररूप पाहून एमआयडीसी अग्निशमन



केंद्राने जिल्ह्यातील सर्वच महापालिका आणि औद्योगिक क्षेत्रांना ही आग आटोक्यात आणण्यासाठी मदत मागितली. या आगीत नेमके किती जण जखमी झाले आहेत हे अद्यापही स्पष्ट झालेले नाही.

पान १० वरून

### आदिवासी बांधवांच्या प्रश्नांसाठी

आदिवासी समाज आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. आरोग्य सेवा, पिण्याचे पाणी, रस्ते, शिक्षण आणि रोजगार यांसारख्या प्रश्नांवर शासनाने ठोस निर्णय घेणे अत्यावश्यक आहे.

**मंत्री उदय सामंत यांचे आश्वासन-** यावेळी बोलताना मंत्री उदय सामंत यांनी पाणीपुरवठा, रोजगार हमी, उद्योग विभाग आणि परिवहनाशी संबंधित प्रश्नांवर अधिवेशन संपण्यापूर्वी तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

'आम्हाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः सांगितले की, कुठल्याही परिस्थितीत बच्चू कडूंच्या नेतृत्वात निघालेल्या पदयात्रेत सहभागी व्हा. मेळघाटातील आदिवासी नागरिकांना न्याय देण्यासाठी सरकार सदैव तुमच्या सोबत आहे. इथल्या युवकांच्या हाताला रोजगार मिळावा यासाठीही प्रयत्न केले जातील,' असे सामंत यांनी सांगितले.

तसेच त्यांनी नमूद केले की, बच्चू कडूंनी आंदोलन केले नसते तर कर्जमाफीचा विषय इतक्या वेगाने पुढे आला नसता. कर्जमाफीमध्ये काही त्रुटी असतील तर त्या निश्चितपणे दूर केल्या जातील.

**कर्जमाफीबाबत बच्चू कडूंची भूमिका-** कर्जमाफीच्या विषयावर बोलताना बच्चू कडूंनी सांगितले की, कर्जमाफीच्या आंदोलनावेळीही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विशेष लक्ष दिले होते. 'आज दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी झाली त्याबद्दल आम्ही आभार मानतो. मात्र नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन देऊन चालणार नाही. त्यांना किमान दीड लाख रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ मिळाला पाहिजे,' अशी मागणी त्यांनी केली.

### तलवार फिरवून दहशत करणारा

ती जप्त करत आरोपीविरुद्ध गाडगेनगर पोलिस ठाण्यात आर्म ॲक्ट कलम ४ व २५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १३५ अंतर्गत गुन्हा नोंदविला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस हवालदार भारत वानखडे करीत आहेत. दरम्यान, ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे व सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. गाडगेनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, क्राईम पोलिस निरीक्षक विजया पंधरे व पोलिस निरीक्षक (प्रशासन) समाधान वाठोरे यांच्या नेतृत्वात डी.बी. पथक प्रमुख एपीआय मनोज मानकर यांच्यासह पोलिस कर्मचारी भारत वानखडे, राजेश गुरेले, मतिन शेख, सुशांत प्रधान, महेश शर्मा आणि रुपेश हटकर यांनी ही कारवाई केली.

### अल्पवयीन विद्यार्थिनीच्या हत्येप्रकरणी

घरी सोडताना त्याने 'तिच्याशी माझे प्रेमसंबंध असून मी तिच्याशी लग्न करणार' अशी धमकी दिल्याचे सांगितले जाते. या प्रकाराबाबत मुलीच्या वडिलांनी धामणगाव रेल्वे पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानंतरही आरोपीकडून मुलीला त्रास दिला जात असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले होते.

**क्रीडा संकुलात घडला रक्तरंजित प्रकार-** ६ जानेवारी २०२० रोजी सकाळी सुमारे ११ वाजता विद्यार्थिनी शाळेत गेल्यानंतर काही वेळातच तिच्या वडिलांना अपघात झाल्याचा निरोप मिळाला. ते स्व. दादाराव अडसळ क्रीडा संकुलाच्या मैदानात पोहोचले असता मुलगी रक्ताच्या थारोळ्यात मृतावस्थेत पडलेली दिसली. तिच्या शरीरावर धारदार शस्त्राचे गंभीर वार झाल्याचे आढळले. दरम्यान, त्या परिसरातून जात असलेले पोलिस शिपाई शंकर दार्वेकर यांनी परिस्थिती पाहून तातडीने पोलिसांना कळविले. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक द्वारका अंभोरे घटनास्थळी दाखल झाल्या असता आरोपी सागर तितुरमारे हा देखील गंभीर जखमी अवस्थेत आढळून आला. त्याच्या पायाजवळ रक्ताने माखलेला मोठा चाकू पडलेला होता. पोलिसांनी त्याला तातडीने रुग्णालयात हलविले.

पोलिस तपासात आरोपीने प्रथम विद्यार्थिनीवर चाकूने प्राणघातक हल्ला केल्याचे आणि त्यानंतर स्वतःलाही जखमी करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट झाले. या हल्ल्यात विद्यार्थिनीचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

**तपास अधिकाऱ्यावरील स्वतंत्र गुन्हा न्यायालयीन प्रक्रियेत-** या हत्याकांडाच्या तपासादरम्यान एक धक्कादायक बाबही समोर आली होती. सुरुवातीला या प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलिस निरीक्षक रविंद्र सोनवणे यांच्याकडे होता. मात्र घटनेनंतर काही महिन्यांनी मुलीच्या एका नातेवाईकाने सोनवणे यांच्याविरोधात तक्रार नोंदवली. तक्रारीनुसार, सोनवणे हे मुलीला त्रास देत असून तिला बाहेरगावी फिरायला घेऊन जात असल्याचा आरोप करण्यात आला. या तक्रारीच्या आधारे सोनवणे यांच्या विरोधात भारतीय दंड विधानाच्या कलम ३५४-डी तसेच पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात त्यांना अटकही करण्यात आली होती. सध्या दत्तापूर पोलिस ठाण्यात नोंद असलेले हे प्रकरण न्यायालयीन प्रक्रियेत आहे.

### मुंबई-अमरावतीपर्यंत ड्रग्जचे नेटवर्क

तपासादरम्यान त्यांच्या ताब्यातून ३ कोटी ११ लाख ८५ हजार रुपये किमतीची २ किलो ८० ग्रॅम एमडी पावडर जप्त करण्यात आली. याशिवाय ५० हजार रुपये किमतीची ॲक्टिव्हा दुचाकी आणि २५ हजार रुपये किमतीचा मोबाईल फोनही जप्त करण्यात आला. या प्रकरणी नागपुरी गेट पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक चौकशीत आरोपींनी दोन दिवसांपूर्वी मुंबईतील माहीम परिसरातील अरबाज उर्फ अरबू आणि अझीम या दोघांकडून एमडी ड्रग्ज खरेदी केल्याची कबुली दिली आहे. हे ड्रग्ज अमरावतीतील काही व्यक्तींना विक्रीसाठी आणल्याची माहितीही त्यांनी दिली. तपासादरम्यान शेख नाझीम शेख रहीम, शेख रहीम उर्फ हुंगा शेख अमाद, शेख नईम उर्फ राजा शेख रहीम, शेख फहीम उर्फ सोनू शेख रहीम, शेख जमीर उर्फ बाबा हुंगा, शेख समीर शेख अमीर, गोलू अहमद आरिफ अहमद कुरेशी (सर्व रा. गवळीपुरा) तसेच अब्बास कुरेशी (रा. चांदूर बाजार) यांची नावेही पुढे आली आहेत. यापैकी शेख नाझीम शेख रहीम आणि शेख रहीम उर्फ हुंगा शेख अमाद यांना रविवारी रात्री अटक करण्यात आली. दरम्यान, या प्रकरणाचा तपास सुरू असून ड्रग्ज पुरवठा साखळीतील इतर आरोपींचा शोध घेतला जात आहे. शहरात एमडी साठवणूक आणि विक्री करणाऱ्या सर्व व्यक्तींवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी पत्रकार परिषदेत दिला. ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे आणि रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. यामध्ये पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण, सहाय्यक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, महेश इंगोले, अमोल कडू तसेच गुन्हे शाखेच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

### संसदीय कामकाजात महिलांचा

टक्के जागा राखीव असल्याने महिलांचा सर्वंकष निर्णय प्रक्रियेमध्ये सहभाग वाढला. विधानसभा व लोकसभेतही महिला पोहोचल्या आहे. मात्र या ठिकाणी त्यांची संख्या फार कमी आहे. म्हणून महिलांचा संसदीय कामकाजात सहभाग वाढविण्यासाठी लोकसभा व विधानसभेत महिलांना ५० टक्के आरक्षण लागू करण्याची सुचना आ. सुलभा खोडके यांनी अधिवेशनातून केली आहे.

महिला सक्षमीकरणाचे उदात्त ध्येय साध्य करीत असतांना महिलांच्या आरोग्याकडे सुद्धा लक्ष देण्याची गरज आहे. महिलांमध्ये वाढते कॅंसरचे प्रमाण प्रमाण चिंतेची बाब असून महागड्या उपचार व औषधींच्या खर्चामुळे महिलांच्या आरोग्यावर कॅंसरचा धोका वाढला आहे. त्यामुळे महिलांसाठी कर्करोग निदान, तपासणी व उपचार संदर्भात सुद्धा शासनाने धोरण निश्चित करावे तसेच काही आर्थिक उत्पन्न मर्यादेवर महिलांना कॅंसरचा उपचार व औषधी संपूर्णतः मोफत देण्याला घेऊन शासनाची भूमिका महत्वाची असल्याचे देखील आ. सुलभा खोडके यांनी सांगितले.

महिलांच्या मोफत शिक्षण, उच्च शिक्षण शुल्क माफी तसेच आरोग्य, पोषण, आहार, स्वास्थ्य, शिक्षण व कौशल्य अशा सर्व निर्णायक धोरणांवर काम करत असतांना महिलांची सुरक्षितता देखील महत्वाची आहे. महिलांच्या वाढत्या अत्याचाराच्या घटनांना आळा बसविण्यासाठी राज्यात शक्ती कायदा लागू करण्याची सूचना सुद्धा आमदार महोदयांच्या वतीने सभागृहासमक्ष करण्यात आली.

महिला विकासाच्या धोरणात आज महिलांना समानतेचा वाटा मिळाला , वडिलोपार्जित संपत्तीमध्ये महिलांना वाटा मिळाल्याने त्या सक्षम झाल्यात. शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होत असतांना शेतमजूर, घरकाम महिला, बांधकाम कामगार, सारख्या असंघटित कामगारांनाही संघटित करून त्यांच्या उत्थानासाठी प्रयत्न होणे अपेक्षित असल्याचे आमदार महोदयांनी सांगितले तसेच एकल, विधवा , घटस्फोटित , परित्यक्ता महिलांना सुद्धा सामाजिक सुरक्षा व आत्मनिर्भरता बहाल व्हावी म्हणून आज शासनाच्या वतीने स्वतंत्र धोरण ठरविण्याची गरज आहे. अशी सुचना आ. खोडके यांनी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सभागृहासमक्ष मांडली.

### विभागीय लोकशाही दिनात तेरा

आज पार पडले. यावेळी उपायुक्त रविंद्र हजारे, उपायुक्त संतोष कवडे, उपायुक्त राजू फडके यांच्यासह महसूल, पोलीस, महापालिका, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी प्रत्यक्षरित्या तर पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठकीला उपस्थित होते.

यावेळी विभागीय लोकशाही दिनात दाखल एकूण तेरा प्रकरणांवर चर्चा करण्यात आली असून दोन प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर उर्वरित प्रकरणांवर पंधरा दिवसांत आवश्यक कार्यवाही करुन अंतीम अहवाल सादर करण्याच्या सूचना सिंघल यांनी संबंधित विभागप्रमुखांना केल्या.

विभागीय लोकशाही दिनासाठी सामान्य प्रशासन विभागाव्दारे एकूण १३ प्रकरणांवर लोकशाही दिनात चर्चा करण्यात आली. ही प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यासाठी संबंधित विभागांनी स्थळ पाहणी, मुद्देनिहाय चौकशी, पडताळणी करुन सुस्पष्ट अंतीम अहवाल तत्काळ सादर करावेत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले. विभागीय महिला लोकशाही दिनांतर्गत एकही प्रकरण दाखल झाले नाही, अशी माहिती महिला व बालविकास विभागाव्दारे देण्यात आली.

यावेळी लोकशाही दिनासाठी अमरावती विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. मागील लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये. न्यायप्रविष्ट किंवा अर्धन्यायिक प्रकरणांसंदर्भात तत्काळ अहवाल सादर करण्यात यावा. लोकशाही दिनासाठी दाखल होणाऱ्या तक्रार अर्जांवर वेळेत कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, अशा सूचना सिंघल यांनी यावेळी केल्या.

### विषय समिती निवडणूक होणार

त्या नावाची घोषणा करतात. चार विषय समिती मध्ये ९-९ सदस्यांची निवड १७ मार्च रोजी होणार आहे. सदस्यांच्या निवडीनंतर येणाऱ्या आम सभेमध्ये सभापती आणि उपसभापती यांची निवड करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुकांनी लॉबिंग सुरू केली आहे. तसेच आम सभेसाठी नगरसेवकांनी आपापले प्रश्न नगरसचिव यांच्याकडे पाठवले आहे. नगरसचिव या प्रश्नांना विषय सूचीमध्ये समाविष्ट करतील आणि अधिसूचना घोषित केली जाणार आहे. आता १७ मार्च रोजी होणाऱ्या आमसभेकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहे. विषय समिती सदस्यांच्या निवडणुकीमुळे ही सभा महत्त्वपूर्ण राहणार आहे. विषय समितीमध्ये जाण्यासाठी इच्छुकांनी वरिष्ठांकडे फील्डिंग लावली आहे. आता विषय समितीमध्ये कोण जाते हे पाहणे महत्त्वाचे राहणार आहे.

### भारताच्या विजयानंतर अकोलात

झालेल्या वादानंतर परिसरातील वाहनांची देखील तोडफोड करण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच जुने शहर पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेतली. दगडफेकीच्या घटनेमध्ये तीन ते चार जण किरकोळ स्वरूपात जखमी झाले. वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळावर दाखल झाले. अतिरिक्त पोलीस दलाला पाचारण करून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला. परिसरातील सीसीटीवी कॅमेरामधील चित्रीकरण पाहून आरोपींची ओळख पटविण्याचे कार्य सुरू आहे. मद्यप्राशन करून काही जणांनी गोंधळ घालत ही दगडफेक केल्याची माहिती आहे. या घटनेमुळे हरिहर पेठसह शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी वेळीच कारवाई करून परिस्थितीवर नियंत्रण मिळवले.

**शहरात शांतता ठेवण्याचे आवाहन -** या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही गटावर परस्पर विरोधी गुन्हे दाखल केले असून दोन्ही बाजूच्या चार जणांना अटक केली. त्यांना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. शहरात शांतता राखण्याचे आवाहन अकोला पोलिसांनी केले आहे. अकोला शहरातील हरिहर पेठ भागात गेल्या काही वर्षांमध्ये दोनदा दंगल झाली. हा भाग अत्यंत संवेदनशील परिसर म्हणून ओळखला जातो. सध्या त्या ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

**आरोपींची पटवली जात आहे ओळख-** हरिहर पेठ येथील वाद प्रकरणांत दोन्ही गटांवर परस्पर विरोधी गुन्हे दाखल केले आहेत. या प्रकरणांत दोन्ही बाजूच्या प्रत्येकी दोन प्रमाणे एकूण चार जणांना अटक केली आहे. आणखी आरोपींची ओळख पटवली जात असून प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असल्याची माहिती जुने शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांनी दिली.

### पत्रकार सुरक्षा कायद्याची प्रभावीपणे

झाली नाही तसेच मागील दीड वर्षापासून अधिस्वीकृती समितीची बैठक झाली नसल्याने शेकडो जेष्ठ पत्रकार हे आर्थिक साहाय्य मिळण्यापासून वंचित आहेत. त्यामुळे आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेची प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासनाने संबधित विभागाला सुचना करावी, अशी लक्षवेधी आ.संजय खोडके यांनी लावून धरली. तसेच सदर योजनेसाठी पात्र निकषांमध्ये वयाची अट ६० वर्ष ऐवजी ५८ वर्ष लागू करण्याची सुचना यावेळी सभागृहासमक्ष करण्यात आली.

तसेच प्रसार माध्यमात आपली कर्तव्ये पार पाडत असतांना पत्रकारांवर होणाऱ्या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी शासनाने लागू केलेल्या पत्रकार सुरक्षा कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी, यासाठी शासनाने गृह विभागाला वेळोवेळी आवश्यक सूचना व दिशानिर्देश देण्याची आवश्यकता असल्याचे सुद्धा आ. संजय खोडके यांनी सभागृहात बोलतांना सांगितले.

पत्रकार कल्याण निधी अंतर्गत पत्रकारांना आरोग्य सुविधा व विमा कवच देणाऱ्या योजनांची व्याप्ती वाढविण्याची आवश्यकता असून त्यामध्ये काही जटिल आजारांचा सुद्धा समावेश करून पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांना लाभ देण्याची लक्षवेधी सुचना आ. संजय खोडके यांनी महाराष्ट्र विधान परिषदेच्या सभागृहात लावून धरली.

यावर उत्तर देतांना राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले कि, जेष्ठ पत्रकारांना उतार वयामध्ये आधार व अर्थसाहाय्य म्हणून शासनाच्या आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजने अंतर्गत रु. ११,०००/- हजार दरमहा इतके अर्थसहाय्य देण्यात येते. त्यामध्ये वाढ करून २०,००० हजार दरमहा देण्याबात निर्णय घेण्यात येत आहे. यासाठी १८० जेष्ठ पत्रकार पात्र असून सतत ३० वर्ष पत्रकार म्हणून काम करणारे व ६० वर्ष वय पूर्ण असे अशा जेष्ठ पत्रकारांना हि पेन्शन दिली जात असल्याचे मंत्री ना. आशिष शेलार म्हणाले. या संदर्भातील प्रलंबित प्रकरणांची पडताळणी कारण्यासंदर्भात अधिस्वीकृती समितीला निर्देशित करण्यात येणार आहे. तसेच पत्रकार संरक्षण कायद्यांच्या प्रभावी व ठोस अंमलबजावणी संदर्भात गृह विभागाशी चर्चा करून पुढील कार्यवाही करू असे उत्तर सुद्धा ना. शेलार यांनी सभागृहासमक्ष दिले. पत्रकार व त्यांच्या कुटूंबाच्या कल्याणाच्या बाबतीत केंद्र शासनाच्या सामाजिक सुरक्षा संहिता २०२० च्या अधिनस्त राहून शासनाच्या वतीने महाराष्ट्र असंघटित सामाजिक सुरक्षा मंडळाच्यावतीने ज्या काही बेनिफिशियल लाभ आहेत, याचा पत्रकारांनी लाभ होण्यासाठी यामध्ये अंतर्भाव करण्यात आला असल्याचे उत्तर मंत्री ना. शेलार यांनी दिले.

### महिलांनी 'सुपरवुमन' होण्याच्या नादात

आणि व्यावसायिक आयुष्यात संतुलन साधणे आवश्यक आहे. 'भगिनी' हा शब्द केवळ संबोधनापुरता मर्यादित न ठेवता महिलांनी एकमेकींच्या प्रगतीसाठी पुढाकार घ्यावा. तसेच जीवनातील अडचणींमध्ये अडकून न पडता आपण समाजासाठी आणि कुटुंबासाठी दिलेल्या सकारात्मक योगदानाचा विचार करणेही महत्त्वाचे आहे. मात्र, महिलांच्या प्रगतीत पुरुषांचे योगदानही तेवढेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी स्त्री कर्करोग तज्ज्ञ डॉ. भावना सोनटक्के यांनी महिलांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, आज वैद्यकीय क्षेत्रात मोठी प्रगती झाली असून कर्करोगासारखे आजारही योग्य वेळी निदान झाल्यास पूर्णपणे बरे होऊ शकतात. त्यामुळे महिलांनी आरोग्याबाबत जागरूक राहून नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. गर्भाशयाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि सर्व्हायकल कर्करोग यांसारख्या आजारांवर प्रतिबंधासाठी लसीकरणाची सुविधा उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक साळुंके म्हणाले की, असमाधान ही अनेक आजारांची मूळ कारणे असतात. त्यामुळे केवळ अपेक्षा ठेवण्यापेक्षा आपण समाजाला आणि सहकाऱ्यांना काय सकारात्मक देऊ शकतो, याचा विचार प्रत्येकाने करणे आवश्यक आहे. त्यांनी उपस्थितांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी महापारेषणचे मुख्य अभियंता संजीव भोळे तसेच अधीक्षक अभियंता दीपाली माडेलवार आणि प्रणोती देशमुख यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यवस्थापक कल्पना भुले यांनी केले. सूत्रसंचालन सहाय्यक विधी अधिकारी आद्यश्री कांबे यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपकार्यकारी अभियंता रूपा भारती यांनी मानले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १०२ ■ मंगळवार १० मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# गरीबांच्या ताटावर डाका : रेशन धान्याचा काळाबाजार उघड; मुख्य सूत्रधार फरार

## एमआयडीसीतील गोडाऊनवर धाड; गहू-तांदूळ जप्त, गोडाऊन सील





**वर्धा जनमाध्यम :** महागाईच्या झळांनी सर्वसामान्य जनता होरपळत असताना गरीबांच्या हक्काच्या धान्यावर डल्ला मारणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा वर्धा तहसील पुरवठा विभागाने पर्दाफाश केला आहे. सेवाग्राम रोडवरील एमआयडीसी परिसरातील गोडाऊनवर टाकलेल्या धाडीत गहू आणि तांदळाचा अवैध साठा जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे जिल्ह्यातील धान्य माफियांचे धाबे दणाणले आहेत.

एमआयडीसी परिसरात संशयास्पद धान्यसाठ्याची माहिती मिळाल्यानंतर बजरंग दलाचे जिल्हा संयोजक बबलू राऊत, प्रशांत यादव आणि सहकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. गोडाऊन चालकाकडे साठ्याबाबत विचारणा केली असता तो कोणतीही वैध कागदपत्रे दाखवू शकला नाही. त्यानंतर तहसील पुरवठा अधिकारी मनीषा माजरखेडे यांना पाचारण करण्यात आले.

मनीषा माजरखेडे यांनी पथकासह धाड टाकत तपास केला असता गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात गहू-तांदळाचा साठा आढळून आला. इतकेच नव्हे तर गोडाऊनच्या बाहेर एका ऑटोमध्ये विक्रीसाठी नेला जाणारा धान्याचा मालही पकडण्यात आला. कोणतेही अधिकृत बिल किंवा परवाना नसल्यामुळे संपूर्ण गोडाऊन सील करण्यात आले.

दरम्यान, या रॅकेटचा मुख्य सूत्रधार शेख रहीम शेख करीम हा बिल घेऊन येतो असे सांगून कारवाईदरम्यान घटनास्थळावरून फरार झाला. काही महिन्यांपूर्वी सालोड हिरापूर परिसरात त्याच्यावर अशाच प्रकारची कारवाई झाल्याची माहिती पुढे आली आहे.

रेशनचा गहू-तांदूळ पकडला; पण विकणारे मोकाट का?

दरम्यान, या कारवाईनंतर शहरात एक मोठा प्रश्न उपस्थित होत आहे. अनेक वर्षांपासून शहरात गहू-तांदूळष्ठ गहू-तांदूळष्ठ अशी हाक देत फिरणारे व्यावसायिक रेशनचे धान्य मोठ्या प्रमाणात खरेदी करून साठवतात आणि नंतर तेच धान्य बाजारात जादा दराने विकतात, असा आरोप नागरिकांकडून होत आहे.

आज एमआयडीसी परिसरात टाकलेल्या धाडीत ११० क्विंटल तांदूळ आणि १० क्विंटल गहू असा मोठा साठा जप्त करण्यात आला. असो गोडाऊन सील करण्यात आले असले तरी धान्य खरेदी करून साठवणूक करणाऱ्यांवरच कारवाई होत आहे, मात्र रेशनचे धान्य विकणाऱ्या दुकानांवर किंवा पुरवठा साखळीतील दोषींवर कारवाई का होत नाही, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

स्थानिकांचे म्हणणे आहे की, जर पुरवठा विभागाच्या अधिकारी मनीषा माजरखेडे यांनी धान्य विकणाऱ्यांवर कठोर कारवाई केली, तर अशा बेकायदेशीर गोडाऊनवर धाड टाकण्याची वेळच येणार नाही. त्यामुळे या संपूर्ण रॅकेटमागील खरे सूत्रधार कोण, याचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी आता शहरातून होत आहे.

# इराण-इस्त्रायल युद्धाची झळ; सेलूत गॅस सिलेंडर टंचाईचा भडका



## हॉटेल व्यवसाय अडचणीत; युद्ध लांबल्यास पेट्रोल-डिझेलवरही संकटाची शक्यता

**सेलू जनमाध्यम :** आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या इराण-इस्त्रायल संघर्षाचे परिणाम आता स्थानिक पातळीवरही जाणवू लागले आहेत. या युद्धामुळे जागतिक इंधन व गॅस पुरवठा साखळीवर परिणाम झाला असून त्याची झळ सेलू शहरातील व्यावसायिक गॅस सिलेंडर पुरवठ्यावरही पडल्याचे चित्र दिसत आहे. गेल्या काही दिवसांपासून १९ किलोच्या व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा विस्कळीत झाल्याने शहरातील हॉटेल व्यवसायिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

गॅस सिलेंडर उपलब्ध न झाल्यामुळे अनेक हॉटेल्समध्ये स्वयंपाक करणे अशक्य झाले असून काही ठिकाणी हॉटेल मालकांना तात्पुरते व्यवसाय बंद ठेवावे लागले आहेत. हॉटेल व्यवसायावरच उदरनिर्वाह अवलंबून असलेल्या अनेक कुटुंबांवर त्यामुळे आर्थिक संकटाचे ढग दाटले आहेत. रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांनाही काम नसल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

युद्धामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर इंधनाच्या पुरवठ्यावर ताण निर्माण झाला असून त्याचा परिणाम देशातील गॅस वितरणावरही होत असल्याचे जाणकारांचे मत आहे. जर हा संघर्ष अधिक काळ सुरू राहिला, तर केवळ गॅस सिलेंडरच नव्हे तर पेट्रोल आणि डिझेलच्या पुरवठ्यावरही मोठा ताण येऊ शकतो. त्यामुळे भविष्यात इंधन दरवाढ किंवा टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या पार्श्वभूमीवर सेलूतील हॉटेल व्यावसायिकांनी तहसीलदारांना निवेदन देत १९ किलोच्या व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा नियमित करण्याची, गॅस एजन्सीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याची तसेच अन्नपुरवठा विभागाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

सिलेंडर वेळेवर मिळत नसल्याने आम्हाला हॉटेल बंद ठेवावी लागत आहेत. प्रशासनाने तातडीने तोडगा काढला नाही, तर आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा व्यावसायिकांनी दिला.

या वेळी विनोद गोमासे, सतीश ठाकरे, सुभाष झिले, गोविंद चौधरी, अशोक केळझरकर, विजय निमजे, ज्ञानेश्वर कटरे यांच्यासह अनेक हॉटेल व्यावसायिक उपस्थित होते. युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या या संकटाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन गॅस पुरवठा सुरळीत करण्याची मागणी व्यावसायिकांकडून होत आहे.

# रक्ताच्या आंदोलनाचा आवाज' सरकारला ऐकू गेला

## सिंदी-रेल्वे आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन जाहीर

### आ. शशिकांत शिंदे यांची विधानपरिषदेत आक्रमक भूमिका; अतुल वांदिले यांच्या पाठपुराव्याला यश

**हिंगणघाट जनमाध्यम :** सिंदी-रेल्वे परिसरातील हजारो नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नावर अखेर सरकारला झुकावे लागले. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या सिंदी-रेल्वे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याची घोषणा राज्य सरकारला करावी लागली. विधानपरिषदेत आमदार शशिकांत शिंदे यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे हा प्रश्न थेट सरकारसमोर उभा राहिला, तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) चे वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या मागणीला निर्णायक यश मिळाले.

सिंदी-रेल्वे येथे आरोग्य सुविधांचा गंभीर अभाव असल्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप उसळला होता. या पार्श्वभूमीवर २१ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या 'रक्ताने पत्र' आंदोलनाने राज्याचे लक्ष वेधले. अमोल सोनटक्के व आशिष देवतळे यांच्या नेतृत्वाखाली तब्बल १५०० नागरिकांनी स्वतःच्या रक्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून आपल्या वेदना व्यक्त केल्या. या आंदोलनाला जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनीही रक्ताने स्वाक्षरी करून पाठिंबा दिला आणि या लढ्याला अधिक धार चढवली.



याच जनआक्रोशाचा आवाज आज विधानपरिषदेत घुमला. आ. शशिकांत शिंदे यांनी सिंदी-रेल्वेच्या आरोग्य प्रश्नावर प्रशासनाच्या दिरंगाईवर जोरदार प्रहार करत सरकारला कोंडीत पकडले. त्यांच्या या आक्रमक भूमिकेनंतर आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी तातडीने दखल घेत सिंदी-रेल्वे आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही सभागृहात दिली.

या निर्णयामुळे सिंदी-रेल्वे व परिसरातील हजारो नागरिकांना आता स्थानिक पातळीवरच तज्ज्ञ डॉक्टर आणि प्रगत उपचार सुविधा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जनतेच्या संघर्षाचा हा विजय असल्याची भावना व्यक्त करत अतुल वांदिले यांनी केवळ आश्वासनावर थांबणार नाही, प्रत्यक्ष रुग्णालय सुरू होईपर्यंत आमचा लढा सुरूच राहील, असा इशारा दिला.

# आव्हानांना सामोरे जात महिलांची प्रगतीची वाटचाल : प्रो. गीता भट्ट

**वर्धा जनमाध्यम :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला सशक्तीकरणाचे विविध आयाम या विषयावर महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात आयोजित व्याख्यानात महिलांच्या प्रगतीचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला. दिल्ली विश्वविद्यालयातील एनसीडब्ल्यूईबीच्या निदेशक व सहयोगी प्राध्यापक प्रो. गीता भट्ट यांनी प्रमुख वक्त्या म्हणून मार्गदर्शन केले.



प्रो. भट्ट म्हणाल्या की, भारताच्या इतिहासात महिलांनी नेतृत्वाची परंपरा जपली आहे. अनेक आव्हाने आणि अडथळे असूनही महिलांनी प्रत्येक क्षेत्रात प्रगती साधली आहे. महिला सशक्तीकरणासाठी समाजात जागरूकता निर्माण करणे आणि शिक्षणाची संधी उपलब्ध करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी गुजरातमधील पाटण येथील राणी नायकी देवी तसेच कर्नाटकच्या राणी अवक्का यांच्या शौर्याचा उल्लेख करत स्त्रियांच्या नेतृत्वाची परंपरा अधोरेखित केली. तसेच शिक्षण क्षेत्रातील सावित्रीबाई फुले आणि विज्ञान क्षेत्रातील कमला सोहनी यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा होत्या. त्या म्हणाल्या की, समाजाचा विकास सहकार्य, समन्वय आणि सामंजस्यावर आधारित असतो. महिलांनी आपल्या अस्तित्वाची जाणीव दृढ करत समाजाच्या विकासात सक्रिय सहभाग घ्यावा. स्त्री ही सर्जनाची शक्ती असून तिच्या सामर्थ्यामुळे समाज अधिक समृद्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी डॉ. क्षमा कौल, डॉ. अनुपमा गुप्ता आणि प्रो. अवधेश कुमार मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व कुलगीताने झाली. जेंडर संवेदनशीलता आणि सन्मान या विषयावर आयोजित पोस्टर व घोषवाक्य स्पर्धांमधील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सीमा बर्गट यांनी केले, तर आभार रवींद्र कुमार यांनी मानले.

यावेळी शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, संशोधक व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तसेच कोलकाता, प्रयागराज आणि रिद्धपूर केंद्रातील शिक्षक व विद्यार्थी ऑनलाइन माध्यमातून सहभागी झाले.

# १९ हजार नागरिकांची नेत्र तपासणी; १७ हजारांना मोफत चष्मे

**आर्वी जनमाध्यम :** आमदार सुमित वानखेडे यांच्या पुढाकारातून आर्वी विधानसभा मतदारसंघात राबविण्यात येत असलेल्या नेत्र तपासणी व मोफत चष्मा वाटप मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा परिषद वर्धा व 'द नज इन्स्टिट्यूट' यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.९ मार्च २०२६ पर्यंत या मोहिमेत एकूण १९ हजार ३४५ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली आहे. तपासणीनंतर दृष्टीदोष आढळलेल्या १६ हजार ९९१ गरजू नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. मतदारसंघातील तालुकानिहाय आकडेवारीनुसार, कारंजा १० हजार ६१७ नागरिकांची तपासणी करण्यात आली असून १० हजार ६९ चष्मे वाटप करण्यात आले. आष्टी ६ हजार ९२४ तपासण्या करण्यात येऊन ५ हजार ३८२ नागरिकांना चष्मे देण्यात आले.

# राशनवर डल्ला की सत्तेचा माज !

## वर्ध्यात पुरवठा निरीक्षकाच्या मनमानीविरोधात थेट न्यायालयात धाव

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा तहसील कार्यालयातील पुरवठा निरीक्षक मनीषा मांजरखेडे यांच्या कथित मनमानी कारभाराविरोधात स्वस्त धान्य दुकानदारांनी थेट न्यायालयाचे दार ठोठावले आहे. स्वस्त धान्य दुकानदार संघर्ष समिती, तालुका वर्धा यांच्या वतीने नागपूर येथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठात याचिका दाखल करून मांजरखेडे यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. याचिकेनुसार, मांजरखेडे या स्वस्त धान्य दुकानदार आणि सामान्य नागरिकांशी अरेरावीची वागणूक देत असून कार्यालयीन कामकाजात मनमानी सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दुकान जोडणी संदर्भात तहसीलदारांचा आदेश होण्यापूर्वीच काही नवीन दुकानदारांना धान्य पुरवठा केला जात असल्याने संपूर्ण व्यवस्थेत गोंधळ निर्माण झाल्याचे याचिकेत नमूद करण्यात आले आहे. याशिवाय गोदामातून येणाऱ्या ५० किलोच्या धान्याच्या पोत्यांमध्ये अर्धा ते एक किलोपर्यंत धान्य कमी दिले जात असल्याचा गंभीर आरोप दुकानदारांनी केला आहे. यासंदर्भात पालकमंत्री तसेच प्रशासनाला निवेदन देऊन मांजरखेडे यांच्यावर कारवाई करून त्यांची वर्धा जिल्ह्याबाहेर बदलीची मागणी करण्यात आली होती.

# लहानसा 'बोर', पण जैवविविधतेचा महासागर

## ४५ शिकारी पक्ष्यांच्या प्रजातींची नोंद; दुर्मिळ गरुडांचे सुरक्षित आश्रयस्थान ठरला बोर व्याघ्र प्रकल्प

**सेलू जनमाध्यम :** विदर्भाच्या हिरव्यागार कुशीत वसलेला आणि क्षेत्रफळाने तुलनेने लहान असलेला बोर व्याघ्र प्रकल्प आज जैवविविधतेच्या बाबतीत मोठ्या व्याघ्र प्रकल्पांनाही टक्कर देत असल्याचे चित्र समोर आले आहे. नुकत्याच करण्यात आलेल्या सर्वेक्षणात या परिसरात तब्बल ४५ प्रजातींच्या शिकारी पक्ष्यांची नोंद झाली असून त्यात १० दुर्मिळ गरुड प्रजातींचा समावेश असल्याने पक्षीप्रेमी आणि निसर्ग अभ्यासकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

वन विभागाच्या पुढाकाराने बोर अभयारण्य व त्याच्या बफर क्षेत्रात पक्ष्यांचे विशेष सर्वेक्षण करण्यात आले. या अभ्यासात एकूण २५७ पक्षी प्रजाती आढळून आल्या. त्यामध्ये राखी डोळ्यांचा मच्छी गरुड, आखूड बोटांचा सर्पगरुड, तुरेवाला सर्पगरुड, काळा गरुड, छोट्या व मोठ्या ठिपक्यांचा गरुड, नेपाळी गरुड, बोनेलीचा गरुड, सरडामार गरुड आणि मोरधार (हूम बाज) यांसारख्या दुर्मिळ आणि महत्त्वाच्या गरुड प्रजातींची नोंद विशेष ठरली आहे. शिकारी पक्ष्यांची इतकी मोठी उपस्थिती या जंगलातील परिसंस्थेच्या आरोग्याचे द्योतक मानली जात आहे.

बोर व्याघ्र प्रकल्पाचे सुमारे ६७ हजार ८४४ हेक्टर बफर क्षेत्र जैवविविधतेने समृद्ध आहे. २०२३ ते २०२५ दरम्यान झालेल्या अभ्यासात येथे १३९ प्रकारच्या आरोही (वेली सदृश) वनस्पती आढळल्या. तसेच या जंगलात १८ पट्टेदार वाघ, बिबट्या, अस्वल यांसारखे प्रमुख मांसभक्षी प्राणी तर हरिण, सांबर, नीलगाय यांसारख्या तृणभक्षी प्राण्यांचाही मोठ्या प्रमाणावर वावर आहे.

नदी, तलाव, दाट जंगल आणि मोकळी माळराने अशा विविध प्रकारच्या अधिवासामुळे या भागात फुलपाखरे, कीटक, सरपटणारे प्राणी आणि विविध पक्षी यांचे समृद्ध अस्तित्व दिसून येते. त्यामुळे बोर व्याघ्र प्रकल्प हा केवळ वाघांसाठीच नव्हे तर संपूर्ण परिसंस्थेसाठी महत्त्वाचा अधिवास ठरत आहे.



जंगल सफारीसाठी येणाऱ्या पर्यटकांनी केवळ वाघ पाहण्यापुरते मर्यादित न राहता या परिसरातील समृद्ध जैवविविधतेचा अनुभव घ्यावा, असे आवाहन निसर्गप्रेमी व वन्यजीव अभ्यासकांकडून करण्यात येत आहे. विदर्भासह राज्याच्या विविध भागांतून येणारे पर्यटक येथे दुर्मिळ पक्षी व वन्यजीवांचे दर्शन घेऊन भारावून जात आहेत.

क्षेत्रफळाने लहान असला तरी बोर व्याघ्र प्रकल्पाने जपलेली निसर्गसंपदा आज विदर्भातील पर्यावरण संवर्धनाचे महत्त्वाचे प्रतीक बनत असून भविष्यात पर्यटनाच्या दृष्टीनेही या प्रकल्पाचे स्थान अधिक बळकट होण्याची चिन्हे दिसत आहेत.


## सिंदी (मेघे) ग्रामपंचायत कार्यालय, पंचायत समिती, वर्धा
## निविदा सुचना

ग्रामपंचायत सिंदी (मेघे) ता.जि.वर्धा कडून सर्व नोंदीकृत कंत्राटदारांना सुचित करण्यात येते की, जैविक विविधता फंड सन २०२५-२६ अंतर्गत खालील कामे मंजूर असून निविदा दिनांक १०.०३.२०२६ ते १७.०३.२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावी. निविदा उघडण्याची तारीख १८.०३.२०२६ किंवा मासिक/विशेष सभेत.

| अ.क्र. | फंडाचे नांव व कामा चे नांव | प्राकलन किंमत | निविदा फी | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | जैविक विविधता फंड अंतर्गत जैवविविधता व्यवस्थापन आराखडा व नोंदवही तयार करणे | ७५०००/-<br>ठराव क्र. ९<br>दि.२३.०१.२०२६ | १०००/- | ७५०/- |

**अटी व नियम -**

१) निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचे सर्व अधिकार ग्रामपंचायतीकडे राहतील. तसेच कोणतेही कारण न देता प्राप्त झालेल्या निविदापैकी कोणतीही निविदा ास्वकारणे किंवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायत स्वतःकडे राखून ठेवत आहे.
२) निविदा मंजूर झाल्यावर काम करण्याबाबत रु.५०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन घ्यावा.
३) निविदा मंजूर झाल्यापासून वरील कामे न मुद केलेल्या कालावधीच्या आत करावी लागेल.
४) दिलेले काम न झाल्यास शासन नियमाप्रमाणे दंड भरावा लागेल.
५) मंजूर प्राकलनाप्रमाणे तांत्रिक अधिकाऱ्याच्या सुचनेनुसार काम पूर्ण करावे लागेल.
६) सदर कामाची अनामत रक्कम निविदा फी दिलेल्या फंडात जमा करावी लागेल.
७) सदर कामाचा कालावधी ३ महिने राहील.
८) सामान्य फंड खाते **क्र.३५५५०२०१००१००६४** IFSC **कोड क्र.** UBIB ०५३५५५९ युनियन बॅंक ऑफ इंडिया मध्ये जमा करावी लागेल.

**प्रशासक,**
**ग्रामपंचायत सिंदी (मेघे)**

**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत सिंदी (मेघे)**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# पत्रकार, वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणार

## मंत्री आशिष शेलार यांनी केली ही घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी-** पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी सरकारने जाहिर केलेले आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची कार्यवाही पुढील अधिवेशनाच्या आत करण्यात येईल. पत्रकारांच्या विविध विषयांवर पत्रकार संघटना, शासनातील विविध विभाग, संबंधित लोकप्रतिनिधी यांची एक व्यापक बैठक लवकरच घेण्यात येईल, अशी माहिती मंत्री आशिष शेलार यांनी विधान परिषदेत दिली.

श्रीकांत भारतीय यांनी लक्षवेधी सूचनेव्दारे या बाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. संजय खोडके, शशिकांत शिंदे यांनी चर्चेत सहभाग घेतला. पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी सरकारने जाहिर केलेले आर्थिक विकास महामंडळ कधी स्थापन करणार. कोरोना नंतर वृत्तपत्र क्षेत्रात निर्माण झालेल्या अडचणी, त्यातून निर्माण झालेला रोजगाराचा प्रश्न. बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाने असलेल्या निवृत्ती वेतन योजनेचे प्रस्ताव रखडणे. वृत्तपत्र खरेदी करणा-या वाचकांना प्राप्तिकरातून सूट देणे. पत्रकारांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी महामंडळातून मदत करणे. गृहनिर्माण योजनेअंतर्गत पत्रकारांना घरे देणे, जाहिरातीवरील जीएसटी रद्द करणे, अशा विविध विषयांकडे सदस्यांनी लक्ष वेधले. दोन्ही महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने १० आक्टोबर २०२४ रोजी घेतला आहे. विविध खात्यांशी या विषयांचा समन्वय करणे आवश्यक आहे, ती प्रक्रिया सुरू असून, पुढील अधिवेशनाच्या आत या बाबत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करु न ही महामंडळे स्थापन करण्यात येतील, अशी ग्वाही शेलार यांनी दिली. पत्रकार, वृत्तपत्रे, वृत्तपत्रे विक्रेत्यांबाबत निर्माण झालेल्या समस्यावर उपाययोजना करण्यासाठी ज्येष्ठ पत्रकार यदु जोशी आणि वसंत मुंडे यांच्या समितीने काही महत्त्वाच्या शिफारशी, सूचना शासनाला केल्या आहेत. त्या बाबत ही शासन कार्यवाही करीत आहे. हे विषय विविध खात्यांशी संबंधित असल्याने या बाबत एक सर्व विभागांची संयुक्त बैठक येत्या अधिवेशनाच्या आत घेण्यात येईल. त्यामध्ये या सर्व प्रश्नांवर चर्चा करू, असे मंत्री शेलार यांनी सांगितले.



**कायमस्वरुपी यंत्रणा उभी करा- उपसभापती नीलम गो-हे यांचे निर्देश**

आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेचा लाभ अनेक पात्र पत्रकारांना मिळत नाही, कारण त्यांनी ज्या वृत्तपत्रांमध्ये काम केले ते वृत्तपत्र बंद पडलेले असते किंवा संबंधित संपादकांकडून प्रमाणपत्र मिळणे कठीण होते. अशा परिस्थितीत पात्र पत्रकार अपात्र ठरत असल्याचे अनेक प्रकरणे निदर्शनास आली आहेत. अशा प्रकरणांमध्ये सत्यता पडताळण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान मंत्यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या कामात निकषांबाबत तांत्रिक अडचणीतून मार्ग काढण्यास यंत्रणा स्थापन करण्याची गरज आहे. अनेक वृद्ध पत्रकार आजारी असूनही योजनांचा लाभ मिळवण्यासाठी प्रयत्न करत राहतात, मात्र विद्यमान यंत्रणेतील मर्यादांमुळे त्यांना अडचणी येत आहेत. जिल्हा स्तरावर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या या संदर्भात अधिक अधिकार देउन एक सक्षम आणि कायमस्वरूपी यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे, असे निर्देश उपसभापती डॉ. नीलम गो-हे यांनी दिले.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जीवनगाथा जगासमोर यावी-ॲड.आशिष शेलार

**मुंबई/प्रतिनिधी :**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार, कार्य आणि जीवनगाथा जगासमोर यावी, अशी राज्य शासनाची आणि सांस्कृतिक कार्य विभागाची भूमिका असल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ निर्मित 'खंजिरीचे बोल' या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनावर आधारित चित्रपटाच्या मुहूर्त सोहळ्यात ॲड शेलार बोलत होते. यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक अनंत महादेवन, चित्रपटाचा अभिनेता प्रसाद ओक, चित्रनगरीचे सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर उपस्थित होते.

यावेळी मंत्री ॲड.शेलार म्हणाले की, जीवनात केवळ सुखाचा पाठलाग न करता समाधानाचा शोध घेणे हीच मानवी उत्क्रांतीची खरी दिशा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भजन-कीर्तन, भक्ती आणि ग्रामसेवेच्या माध्यमातून समाजाला समाधानाचा मार्ग दाखवला. त्यांच्या ग्रामगीतामधून ग्रामविकास, आध्यात्मिक उन्नती आणि श्रमाची प्रतिष्ठा यांचा संदेश दिला गेला आहे. आज जग विकासाचे खरे मॉडेल शोधत असताना राष्ट्रसंतांनी दिलेला ग्रामविकासाचा मार्ग अत्यंत पायाभूत आणि वास्तववादी आहे.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा महान वारसा जतन-संवर्धन करण्याबरोबरच तो जगासमोर प्रभावीपणे मांडण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. त्यामुळेच महाराष्ट्र शासनाच्या योजनेंतर्गत या चित्रपट निर्मितीत शासनाचा सहभाग असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्याने पाठपुरावा करू न मार्गदर्शन करत असल्याचेही ॲड शेलार यांनी सांगितले. या चित्रपटासाठी दिग्दर्शक अनंत महादेवन यांच्या नेतृत्वाखालील टीमने जबाबदारी स्वीकारल्याचा आनंद व्यक्त करताना त्यांनी कलाकार प्रसाद ओक यांनी साकारलेली भूमिका प्रभावी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. हा चित्रपट भावी पिढीला विकासाचा खरा मार्ग दाखवणारा ठरेल आणि भक्तीबरोबरच सेवेमध्येही समाधानाचा मार्ग आहे, हा संदेश देश-विदेशात पोहोचवेल, असा विश्वासही मंत्री एड.शेलार यांनी व्यक्त केला. सांस्कृतिक कार्य विभागातर्गत चरित्रपट योजना राबविण्यात येते. या योजनेतर्गत हा चित्रपट निर्माण होत आहे. कल्चर कॅनवास इंटरटेमेंट ही संस्था निर्मितीचे काम करत आहे. यावेळी चित्रनगरीच्या विशेष कार्यकारी अधिकारी सुचित्रा देशपांडे, कल्चर कॅनवासचे कार्तिकी आणि शिवम यादव, डा.संतोष फुटाणे उपस्थित होते.

# नागपूरच्या इएसआयसी वैद्यकीय महाविद्यालयाचा लवकरच प्रस्ताव पाठविण्यात येणार- आरोग्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** नागपूर येथील कामगारांसाठी प्रस्तावित असलेल्या कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या (ESIC) वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रस्तावातील तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्या आहेत. राज्य शासनामार्फत याबाबत उपचलत असल्याची ग्वाही आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत दिली. नागपूरच्या कामगार रु ग्णालयात पडून असलेल्या ५० वैद्यकीय उपकरणांच्या (मशिन्स) प्रकरणाची आज चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याचे आदेशही श्री आबिटकर यांनी दिले. प्रश्नोत्तराच्या तासात आमदार प्रवीण दटके यांनी नागपूरच्या इएसआयसी मेडिकल कालेजचा प्रश्न उपस्थित केला होता. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, नागपुरात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबत शासन पूर्ण सकारात्मक आहे. २०२० मध्ये राज्य कामगार विमा योजनेत जे बदल झाले, त्यामुळे कर्मचा-यांचे वेतन, डेप्युटेशन आणि निवृत्ती वेतन याबाबत काही कायदेशीर व तांत्रिक गुंते निर्माण झाले होते. या तांत्रिक बाबींमध्ये दुरुस्ती करू न नवीन सामंजस्य करार (MoU) करण्यासाठी विनंती केली आहे. ही प्रक्रिया पूर्ण होताच तत्काळ संमती दिली जाईल. नागपूरच्या रु ग्णालयात यंत्रसामुग्री धूळ खात पडून असल्याच्या मुद्द्यावर मंत्यांनी गंभीर दखल घेतली. शासकीय निधीतून घेतलेली यंत्रसामग्री जर वापरली जात नसेल, तर या प्रकरणाची आजच्या आज चौकशी लावली जाईल आणि जे अधिकारी किंवा कर्मचारी यात दोषी आढळतील, त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.राज्यातील इएसआयसी रु ग्णालयांच्या सद्यस्थितीवर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, नवीन डायलिसिस युनिट्स, एनआयसीयू (NICU) आणि अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर्स सुरू करण्यात येत आहेत.

# महिलांच्या अर्थव्यवस्थेतील सहभागानेच सशक्त महाराष्ट्र घडेल-मुख्यमंत्री

## महिला व बालविकास विभागाचा सक्षम महिला-सशक्त महाराष्ट्र कार्यक्रम

**मुंबई/प्रतिनिधी :** शिक्षण व रोजगाराच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाव्दारे राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला गती प्राप्त होईल. आर्थिकदृष्ट्या सक्षम महिलांच्या अर्थव्यवस्थेतील सहभागानेच सशक्त महाराष्ट्र घडविता येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. महिला व बालविकास विभागाच्यावतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित सक्षम महिला-सशक्त महाराष्ट्र या विशेष कार्यक्रमात प्रतिकूल परिस्थितीवर मात करू न सक्षमपणे उभ्या राहिलेल्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुरस्कारप्राप्त महिलांचे अभिनंदन करत त्या इतर महिलांसाठी प्रेरणा ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमास विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, सचिव डा. अनुपकुमार यादव, आयुक्त नयना गुंडे, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या आयुक्तमाधवी सरदेशमुख, सहसचिव वि. रा. ठाकूर, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवाडे, उपायुक्त जमसिंग गिरासे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. महिला व बालविकास विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेत अनेक महिलांनी प्रगती साध्य केली आहे. अशाच प्रतिकुल परिस्थितीवर मात करत यशस्वी ठरलेल्या जळगाव येथील वैशाली हिवराळे, नाशिक येथील सेजल जडेजा, कुर्ला (मुंबई) येथील सरिता नाईक, परभणी येथील सुरेखा पवार, पुणे येथीलबागेश्वरी रेड्डी, रायगड जिल्ह्यात नोकरी करणा-या बीड येथील ज्योती मीरगणे, मुंबईत नोकरी करणा-या पुणे येथील सुवर्णा अग्रवाल, पूणे येथील मार्जेना दिलावर मणेर आणि मानसी पटेकर, तसेच किरण पांडे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जीवनाचा मार्ग प्रशस्त करणा-या या महिला समाजातील अनेक महिलांसाठी प्रेरणादायी ठरणार आहेत. हा केवळ सत्कार नसून त्यांच्या जीवनाचा सन्मान सोहळा आहे. विविध योजनांच्या माध्यमातून महिलांना रोजगार, शिक्षण आणि आर्थिक स्वातंर्त्य देण्याचे काम शासन करीत आहे. या प्रक्रियेतून महिला सक्षम बनणार असून, रोजगार, उद्योग आणि आर्थिक सक्षमीकरणातून महिलांचा राज्याच्या आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत सहभाग वाढणार आहे. यामुळे अर्थव्यवस्थेला गती मिळणार असून, सशक्त राष्ट्र घडविण्याची ही प्रक्रिया आहे, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विकसित भारत २०४७ लक्ष्य गाठायचे असल्यास महिलांचा अर्थव्यवस्थेत सहभाग असणे आवश्यक आहे, अशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भूमिका आहे. केंद्र सरकारने बेटी बचाव बेटी पढाव, लखपती दीदी सारख्या अनेक योजना राबवून महिलांना प्रत्येक क्षेत्रात संधी उपलब्ध करू न दिली आहे. विकसित महाराष्ट्र २०४७ हे लक्ष्य गाठण्यासाठी राज्यातही महिलांना आर्थिक बळ देउन त्यांचा मानव संसाधन म्हणून अर्थव्यवस्थेत सहभाग करू न घेण्यासाठी शासन कृतिशील आहे. विकसित राष्ट्रांनी अर्थव्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढविल्यामुळे अर्थव्यवस्था मजबूत झाली, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.दोन वर्षांत राज्यात ३७ लाख महिलांना लखपती दीदी बनवण्यात आले असून दरवर्षी एक लाख रु पयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळवणा-या महिलांची संख्या २०२६-२७ मध्ये एक कोटीपर्यंत नेण्याचा शासनाचा मानस आहे. यामुळे अर्थचक्र परिवर्तीत होणार आहे. संयुक्तराष्ट्रसंघाने हे वर्ष महिला शेतकरी वर्ष घोषित केल्याचा संदर्भ देत महिला शेतकरी, पशुपालक, कुक्कुटपालक आणि शेळीपालकांना सहाय करणा-या योजना राबविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## मनसेला मोठे यश; भाजपासोबत स्थापन केली सत्ता

# रेणापूर पंचायत समितीचे सभापतीपद

**मुंबई/प्रतिनिधी-** आज मनसेचा २० वा वर्धापन दिन साजरा होत असून, मनसेप्रमुखराज ठाकरे यांनीही रायगड येथे जाउन पक्षाचा वर्धापन दिन साजरा केला. दरम्यान, पक्षाच्या वर्धापन दिनी मनसेला मोठं यश मिळालं आहे. मनसेनं मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यामधील रेणापूर पंचायत समितीचं सभापतीपद पटकावलं आहे. रेणापूरमध्ये मनसे आणि भाजपा युतीची सत्ता आली असून, भाजपाच्या पाठिंब्याने येथे मनसेच्या मोनिका सूर्यवंशी सभापतीपदी विराजमान झाल्या आहेत. तर भाजपाचे शरद दरेकर यांनी उपसभापतीपद पटकावले आहे. गेल्या महिन्यात झालेल्या समितीच्या निवडणुकीत रेणापूर पंचायत समितीमधील आठ जागांपैकी तीन जागांवर भाजपाने विजय मिळवला होता. तर काँग्रेसलाही तीन जागा मिळाल्या होत्या. तर मनसेला २ जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे येथे मनसे किंगमेकरच्या भूमिकेत होती. तसेच मनसेचे दोन सदस्य ज्या पक्षाला पाठिंबा देणार, त्याची सत्ता येणार अशी परिस्थिती होती. अखेरीस मनसे आणि भाजपाची युती होउन पक्षाला सभापतीपदाची लाटरी लागली. रेणापूर पंचायत समितीचं सभापतीपद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव होतं. अशा परिस्थितीत सभापतीपदाची संधी कुणाला संधी मिळणार याबाबत उत्सुकता होती. दरम्यान, आज झालेल्या सभापतीपदाच्या निवडणुकीत भाजपा आणि मनसे युतीच्या मोनिका सूर्यवंशी यांनी बाजी मारली. तर भाजपाचे शरद दरेकर हे उपसभापतीपदाच्या निवडणुकीत विजयी झाले.

# भांडवली बाजारातील 'बॉण्ड' च्या माध्यमातून शहरांच्या विकासाला निधीचे बळ -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** महानगरपालिकांना आपल्या विविध विकास कामांसाठी भांडवली बाजारात बॉण्ड जारी करून निधी उभारता येतो. नाशिक महापालिकेप्रमाणे 'इनोव्हेटिव्ह फंड' निर्माण करून विकासाला निश्चितच निधीचे बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.ीकेसी येथील नॅशनल स्टाक एक्सचेंजमध्ये नाशिक महापालिकेच्या ग्रीन बाण्डचे लिस्टिंग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते 'रिंगिंग बेल' वाजवून करण्यात आले.

यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, नाशिकच्या महापौर श्रीमती हिमगौरी आहेर, उपमहापौर विलास शिंदे, स्थायी समिती सभापती मच्छिंद्र सानप, नॅशनल स्ट?क एक्सचेंजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष चौहान, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, नाशिक कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंग, महानगरपालिका आयुक्त श्रीमती मनीषा खत्री, आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाशिक महानगरपालिकेने एकाच आर्थिक वर्षात प्रथम खाजगी प्लेसमेंट आणि आता सार्वजनिकरित्या असे दोन्ही म्युनिसिपल बाण्ड जारी करू न या महापालिकेने भांडवली बाजारात प्रवेश केला आहे. भांडवली बाजाराच्या माध्यमातून महापालिकांनी निधी उभा करून लोकोपयोगी कामे केली पाहिजेत. यासाठी केंद्र शासनाने योजनादेखील घोषित केली आहे. पहिल्या टप्प्यात २०० कोटी रु पयांपर्यंतचे बाण्ड्स काढण्याकरिता केंद्राने मान्यता दिली होती. याचे यश बघता केंद्रीय अर्थसंकल्पात या बाण्डची मर्यादा १ हजार कोटी रु पयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. याकरिता देण्यात येणारे प्रोत्साहन मूल्यदेखील २०० कोटी रु पयांपर्यंत करण्यात आले आहे. कुंभमेळ्याच्या तयारीसाठी नाशिक महानगरक्षेत्रात जवळपास २५ हजार कोटींची विकासाची कामे सुरू करण्यात आली आहेत. कुंभमेळ्यासाठी करण्यात येणा-या विकास कामांमुळे निर्माण होणारी व्यवस्था कुंभ साठीच नाही, तर नाशिक शहर विकसित महानगरांच्या श्रेणीमध्ये आणण्यास कारणीभूत ठरणार आहे. यामुळे पुढील काळात नाशिक हे गुंतवणुकीचे चुंबक म्हणून उदयास येणार आहे, असा आशावादही मुख्यमंत्यांनी व्यक्त केला.

# नव्या ऑटो रिक्षा परवान्यांवर स्थगिती

## ■ सरकारचा मोठा निर्णय ■ वाहतूक कोंडीवर लगाम

**मुंबई / प्रतिनिधी-**एकीकडे बांगलादेशी नागरिकांना भारतातून हद्दपार करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. तर दुसरीकडे अनेक बांगलादेशी नागरिकांनी अवैधरित्या रिक्षाचा परवाना मिळाल्याच्या तक्रारी करण्यात येत आहे. या तक्रारींची दखल घेउन, तसेच वाढती वाहतूक कोंडी आणि प्रदूषण रोखण्यासाठी नव्या रिक्षा परवान्यांना सोमवारपासून स्थगिती देण्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक केली.



परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, राज्यातील अनेक मोठ्या शहरांमध्ये ऑटो रिक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यामुळे वाहतुकीवर मोठा ताण निर्माण होत असून ट्रॅफिक जामची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. विशेषतः मुंबई आणि उपनगरांमध्ये रिक्षांची संख्या प्रचंड वाढल्याने वाहतूक व्यवस्थापन अधिक कठीण झाले आहे. शहरांमधील रस्त्यांची क्षमता आणि वाहनांची वाढती संख्या यामध्ये मोठा तफावत निर्माण झाल्यामुळे काही काळासाठी नवीन परवाने देण्याची प्रक्रिया थांबवणे आवश्यक असल्याचे सरकारचे मत आहे. या निर्णयाबाबत केंद्र सरकारशी पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानंतररस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने राज्य सरकारला स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचा सल्ला दिला आहे. मोटार वाहन (सुधारणा) कायदा २०१९ अंतर्गत राज्य सरकारला वाहतूक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी आवश्यक अधिकार देण्यात आले आहेत. तसेच मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम ६७(३) नुसार राज्य सरकारला प्रवासी आणि मालवाहतुकीसंबंधी परवाने बदलण्याचा तसेच विविध योजना राबवण्याचा अधिकार आहे.

या अधिकारांचा वापर करू न वाहतूक कोंडी कमी करणे, लास्ट माईल कनेक्टिव्हिटी सुधारणे आणि शहरांमधील वाहतूक व्यवस्था नियंत्रित करणे शक्य असल्याचे केंद्राने स्पष्ट केले आहे.

सरनाईक यांनी पुढे सांगितले की, सध्या राज्यभरात सुमारे १४ लाख ऑटो रिक्षा परवाने वितरित करण्यात आले आहेत. काही ठिकाणी एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांना रिक्षा परवाने देण्यात आल्याच्या तक्रारी सरकारकडे आल्या आहेत. तसेच काही प्रकरणांमध्ये बांगलादेशी नागरिकांनाही अवैध पद्धतीने परवाने मिळाल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करून परवाना प्रणाली अधिक पारदर्शक आणि नियंत्रित करण्यासाठीच हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

**नवीन धोरण अंतिम झाल्यानंतरच पुन्हा परवाने**

राज्यातील पाच लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचा अधिकार राज्य सरकारकडे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे शहरांमधील स्थानिक परिस्थिती, वाहतुकीच्या गरजा आणि नागरिकांची सोय लक्षात घेउन नवीन धोरण तयार करण्यात येणार आहे. लवकरच स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे म्हणजेच एसओपी निश्चित करण्यात येईल. मंत्रिमंडळात चर्चा झाल्यानंतर आणि नवीन धोरण अंतिम झाल्यानंतरच राज्यात पुन्हा ऑटो रिक्षा परवाने देण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

# सिंहस्थ प्राधिकरणाला ३०६ कोटींचे अर्थसाहाय्य

## केंद्राकडून राज्याला बिनव्याजी कर्ज स्वरूपात निधी

**नाशिक :** केंद्र शासनाच्या -भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष साहाय्य योजनेंतर्गत नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाला ३०६ कोटी रु पयांचा निधी वितरीत करण्यात आला. ५० वर्षांच्या बिनव्याजी कर्जाच्या स्वरू पात हे अर्थसाहाय्य देण्यात आले आहे.केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष साहाय्य २०२५-२६' या योजनेंतर्गत राज्य शासनास भांडवली गुंतवणूक प्रकल्पांसाठी ५० वर्षांच्या बिनव्याजी कर्जाच्या स्वरू पात विशेष आर्थिक साहाय्य प्रदान करण्यात येते. यासंदर्भात केंद्र शासनाने सप्टेंबर २०२५ मध्ये मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत. या योजनेंतर्गत नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने सिंहस्थ कामांसाठी निधी उपलब्धतेकरिता राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. त्याला शासनाने मान्यता दिल्यानंतर चालू आर्थिक वर्षात ज्या कामांवर खर्च होईल, अशा कामांची यादी राज्याच्या वित्त विभागाने केंद्र शासनाला सादर केली होती. त्यातील ६४३.७५ कोटींच्या प्रकल्पांना केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे. त्यापैकी ३०६ कोटींचा निधी वितरणास राज्याच्या नगरविकास विभागाने मान्यता दिली आहे. यासंदर्भातील शासन आदेश जारी करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत प्राप्त होणा-या निधीसाठी कुंभमेळा आयुक्तांना समन्वय अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यांनी संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत केलेल्या निधी खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत समन्वय करावयाचा आहे. निधी मंजूर कामांवरच खर्च होईल, याचीही जबाबदारी कुंभमेळा आयुक्तांवर असणार आहे. काही रक्कम अखर्चित राहिल्यास ती अन्य कोणत्याही कामांवर खर्च करता येणार नाही, ती शासनाला परत पाठवावी लागणार आहे.



# घरकुल लाभार्थ्यांचे थकीत अनुदान लवकरच जमा होणार

## मंत्री जयकुमार गोरे यांची ग्वाही

**मुंबई/प्रतिनिधी :** विदर्भ-कोकण ग्रामीण बँकेच्या विलीनीकरणामुळे तांत्रिक अडचणीत सापडलेल्या मंगळवेढा तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांचे थकीत अनुदान लवकरच त्यांच्या खात्यावर जमा केले जाईल, असे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत सांगितले. मंगळवेढा मतदारसंघातील घरकुलाना निधी वितरित न होणे, घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास मोफत वाळू न मिळणे, जागेचे प्रलंबित प्रस्ताव आणि मनरेगाच्या थकीत मजुरीबाबतही आमदार समाधान आवताडे यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नांना उत्तर देताना मंत्री जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केले की, बँक विलीनीकरणामुळे आयएफएससी (क्ष्क्क्व) कोड बदलल्याने पेमेंट प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला होता. सध्या नवीन खाती अपडेट करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत सर्व पात्र लाभार्थ्यांचे पैसे डीबीटीद्वारे त्यांच्या खात्यात वर्ग केले जातील. एकाही लाभार्थ्याचे पेमेंट थांबणार नाही, ही शासनाची ठाम भूमिका आहे.घरकुलासाठी ५ ब्रास मोफत वाळू देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. आतापर्यंत दीड लाख लोकांनी याचा लाभ घेतला आहे. ज्यांना अद्याप वाळू मिळाली नाही, त्यांना ती उपलब्ध करून दिली जाईल, मात्र वाळूऐवजी रोख रक्कम देणे शक्य नाही. भूमिहीन लाभार्थी ज्यांच्याकडे स्वत?ची जागा नाही, अशा लाभार्थ्यांना शासन जमीन उपलब्ध करू न देईल किंवा जमीन खरेदीसाठी अर्थसाह्य करेल. प्रलंबित प्रस्तावांबाबत माहिती दिल्यास त्यावर तातडीने कारवाई करण्यात येईल. मनरेगा कर्मचा-यांच्या संपामुळे किंवा तांत्रिक कारणांमुळे रखडलेली मनरेगाची मजुरी लाभार्थ्यांना लवकर मिळावी यासाठी विशेष प्रयत्न केले जातील, असेही श्री गोरे यांनी सांगितले. या प्रश्नाच्या चर्चेत बिधनसभा सदस्य श्वेता महाले,राजेश पवार,सत्यजीत देशमुख यांनी प्रश्नाच्या चर्चेत सहभाग घेतला.

# महिला आयोगाला निधीची कमतरता भासू दणार नाही

## महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य महिला आयोगाच्या मागणीनुसार शासनामार्फत निधी उपलब्ध करु न दिला जातो. आयोगाला निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी विधानसभेत सांगितले. आयोगास मागणीनुसार दरवर्षी निधी वाढवून दिला जात असून यावर्षी १८ कोटी ३५ लाखांची तरतूद करण्यात येत असल्याची माहिती श्रीमती बोर्डीकर यांनी यावेळी दिली.सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री जयंत पाटील, विजय वडेट्टीवार यांनी सहभाग घेतला. राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर म्हणाल्या, महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाकरिता एकूण ३५ पदे मंजूर असून त्यापैकी नियमित १८ आणि बाह्ययंत्रणेद्वारे १७ कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सद्यस्थितीत आयोगातील कोणतेही पद रिक्त नाही. आयोगाचा नवीन आकृतीबंध आराखडा मंत्रिमंडळासमोर मांडला आहे. आराखडा मंजुरीनंतर वाढीव कर्मचा-यांच्या नियुक्त्या केल्या जातील. सध्या कंत्राटी कर्मचा-यांना नियमित करण्याचा विचार नाही. महिला दिनानिमित्त ८ मार्च रोजी एक पोर्टल लाँच करण्यात आले आहे. या माध्यमातून सायबर गुन्ह्यांचे निराकरण करण्यास मदत होणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

# राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे मुंबईत सपत्नीक आगमन

## मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी केले स्वागत

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा कार्यभार स्वीकारण्यासाठी तेलगंणाचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे आज मुंबई येथे सपत्नीक आगमन झाले. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते, पोलीस आयुक्तदेवेन भरती आदींनी त्यांचे स्वागत केले. लोकभवन येथे आगमन प्रसंगी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना पोलिसांतर्फे मानवंदना देण्यात आली. मंगळवार १० मार्च रोजी सायंकाळी ४.३० वाजता जिष्णु देव वर्मा राज्यपाल पदाची शपथ घेणार आहेत. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय त्यांना शपथ देतील.

# आता पुढचा नंबर चंद्रबाबू नायडूंचा

**पाटणा/वृत्तसंस्था**: नितीश कुमार यांनी मुख्यमंत्रीपद सोडून राज्यसभेत जाण्याच्या निर्णयावर बिहार काँग्रेसने भाजपवर जोरदार हल्ला चढवला आहे. राजेश राम म्हणाले की, होळीची धूम सुरू होण्यापूर्वीच बिहारमध्ये राजकीय घडामोडींना वेग आला होता. नितीश कुमार यांचा अचानक राज्यसभेत जाण्याचा निर्णय काँग्रेससाठी काही आश्चर्यकारक नाही. राजेश राम म्हणाले, आम्हाला आधीच माहीत होते की असे होईल. आमच्या भविष्यवाणीवर शिक्कामोर्तब झाले आहे. नितीश कुमार यांना डिजिटल अटक करण्यात आली आहे. मी अशीही भविष्यवाणी करतो की आता पुढचा नंबर एन. चंद्रबाबू नायडू यांचा असेल. बिहार काँग्रेस प्रदेशाध्यक्ष राजेश राम म्हणाले की, जेव्हा राहुल गांधींनी बिहारमध्ये मतदार वोटर यात्रा काढली होती, तेव्हा काँग्रेसने सांगितले होते की, बिहारमध्ये एनडीएचे सरकार बनले तर ते मतचोरीच्या आधारावर बनेल. त्यामुळे १४ नोव्हेंबर रोजी जे निवडणुकीचे निकाल आले, ते आमच्यासाठी आश्चर्यकारक नव्हते. आज जे नितीश कुमार यांचे घटनाक्रम आहे, ते आमच्यासाठी आश्चर्यकारक नाही.

**भाजप आणि जदयूची अनैसर्गिक युती आहे-** राजेश राम म्हणाले की काँग्रेस समोरू न लढते. भाजप मैत्री करू न हरवते आणि मागून खंजीर खुपसते. भाजप आणि जदयूची अनैसर्गिक युती राहिली आहे. शेवटी अशी कोणती परिस्थिती आली आहे की नितीश कुमार यांच्यासारखे नेते आपल्या आमदारांचे म्हणणेही ऐकत नाहीत. निवडणुकीचे निकाल लागल्यानंतरही आमदारांना मुख्यमंर्त्यांना भेटू दिले जात नाहीये. मी पाहिले की जदयूच्या बैठकीत मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यासाठी बसण्याची व्यवस्था कशी केली होती.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## युद्ध आणि महागाई

**इराणचे राष्ट्रपती मसूद यांनी शेजारी देशांवर हल्ले करणार नाही असे जाहीर केले. त्यानंतर अरेबियावर क्षेपणास्त्र हल्ला झाला. मसूद यांचे शब्द त्यांच्याच घशात गेले. पण यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे युद्धाचा पहिला फटका सर्वसामान्य भारतीयांना बसला. घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत ६० रुपयांनी वाढ झाली, तर व्यावसायिक सिलिंडरच्या दरात ११५ रुपयांनी वाढ झाली. ही वाढ अर्थातच पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षामुळे गॅसच्या पुरवठ्यात आलेल्या व्यत्ययामुळे असल्याचे सर्वश्रुत आहे. मात्र उज्ज्वला योजनेतील लाभार्थींना सवलत मिळत राहणार आहे, हा त्यातल्या त्यात दिलासा. गेल्या ११ महिन्यांतील गॅस किमतीत झालेली ही दूसरी वाढ. कोणत्याही युद्धाचा फटका सामान्यांना बसतो हे युद्धाच्या परिणामांचे जिवंत उदाहरण. आजची झालेली वाढ ही सरळ युद्धाचा परिणाम आहे. पण विरोधकांनी मोदी यांना टार्गेट करत त्यांच्यावर टीका केली. ते विसरतात, की काँग्रेसच्या काळातही २०१२-१३ आणि २०१४ मध्ये गॅस दर प्रचंड वाढले होते. त्यानंतर काँग्रेसचे सरकार कोसळले होते. आता मोदी यांच्यावर टीका केली जाते, की त्यांनी अनुदानाचा बोजा जनतेवर ढकलला. भारतातील पेट्रोलियम कंपन्यांनी गॅस सिलिंडरच्या किमतीत वाढ केली. कारण कच्च्या तेलाची वाहतूक महाग झाली. कारण होर्मुझची खाडी जिथून कच्चे तेल भारतात येते तो मार्ग इराणने बंद केला. तेलाच्या वाहनांना प्रचंड अडथळे येत आहेत. हे स्वाभाविक होते. पश्चिम आशियात सुरू असलेल्या इराण आणि अमेरिका तसेच इस्त्रायल यांच्यातील युद्धाचे चटके भारतीय गृहिणींना बसलेत. याला कारण युद्ध आहे हे खरे असले तरीही विरोधकांनी मोदी यांच्यावर निशाणा साधण्याचा प्रयत्न केला. मोदी यांना महागाईचा जनक असे म्हणणे म्हणजे विरोधकांच्या बुद्धीची दिवाळखोरी आहे. कारण काँग्रेसच्या काळात जेव्हा वीरप्पा मोईली हे पेट्रोलियम मंत्री होते तेव्हा त्यांच्यावर असा आरोप केला जाई, की पेट्रोलच्या किमती ते आधी वर जाऊ द्यायचे आणि जनतेने फार ओरड केली, की मग दर खाली आणायचे. २०१४ च्या काळात पेट्रोलचे दर गगनाला भिडले होते आणि त्यामुळेच काँग्रेस सरकार कोसळले. या दरवाढीचा बोजा ग्राहकांवर पडला आहे हे निश्चित. राजकारण जाऊ द्या बाजूला, पण सर्वसामान्य या दरवाढीच्या आगीत होरपळले आहेत हे वास्तव आहे. घरात दरवर्षी चार ते पाच सिलिंडर वापरले जातात असे गृहीत धरले तरीही हा खर्च वाढला. भारतात एलपीजीचा वापर १२.८ दशलक्ष टन इतका होतो. त्यावरून युद्धाचा फटका किती मोठा बसला आहे याची कल्पना येते. पण या दरवाढीचा परिणाम सर्वात जास्त होतो तो घरगुती खर्चावर. त्याचे डिस्पोझेबल उत्पन्न कमी होते. पश्चिम आशियातील युद्धामुळे तेल पुरवठ्यावर आणि गॅसच्या किमतीत वाढ झाली हे आपण पाहिलेच. भारत ६० टक्के एलपीजी आयात करतो आणि ८५ ते ९० टक्के एलपीजीची आयात ही शिपमेंट्समार्फत होते. सध्या हा मार्ग अडथळ्याचा झाला आहे. कारण इराणने हा मार्ग बंद केला. भारतात आज ३३.३ कोटी एलपीजी ग्राहक आहेत. त्यात १०.५ कोटी प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचे लाभार्थी आहेत. त्यांना प्रति सिलिंडर ३०० रुपये सवलत मिळते. घरगुती एलपीजीच्या किमती या आंतरराष्ट्रीय बेंचमार्क सौदी कंत्राटी किमतीशी जोडल्या आहेत. पण सौदी बेंचमार्क किमती वाढल्या तरीही एलपीजीवर त्याचा परिणाम होतोच असे नाही. ही माहिती समजण्यास अवघड आहे पण ग्राहकांनी इतकेच लक्षात ठेवायचे, की ही दरवाढ सामान्यांची कंबरडे मोडणारी आहे हे निश्चित. इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्थान पेट्रोलियमने ३९००० कोटी रुपयांचे नुकसान सहन करण्याची तयारी दर्शवली आहे. पण हे वास्तव आहे की अनेक देशांत एलपीजी भारतापेक्षा स्वस्त आहे. उदाहरणार्थ काठमांडूत एलपीजी १२०७रुपयांना मिळतो, तर श्रीलंकेत तो १२४१ रुपयांना मिळतो. २०२५ मध्ये गॅसच्या किमतीत अखेरची वाढ झाली होती. पण त्यावेळी युद्ध वगैरे काही नव्हते. आता मात्र युद्धामुळेच ही दरवाढ झाली आहे आणि त्याबद्दल भारताला काहीसा विचार करावा लागणार आहे. मोदी यांनी ट्रम्प यांना वेळोवेळी सुनावले आणि त्यांची धोरणे किती चुकीची आहेत हे त्यांना सांगितले. आता हे काही अगदी त्याच टर्ममध्ये बोलतात असे नाही. पण त्याचा अर्थ तोच असतो. हे मात्र खरे आहे, की पुरवठ्याच्या मार्गात व्यत्यय आल्यामुळे भारताला ही दरवाढ सोसावी लागली.अमेरिका-इराण संघर्ष सुरू झाल्यानंतर लगेचच १६ टक्के बेंचमार्क वाढले.त्याचा फटका भारताला बसला आहे. भारत ऊर्जेची आयात करणारा प्रमुख देश असल्याने भारतावर या युद्धाचा मोठा फटका बसणार हे स्पष्ट होते.पण आर्थिक परिणाम सर्वात भयंकर होणार, हे मात्र वास्तव आहे. कारण ऊर्जेच्या किमतीत प्रचंड वाढ झाल्यामुळे महागाई वाढते आणि त्याचा परिणाम लोकांच्या जीवनमानावर होतो. जर हे युद्ध अजून काही काळ चालू राहिले, तर किमती वाढतच राहतील असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.गॅसोलिनच्या किमतीत आणखी वाढ होईल असे त्यांचे म्हणणे आहे. ट्रम्प यांचे गॅस किमतीवरील भाष्य मात्र चिंता उत्पन्न करणारे आहे. ते म्हणाले, की किमती वाढल्या तर वाढू देत. त्यामुळे सर्वसामान्य माणसाचे हाल होतात हे त्यांना ठाऊक नसावे. पण त्यांनाही या युद्धाची किमत चुकवावी लागणारच आहे. कारण अमेरिकेत आता सार्वजनिक निवडणुका आहेत आणि त्यावेळी लोक याचा बदला घेतील यात काही शंका नाही.**

# युद्धझळांच्या तडाख्यात बळीराजा!

**“अस्मानी असो वा सुलतानी, कोणत्याही संकटामध्ये अंतिमत भरडला जातो तो देशातील अन्नदाता शेतकरीच! इराण आणि इस्त्रायल यांच्यातील युद्ध संघर्षाचीही झळ भारतातील शेती क्षेत्राला बसू लागली आहे. महाराष्ट्रातील कांदा आणि द्राक्ष उत्पादक तसेच पंजाब, हरयाणा आणि उत्तर प्रदेशातील बासमती तांदूळ पिकवणारे शेतकरी या युद्धाच्या छायेखाली आले आहेत. आखाती देशांतील अस्थिरतेमुळे केवळ नवीन ऑर्डर येणेच थांबले नाही, तर जुन्या पेमेंटची वसुलीदेखील कठीण झाली आहे. बहुतांश निर्यात ही पत धोरणावर (क्रेडिट) केली जाते, त्यामुळे युद्ध दीर्घकाळ चालल्यास निर्यातदारांचे कोटय़वधी रुपये अडकण्याची भीती आहे. जर निर्यातदारांना पैसे मिळाले नाहीत, तर त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांना मिळणाऱ्या भावावर होणार आहे; पण सरकारला या प्रश्नाचे गांभीर्य पुरेसे लक्षात आल्याचे दिसत नाही.”**

### उत्पादन खर्च वाढण्याची भीती

युद्धाचा परिणाम केवळ निर्यातीवरच थांबत नाही, तर तो शेतीच्या उत्पादन खर्चावरही होणार आहे. आखाती देशांतील संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या आणि नैसर्गिक वायूच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. भारताला लागणाऱ्या खतांच्या, विशेषत युरियाच्या उत्पादनासाठी नैसर्गिक वायूचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. जर गॅसच्या किमती वाढल्या तर खतांच्या किमतीतही वाढ होईल. याशिवाय डिझेलच्या दरात वाढ झाल्यास ट्रॅक्टर, मशागत आणि सिंचनासाठी लागणारा खर्च वाढून शेतकऱ्यांचा नफा आणखी कमी होईल.

इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या संघर्षाने आता केवळ आखाती देशांच्या सीमांपुरते मर्यादित न राहता जागतिक अर्थव्यवस्थेवर आपले विपरीत परिणाम उमटवण्यास सुरुवात केली आहे. भारतासाठी हा संघर्ष केवळ राजनैतिक चिंतेचा विषय नसून देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेवर घाला घालणारा ठरत आहे. विशेषत महाराष्ट्रातील कांदा आणि द्राक्ष उत्पादक तसेच पंजाब, हरयाणा आणि उत्तर प्रदेशातील बासमती तांदूळ पिकवणारे शेतकरी या युद्धाच्या छायेखाली आले आहेत. निर्यातीतील अडथळे, बंदरांवर अडकलेले कंटेनर आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील अनिश्चितता यामुळे भारतीय बळीराजाच्या डोळ्यांत पुन्हा एकदा पाणी येण्याची चिन्हे दिसत आहेत.

### कांदा आणि फलोत्पादनाचे नुकसान

महाराष्ट्र हे देशातील कांदा आणि फलोत्पादनाचे मुख्य केंद्र आहे. मात्र, आखातातील युद्धाने या क्षेत्राचे कंबरडे मोडले आहे. जवाहरलाल नेहरू बंदर अर्थात जेएनपीटी येथे नाशिक आणि महाराष्ट्राच्या इतर भागातून आलेले सुमारे १५० कंटेनर सध्या अडकून पडले आहेत. या कंटेनरमध्ये जवळपास ४,५०० टन कांदा असून त्याचे गंतव्य स्थान दुबई आणि इतर आखाती शहरे होते. दुबई हे भारतीय कांद्यासाठी एक प्रमुख व्यापारी केंद्र मानले जाते, जिथून संपूर्ण मध्यपूर्वेत कांद्याचा पुरवठा होतो. मात्र, युद्धामुळे दुबईची बाजारपेठ ठप्प झाली असून शिपिंग लाइन्सनी आपली वाहतूक तात्पुरती स्थगित केली आहे.



सध्या रमजानचा महिना सुरू असल्याने कांद्याला चांगला भाव मिळण्याची अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र निर्यात थांबल्याने हा सर्व माल आता स्थानिक बाजारपेठेत येण्याची शक्यता आहे, ज्यामुळे कांद्याचे दर कोसळण्याची भीती निर्माण झाली आहे. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेने या परिस्थितीवर चिंता व्यक्त करत शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १,५०० रुपये अनुदान देण्याची आणि बंदराचे शुल्क माफ करण्याची मागणी केली आहे. जोपर्यंत निर्यात पूर्ववत होत नाही, तोपर्यंत सरकारने मध्यस्थी करून खरेदी योजना राबवणे आवश्यक झाले आहे. केवळ कांदाच नव्हे, तर द्राक्षे आणि आंबा यांसारख्या नाशवंत पिकांवरही या युद्धाचा मोठा परिणाम झाला आहे. सुमारे ३,९०० टन द्राक्षे असलेले ३०० कंटेनर जहाजांवर चढवले गेले होते, परंतु युद्धामुळे ही जहाजे पुढे जाऊ शकली नाहीत. आता हा माल परत उतरवून स्थानिक बाजारात विकावा लागणार आहे. महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे उपाध्यक्ष मारुती चव्हाण यांच्या मते, सुमारे सहा हजार टन द्राक्ष उत्पादनावर याचा थेट परिणाम होणार आहे. निर्यातक्षम द्राक्षे जेव्हा स्थानिक बाजारात कमी दराने विकली जातात, तेव्हा शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होते.

महाराष्ट्रातील केळी उत्पादक शेतकऱ्यांनाही या युद्धाचा फटका बसू लागला असून सोलापूर जिल्ह्यातील करमाळा भागात याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. कोटय़वधी रुपयांची केळी निर्यात ठप्प झाली असून करमाळा येथील शीतगृहांमध्ये सुमारे १,२०० कंटेनर अडकून पडले आहेत. या संकटामुळे गेल्या दोन दिवसांपासून केळीची कापणी पूर्णपणे थांबविण्यात आली असून जिथे दररोज १,००० ते १,२०० टन केळीची कापणी होत असे, तिथे आता शुकशुकाट पसरला आहे. केवळ कापणीच नव्हे, तर आधीच निर्यातीसाठी पाठवलेले कंटेनरही आता मोठ्या अनिश्चिततेत अडकले आहेत. काही कंटेनर परदेशातून परत मागवले जात आहेत, तर इराणसारख्या देशांत पोहोचलेले कंटेनरही परत येत असल्याची माहिती समोर येत आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे जहाजे उपलब्ध नसल्याने शीतगृहात साठवलेला माल आता उतरवून घेण्याची वेळ उत्पादकांवर आली आहे. या सर्व भौगोलिक-राजकीय घडामोडींमुळे महाराष्ट्रातील केळी उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून त्यांचे अतोनात नुकसान होत आहे.

भारताच्या कृषी निर्यातीत बासमती तांदळाचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताच्या एकूण बासमती निर्यातीपैकी तब्बल ७२ टक्के निर्यात केवळ मध्यपूर्वेतील देशांना केली जाते. २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारताने ६० लाख टनांहून अधिक बासमती तांदळाची निर्यात करून ५०,३१२ कोटी रुपयांचे परकीय चलन मिळवले होते. त्यापैकी ३६,१३९ कोटी रुपये केवळ आखाती देशांतून आले होते. सौदी अरेबिया, इराक, इराण, संयुक्त अरब अमिराती आणि येमेन हे भारतीय बासमतीचे पाच सर्वात मोठे खरेदीदार आहेत.

इराण हा एकेकाळी भारतीय बासमतीचा सर्वात मोठा आयातदार होता. मात्र, गेल्या काही वर्षांपासून तिथल्या अंतर्गत घडामोडी आणि आताच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे इराणची आयात घटली आहे. पंजाब बासमती राईस एक्सपोर्टर्स असोसिएशनच्या मते, आखाती देशांतील अस्थिरतेमुळे केवळ नवीन ऑर्डर येणेच थांबले नाही, तर जुन्या पेमेंटची वसुलीदेखील कठीण झाली आहे. बहुतांश निर्यात ही पत धोरणावर (क्रेडिट) केली जाते. त्यामुळे युद्ध दीर्घकाळ चालल्यास निर्यातदारांचे कोटय़वधी रुपये अडकण्याची भीती आहे. जर निर्यातदारांना पैसे मिळाले नाहीत, तर त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांना मिळणाऱ्या भावावर होतो.

उत्तर प्रदेशातील शेतकरी नेते धर्मेंद्र मलीक यांनी व्यक्त केलेली भीती रास्त आहे की, निर्यात थांबल्यामुळे नवीन ऑर्डर्स मिळत नाहीत आणि जुन्या मालाची डिलिव्हरी अनिश्चित आहे. मसाला उत्पादक शेतकऱ्यांची अवस्थाही यापेक्षा वेगळी नाही. पंजाबमधील भटिंडा येथील शेतकऱ्यांच्या मते, हे केवळ आर्थिक नुकसान नसून मानवी संकटही आहे. कारण अनेक भारतीय कामगार त्या भागात अडकलेले आहेत.

### सरकारी हस्तक्षेपाची गरज

हरयाणातील शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सुरुवातीला हा फटका निर्यातदारांना बसत असल्याचे दिसत असले तरी शेवटी त्याचा भार शेतकऱ्यांच्या खांद्यावरच येतो. कर्ज काढून आणि घाम गाळून पिकवलेला माल जर वेळेवर विकला गेला नाही, तर शेतकरी आर्थिक गर्तेत सापडतो. अशा परिस्थितीत केंद्र सरकारने तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे.

निर्यात पत हमी महामंडळाच्या (ईसीजीसी) माध्यमातून निर्यातदारांच्या पेमेंटला हमी देणे, बंदरांवर अडकलेल्या मालासाठी विशेष सवलती जाहीर करणे आणि स्थानिक बाजारपेठेत दर कोसळू नयेत म्हणून हस्तक्षेप करणे हे उपाय योजणे काळाची गरज आहे. जर हे युद्ध लांबले तर भारताच्या कृषी विकासाचा वेग मंदावू शकतो. जागतिक बाजारपेठेत भारताचे स्थान मजबूत असले तरी भू-राजकीय तणावामुळे निर्माण झालेल्या या संकटातून शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी ठोस धोरणाची आवश्यकता आहे. अन्यथा, आखातातील युद्धाची धग भारतीय शेतातील पिकांना होरपळून काढल्याशिवाय राहणार नाही.

**नवनाथ वारे**

# धर्मांतर विरोधी कायदा कशासाठी?

**नुकतीच महाराष्ट्र मंत्री मंडळाने धर्मांतर विरोधी कायद्याला मंजुरी दिली असून भारतीय संविधानात धर्मनिरपेक्षतेचा कायदा असताना या कायद्याची आवश्यकता का? असा प्रश्न काही मंडळी विचारत आहेत त्यामुळे या कायद्याची आवश्यकता का? व कशासाठी? या प्रश्नाच्या खोलात जाणे आवश्यक आहे.**

**भा**रताच्या प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाचा अभ्यास केला तर लक्षात येते की भारताच्या सीमारेषा पश्चिमेत गांधार पर्यंत (वर्तमान पाकिस्तान) पूर्वेला ब्रह्मदेश (वर्तमान म्यानमार), थायलँड, मलेशिया, दक्षिणेत श्रीलंका, उत्तरेत नेपाळ आणि तिबेट पर्यंत पसरल्या होत्या त्यामुळे साहजिकच या संपूर्ण भूभागावरील संस्कृती, धार्मिक अधिष्ठान एक होते व म्हणूनच पारंपरिक वैदिक सनातन संस्कृतीचा वावर इथल्या समाजात होता. परंतु कालांतराने साम्राज्यवादी दृष्टिकोनातून झालेल्या आक्रमणांनी ही सीमारेषा लहान तर होत गेलीच पण सर्वात मोठा आघात हा त्या-त्या ठिकाणच्या संस्कृतीवर झाला. प्रारंभी च्या काळात भारतावर शक, कुशन आणि हून यांचे आक्रमण झाले परंतु हे आक्रमणकारी वैदिक संस्कृतीशी प्रेरित होऊन इथल्या संस्कृतीत एकजीव झाले. या नंतर झालेल्या परकीय आक्रमणातून मात्र भारताच्या सीमारेषा व संस्कृती दोन्हीचे पतन होत गेले.

भारतावर आक्रमण करणारा मुस्लीम सेनापती मुहम्मद बिन कासिम यांनी सर्वप्रथम सिंध प्रांतातील राजा दाहिरचा पराभव करून स्वतःचे साम्राज्य स्थापण्यास सुरुवात केली. अनेक मंदिरे व बौद्ध स्तूपांना त्यानी जमीनदोस्त केले. तलवारीच्या बळावर सिंध प्रांतातील हिंदू आणि बौद्धांचे जबरदस्तीने धर्मांतरण केले. हे धर्मांतरण जरी असले तरी सर्वात मोठे संस्कृतीकरण होते. उत्तरेत वाढत असलेल्या बौद्ध धर्माचे सुद्धा पतन याच काळात सुरू झाले. व वैदिक संस्कृतीचा सूर्यास्त होऊन इस्लामिक संस्कृतीचा सूर्योदय झाला. नंतर मुघली आक्रमणातून विशेषत: उत्तर भारतात वर्तमानातील गुजरात, उत्तर प्रदेश, राजस्थान, जम्मू काश्मीर, पंजाब, येथील हजारो मंदिरे उध्वस्त केल्या गेली. पुढे ज्या-ज्या प्रदेशात मुघली आक्रमण वाढत गेले त्या-त्या प्रदेशात जबरदस्तीने धर्मांतरण आणि मंदिरांचे विध्वंस केल्या गेले. मुर्त्यांची मोठ्या प्रमाणात विटंबना केली गेली.

ई.स. १६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली. व्यापार करण्याच्या उद्देशाने आलेले ब्रिटिश एका हातात तराजू आणि दुसऱ्या हातात बायबल घेऊन आले. ब्रिटिश व्यापाऱ्यांसोबतच ख्रिस्ती धर्म प्रसारासाठी अनेक ख्रिस्ती धर्मप्रसारक सुद्धा आले. अशा प्रकारे भारतात मुस्लिम धर्मांतरना नंतर ख्रिस्ती धर्मांतरण सुरू झाले. ख्रिस्ती धर्म प्रचारकांनी प्रारंभी भारतातील जनजाती व अतिदुर्गम प्रदेश धर्मप्रसारासाठी निवडला कारण या भागात दारिद्र्य आणि शिक्षणाचा सर्वाधिक अभाव होता. अशा ठिकाणी मिशनरी संस्थेच्या माध्यमातून बौद्धिक आधारावर धर्म प्रसाराची सुरुवात केल्या गेली. गरीब भोळ्या- भाबळ्या जनजाती समाजाला लालच देऊन धर्मांतरित केले जाऊ लागले. भारतातील पूर्वोत्तर प्रदेश ख्रिस्ती धर्म प्रसाराचे केंद्र बनले. धर्मांतरणामुळे फक्त धर्मावर आघात झाला नाही तर जनजातीय संस्कृतीवर याचा सर्वाधिक प्रभाव पडला. स्वतंत्र भारतात सुद्धा मिशनरींचे कार्य आजतयागयत सुरूच आहे. महाराष्ट्रातील मेळघाट, नंदुरबार, गडचिरोली, पालघर सारखे जनजाती प्रदेश मिशनरीच्या धर्मांतरणाचे सर्वाधिक शिकार झाले आहेत.

एक प्रसंग अजूनही माझ्या डोळ्यासमोर आहे. सामाजिक अभ्यासाच्या दृष्टीने मेळघाटात जाणे झाले. काही कोरकू बांधवांना आम्ही भेटलो. ख्रिस्ती धर्मांतरानंतर परत हिंदू धर्मात आलेले बांधव होते. त्यांनी त्यावेळी आमच्या जवळ ख्रिस्ती धर्मप्रसारकांची दिवाळखोरी मांडली, की कशा प्रकारे भोळ्या जनजाती समाजाला हे धर्मप्रसारक भ्रमित करतात. संबंधित व्यक्तींनी आम्हाला सांगितले की असाच एक पादरी आमच्या घरी आला त्याने सर्वप्रथम त्यांच्या पिशवीत असलेला क्रॉस काढला आणि घरातून हिंदू देवतेची मूर्ती आणायला लावली सोबतच एका खोल भांड्यात पाणी सुद्धा आणायला लावले. मी आणलेली शंकराची पिंड त्या पाण्यात त्यांनी टाकली ती दगडाची असल्याने साहजिकचं ती खाली पाण्यात जाऊन बसली त्या नंतर त्याच्या हातातला क्रॉस त्यानी पाण्यात टाकला पण तो पाण्यावर तरंगू लागला. मला काही कळले नाही पण त्या नंतर तो जे बोलला ते आमच्यासाठी नवीन होते. जो देव स्वत: पाण्यात डुबतो तो तुम्हाला काय वाचवणार? असे त्याचे उद्गार होते. त्या क्षणी मला माहीत नव्हते की तो क्रॉस लाकडाचा होता. व त्या नंतर तो पादरी नियमित घरी येत गेला. बी-बियानांची वेळोवेळी मदत केली आणि आम्ही सुद्धा चर्च मध्ये जाऊ लागलो. आम्हाला सांगण्यात आले की तुम्ही ज्या हिंदू देवी-देवतांची पूजा करता ते सगळे राक्षस आहेत. आम्ही सर्व हिंदू देव-देवस्की आणि पारंपारिक आदिवासी पूजा देखील बंद केली. आणि ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला.

विदेशी मिशनरींनी वर्तमानात भारतीय ख्रिस्ती धर्म प्रसाराचे कार्य भारतातील धर्मांतरित ख्रिस्तींच्या खांद्यावरच सोपवले आहे. कारण त्यांना कळून चुकले आहे की बाहेरचा व्यक्ती आला तर त्याला विरोध होईल. त्यांना वेळोवेळी योग्य प्रशिक्षण सुद्धा देण्यात येते. स्थानिक भाषेत बोलणारा पादरी सहज स्थानिकांमध्ये मिसळतो व धर्मांतरण सोईचे होते. पालघर मधील साधूंच्या हत्येनंतर केलेल्या तपासात लोकांना भडकविण्यात मिशनरींचा हात असल्याचे सिद्ध झाले कारण साधू लोकांना अनैतिक धर्मांतरणाच्या विरोधात सावध करत होते. सेवेचा भाव निस्वार्थ असावा लागतो पण मिशनरींनी सेवेच्या बदल्यात लाखो भारतीयांचे धर्मांतरण केले. व आजही अगदी हिंदू परंपराची सरमिसळ करून पादरी भोळ्या समाजाला भ्रमित करतात. म्हणूनच अशा धूर्त धर्मप्रचारकांवर पायबंद घालून कठोर कारवाई व्हावी या उद्देशाने धर्मांतर विरोधी कायद्याची आवश्यकता आहे.

जनजाती समाज धर्मांतरणाच्या विरोध जागृत झाला असून. धर्मांतरित आदिवासींचे डी-लिस्टिंग व्हावे या मागणीचे आंदोलन गेल्या वर्षात नागपूर, नंदुरबार, नाशिक, पालघर सारख्या ठिकाणी मोठ्या संख्येसह झाले. स्वर्गीय माजी राज्यसभा खासदार कार्तिक उरांव यांनी सुद्धा वेळोवेळी डी-लिस्टिंग ची मागणी सरकार दरबारी केली. भारताची मूळ संस्कृती जनजाती समुदायानी जतन केली आहे. त्यांच्या प्रत्येक रूढी, परंपरा शास्त्रसुद्ध आणि निसर्गाला धरून आहेत पण धर्मांतरीत जनजाती या रूढी-परंपरांचा त्याग व विरोध करतात म्हणूनच भारतीय संस्कृती टिकवायची असेल तर अवैध धर्मांतरणाला कायद्याच्या चौकटीत उभे करावे लागेल म्हणूनच धर्मांतर विरोधी कायद्याची आवश्यकता आहे.

**-डॉ.दुर्गेश साठवणे**
नागपूर-८२०८०६८८५३

## ‘निशाणा’ सत्तेच्या सारीपाटावर?

**संवाद**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गट अध्यक्ष अजित पवार यांचा बारामती येथे झालेल्या दुर्दैवी विमान अपघातात मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असला, तरी या अपघाताच्या ढिगाऱ्याखाली दडलेले राजकारण आता एका वेगळ्या आणि संशयास्पद वळणावर येऊन ठेपले आहे.एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरोच्या प्राथमिक अहवालानुसार, बारामती विमानतळ परिसरात दाट धुके होते आणि लँडिंगच्या दुसऱ्या प्रयत्नात विमानाचा ताबा सुटला. अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनीही अत्यंत संयमी भूमिका घेत,‘हा केवळ प्राथमिक अहवाल आहे, पूर्ण अहवाल आल्याशिवाय मी भाष्य करणार नाही,’ असे स्पष्ट केले आहे. मात्र, दुसरीकडे राष्ट्रवादी (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार हे सातत्याने या अपघातावर संशय व्यक्त करत आहेत.

रोहित पवार यांनी नुकतीच राहुल गांधी आणि अरविंद केजरीवाल यांची भेट घेतली. येत्या काही दिवसांत ते अखिलेश यादव आणि तेजस्वी यादव यांसारख्या ‘इंडिया’ आघाडीच्या बड्या नेत्यांचीही भेट घेणार आहेत. खरं तर शरद पवार गटाकडे स्वतःचे ८ खासदार असताना, रोहित पवारांना या मुद्द्यासाठी परराज्यातील नेत्यांकडे जाण्याची गरज का भासली? रोहित पवारांचे लक्ष केवळ ‘तपास’ नसून, या निमित्ताने स्वतःला राष्ट्रीय स्तरावर एक महत्त्वाचा नेता म्हणून प्रस्थापित करणे, हे असू शकते.

रोहित पवार सध्या दुहेरी संकटात आहेत. त्यांच्या उद्योगांची केंद्रीय यंत्रणांमार्फत चौकशी सुरू आहे, तर दुसरीकडे पुणे क्रिकेट असोसिएशनमधील मतदार यादीतील घोळाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने त्यांच्यावर ओढलेले ताशेरे ताजे आहेत. या कायदेशीर कचाट्यातून सुटण्यासाठी किंवा जनतेचे लक्ष मूळ मुद्द्यांवरून विचलित करण्यासाठी, ते ‘अजितदादांच्या अपघाताचा’ भावनिक मुद्दा राष्ट्रीय पातळीवर लावून धरण्याचा प्रयत्न करत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.तूर्तास तरी, रोहित पवारांच्या ‘निगाहें’ अपघाताच्या तपासावर असल्या तरी त्यांचा खरा ‘निशाणा’ सत्तेच्या सारीपाटावर स्वतःचे स्थान बळकट करणे हाच आहे, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट होत आहे.

**अविनाश देशपांडे**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

व्याजाच्या जाळ्यात अडकवून शेतजमिनी गिळंकृत

# ‘निवृत्त’ पांढरपेशी सावकारी माफिया



■ जनमाध्यम प्रतिनिधी
अरविंद तेलंगे

**राळेगाव :** यवतमाळ जिल्ह्यातील कळंब आणि राळेगाव तालुक्यात काही निवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांनी अवैध सावकारीचा धंदा सुरू केल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. सामाजिक बांधकाम, शिक्षण व इतर विभागांतून निवृत्त झालेल्या काही पांढरपेशी व्यक्ती गरजू नागरिकांना तातडीने कर्ज देण्याचे आमिष दाखवून व्याजाच्या जाळ्यात अडकवत असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कर्ज देताना सुरक्षेच्या नावाखाली कोऱ्या कागदांवर सह्या घेणे, बोगस नोटरी करून घेणे किंवा कोरे चेक घेणे हा त्यांचा मुख्य डाव असल्याचे सांगितले जाते. एकदा कर्जदार व्याजाच्या विळख्यात अडकला की, मुदलापेक्षा व्याजाची रक्कम वाढवून दाखवत त्याच्या मालकीच्या शेतजमिनी किंवा प्लॉट स्वतःच्या नावावर करून घेण्यासाठी दबाव टाकला जातो. कळंब व राळेगाव परिसरात अशा अनेक जमिनींचे व्यवहार या सावकारी जाळ्यातून झाल्याची चर्चा रंगू लागली आहे.

विशेष म्हणजे, शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या या व्यक्तींकडे आज कोट्यवधींची स्थावर आणि जंगम मालमत्ता असल्याचे सांगितले जाते. उत्पन्नाच्या मर्यादित साधनांच्या तुलनेत ही संपत्ती प्रचंड असल्याने प्राप्तिकर विभाग व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.अवैध सावकारी प्रतिबंधक कायद्यानुसार परवान्याशिवाय व्याजाचा धंदा करणे गुन्हा असताना देखील या प्रकाराकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे. तक्रारदारांना धमकावण्याचे प्रकारही घडत असल्याची चर्चा आहे.या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सखोल चौकशी करतील का, की अवैध सावकारीला असेच अभय मिळत राहील, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

ग्रो कॅपिटल आर्थिक घोटाळा

# मास्टरमाईंड ‘बंटी–बबली’ अटकेत

■ जनमाध्यम प्रतिनिधी



**दिग्रस :** ज्यादा परताव्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गाजत असलेल्या ग्रो कॅपिटल आर्थिक घोटाळ्यात अखेर मोठी कारवाई झाली आहे. या प्रकरणातील कथित मास्टरमाइंड म्हणून ओळखले जाणारे पुष्पांजली दिनेश रंधेरिया आणि मनोज अशोक पाटील उर्फ ङ्कबंटी–बबलीङ्क यांना अटक करण्यात पुसद पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. या दोघांची न्यायालयात हजेरी लावल्यानंतर त्यांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली असून या अटकेमुळे प्रकरणाच्या तपासाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.दिग्रस शहरात जादा परताव्याचे आमिष दाखवत सात जणांच्या टोळीने तब्बल ७ कोटी ४३ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. शिक्षक, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांना लक्ष्य करून ही फसवणूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात आधीच दिग्रस येथील केंद्रप्रमुख गिरीश दुधे, त्याचा भाऊ शिक्षक विनोदकुमार दुधे आणि गिरीश दुधेचा मुलगा मंदार दुधे यांना अटक झाली असून ते सध्या यवतमाळ कारागृहात आहेत.

तपासादरम्यान या संपूर्ण जाळ्यामागे विश्वांजली आणि ग्रो कॅपिटल या कंपन्यांचे कथित मालक पुष्पांजली रंधेरिया आणि मनोज पाटील यांचा प्रमुख हात असल्याची माहिती समोर आली. ङ्कबंटी–बबलीङ्क या चित्रपटाच्या धर्तीवर या दोघांनी एक टीम तयार करून सर्वसामान्य नागरिकांना जादा परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप आहे. माहितीनुसार, दिग्रस येथील केंद्रप्रमुख गिरीश दुधे हा या दोघांच्या संपर्कात आला आणि कमिशनच्या आमिषाला बळी पडला. त्याच्या माध्यमातून अनेकांनी गुंतवणूक केली. मात्र आतापर्यंत केवळ ३७ गुंतवणूकदारांनी पोलिसांकडे अधिकृत तक्रार नोंदवली आहे.

या आर्थिक घोटाळ्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी जे यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक रवी चव्हाण, सुनील मदने, पंकज पातुरकर, राहुल मडावी व पुसद पोलिस गेल्या दोन महिन्यांपासून करीत आहेत.दरम्यान मुख्य सूत्रधार समजल्या जाणाऱ्या ङ्कबंटी–बबलीङ्क जोडीच्या अटकेमुळे तपास अधिक वेगाने पुढे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रकरणात अजून काही धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने आता पोलिस पुढे कोणती कारवाई करतात आणि गुंतवणूकदारांना न्याय कसा मिळतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ग्रामीण भागात डिजिटल साक्षरतेचा नवा अध्याय..!

■ जनमाध्यम प्रतिनिधी

‘डिजिटल सखी’ प्रकल्पाचा आढावा



**राळेगाव** – ग्रामीण भागातील नागरिकांना आर्थिक मुख्य प्रवाहाशी जोडणे, डिजिटल व्यवहारांची सवय लावणे आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या ‘डिजिटल सखी’ प्रकल्पाच्या कामाचा आढावा घेण्यासाठी राळेगाव तालुक्यात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले. अफार्म पुणे व फिनास्टरा यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या डिजिटल वित्तीय समावेशन कार्यक्रमांतर्गत ही बैठक रावेरी येथे पार पडली. ६ मार्च २०२६ रोजी रावेरी येथील सीतामाता प्रशिक्षण हॉलमध्ये आयोजित या बैठकीस तालुक्यातील १५ गावांतील लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी आणि डिजिटल सखी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण नागरिकांमध्ये डिजिटल व्यवहार, आर्थिक साक्षरता आणि विविध शासकीय योजनांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी पुढील कालावधीतील नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी कृषी सहाय्यक अधिकारी वानखडे मॅडम व किनवटकर मॅडम यांनी शेतकऱ्यांसाठी असलेल्या अख अर्वि चरहर–उ्हढ योजनांची माहिती दिली. जिल्हा संसाधन व्यक्ती सुमित राऊत यांनी झचऋचए योजनेविषयी मार्गदर्शन करत ग्रामीण भागातील लघुउद्योगांना उपलब्ध संधींचा आढावा घेतला. तसेच राळेगाव पोस्ट ऑफिसच्या अधिकारी तन्वी ठक व पोस्टमास्तर वनकर यांनी पोस्ट ऑफिसच्या विविध बचत व गुंतवणूक योजनांची माहिती दिली.

बैठकीत १५ गावांमध्ये डिजिटल सखींच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कामाचा आढावा घेण्यात आला. भीम णझख, आधार पे तसेच विविध विमा योजनांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता वाढविण्यासाठी डिजिटल सखींची भूमिका अधिक प्रभावी करण्यावर भर देण्यात आला. तसेच ग्रामीण भागातील नेटवर्क व तांत्रिक अडचणींवरही चर्चा करण्यात आली.

पुढील काही महिन्यांत १५ गावे पूर्णतः डिजिटल साक्षर करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. ग्रामीण भागाच्या सक्षमीकरणासाठी ‘डिजिटल सखी’ प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

२४ लाखांपर्यंत अनुदान, ५ एप्रिलपर्यंत ऑनलाईन अर्ज करावे

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांचे आवाहन

# महिला शेतकरी गटांना गावस्तरावर कृषी अवजारे बँक स्थापन करण्याची संधी !

■ जनमाध्यम प्रतिनिधी



**यवतमाळ :** महाराष्ट्र शासनाचा नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा हा जागतिक बँकेच्या सहाय्याने राबविण्यात येत असून यात यवतमाळ जिल्ह्यातील ५५९ गावे समाविष्ट आहेत. या पार्श्वभूमीवर कृषि यांत्रिकीकरणाला चालना देणे आवश्यक असून, सर्व शेतकऱ्यांना यंत्रसामग्री खरेदी करणे शक्य नसल्याने गावस्तरावर नोंदणीकृत महिला बचत गटांमार्फत ‘गावस्तरावरील कृषि अवजारे बँक‘ स्थापन करण्यासाठी ५ एप्रिलपर्यत अर्ज मागविण्यात आले आहेत.

तसेच ही बँक स्थापन करून अनुदानित यंत्रसामग्री भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना वेळेत व अचूक शेतीकाम करून उत्पादकता व नफा वाढविता येणार आहे. त्याकरिता प्रकल्प गावांमध्ये ‘एक गाव, एक कृषी औजारे बँक‘ या तत्त्वानुसार कृषी अवजारे बँक स्थापन करण्यासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. या योजनेचा मुख्य उद्देश शेतीकामासाठी लागणारी यंत्रसामग्री भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांचे श्रम आणि खर्च कमी करणे हा आहे.

या घटकाकरिता प्रकल्प गावातील उमेद व माविम पुरस्कृत महिला बचत गट तसेच महिला गाव संघ या योजनेसाठी पात्र राहतील. अर्ज करण्यासाठी इच्छुक महिला गटांनी एफपीओ–डीबीटी पोर्टलच्या https://dbt-ndks.mahaocra.gov.in/ या संकेतस्थळावर ५ एप्रिल २०२६ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक राहणार आहे.

एका गावातून एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास, जिल्हा स्तरावर ऑनलाईन लॉटरी पद्धतीने लाभार्थ्यांची निवड केली जाईल. अर्जदार महिला बचत गटांमध्ये वेगवेगळ्या कुटुंबातील किमान १० महिला सदस्य असणे आवश्यक आहे. कृषि अवजारे बँकांसाठी प्रकल्प मूल्याच्या ६० टक्के अनुदान देय राहील आणि अनुदानाची कमाल मर्यादा रक्कम २४ लाख इतकी राहील. ज्या गटांना यापूर्वी कोणत्याही योजनेतून कृषी अवजारे बँकेसाठी लाभ देण्यात आला आहे, असे गट या घटकांतर्गत लाभास पात्र राहणार नाहीत. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विभाग कार्यालयास भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

## पारवा जि.प. कन्या शाळेत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



**घाटंजी (तालुका प्रतिनिधी) :** पंचायत समिती घाटंजी अंतर्गत पारवा येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी कन्या शाळेत जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थिनी आणि माता–पालकांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पारवा ग्रामपंचायतीच्या सरपंच संगीताताई मडावी होत्या, तर उद्घाटक म्हणून शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा उषाताई चौधरी उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी म्हणून पारवा पोलीस स्टेशनच्या महिला पोलीस कर्मचारी रंजना मसराम तसेच आरोग्य विभागाच्या एस.टी. घोडाम आणि निमा इंदूरकर यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी संगीताताई मडावी यांनी महिला दिन हा स्त्रीशक्तीचा गौरव करणारा दिवस असून महिलांना आत्मविश्वासाने पुढे जाण्याची प्रेरणा देणारा असल्याचे प्रतिपादन केले. रंजना मसराम यांनी महिला सक्षमीकरण, महिलांची सुरक्षितता, त्यांचे अधिकार व कर्तव्य तसेच पोलीस प्रशासनाची मदत कशी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. आरोग्य विभागाकडून महिलांनी आरोग्याची काळजी कशी घ्यावी याची माहिती देण्यात आली, तर पर्यावरण संवर्धनाबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमात विद्यार्थिनींनी विविध क्षेत्रातील महिलांची वेशभूषा साकारून उपस्थितांची मने जिंकली. मनस्वी बिरकुरवार हिने सैनिक, अर्णवी आरेवार हिने डॉक्टर, अर्पिता कुत्तरमारे हिने अभियंता, सना सय्यद हिने वैमानिक, आलिया शेख हिने शिक्षिका, अनुश्री बल्लूरवार हिने माता रमाबाई, मानसी इसपाडे हिने सावित्रीबाई फुले, अमृता बोगावार हिने वैज्ञानिक तर निकिता तोडसाम हिने महिला शेतकरीची भूमिका साकारली.

कार्यक्रमात उपस्थित महिलांनी आपले अनुभव मांडत महिला सशक्तीकरणासाठी शिक्षण आणि आत्मविश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे संचालन सहाय्यक शिक्षक प्रशांत भेदूरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका कु. गीता मानकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती व पोषण आहाराच्या मदतनीसांनी परिश्रम घेतले.

## पुसदच्या परिमल यादव यांची PSI पदासाठी निवड



**पुसद (प्रतिनिधी) :** पुसद येथील परिमल अर्चना गोपाल यादव यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदासाठी निवड झाली असून त्यांच्या यशामुळे शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. बेलापूर येथील चझडउ कार्यालयात गट ‘ब’ पदांसाठी नुकतीच मुलाखत प्रक्रिया पार पडली. या भरती प्रक्रियेत एकूण २१६ पदांसाठी निवड करण्यात आली असून जाहीर झालेल्या निकालात परिमल यादव यांनी झडख पद पटकावले.

परिमल यादव यापूर्वी सवाना येथील ग्रामीण रुग्णालयात तृतीय श्रेणी सेवा लिपिक म्हणून कार्यरत होते. या यशानंतर हरि रामायण मंडळाच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. मित्रांनी वसंतनगर ते शिवाजी चौकापर्यंत ढोल–ताशांच्या गजरात मिरवणूक काढत मिठाई वाटून आनंद साजरा केला. परिमलचे आई–वडील अर्चना यादव व गोपाळ यादव हे दोघेही जिल्हा परिषद शाळेत शिक्षक आहेत. सामान्य कुटुंबातून आलेल्या परिमल यांनी कठोर परिश्रम व जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# जागतिक महिला दिनी काश्यपी दोंदलचा एपस्टीन फाईलविरोधात निषेध

■ जनमाध्यम प्रतिनिधी



**यवतमाळ :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने यवतमाळ शहरात आयोजित करण्यात आलेल्या निषेध रॅलीत बालकांवरील अत्याचार आणि मानवी तस्करीविरोधात जोरदार आवाज उठविण्यात आला. आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजत असलेल्या जेफ्री एपस्टीन फाईल प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई व्हावी, या मागणीसाठी विविध सामाजिक संघटना व महिला संघटनांच्या वतीने ही रॅली काढण्यात आली.

या रॅलीमध्ये महिलांसह तरुणी आणि लहान मुलींचाही उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. विशेष म्हणजे योद्धा जिजाऊंच्या प्रेरणेने काश्यपी विजय दोंदल या चिमुरडीने हातात प्रतिकात्मक तलवार घेऊन निषेध व्यक्त करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. अन्यायाविरुद्ध लढण्याचा संदेश देत तिने रॅलीत सक्रिय सहभाग नोंदवला.

समता मैदान येथून सुरू झालेली ही रॅली शहरातील प्रमुख मार्गाने संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे पोहोचली. येथे निदर्शने करून बालकांवरील अत्याचार, बलात्कार आणि मानवी तस्करीच्या घटनांचा तीव्र निषेध करण्यात आला. उपस्थितांनी घोषणाबाजी करत एपस्टीन फाईल प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

रॅलीदरम्यान अनेक महिलांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सांगितले की, जगभरात तसेच देशात अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये सामील असलेल्या प्रभावशाली व्यक्तींवरही कायद्याप्रमाणे कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच पीडितांना न्याय मिळावा, हीच या आंदोलनाची प्रमुख भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रखरखत्या उन्हात काढण्यात आलेल्या या रॅलीत महिला, युवक आणि लहान मुलींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचा आणि समाजात जागृती निर्माण करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

यवतमाळ बसस्थानकात महिलांच्या रांगा

# ५०% सवलतीसाठी स्मार्ट कार्ड सक्ती..!

■ जनमाध्यम प्रतिनिधी



**यवतमाळ :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसप्रवासात महिलांना दिल्या जाणाऱ्या ५० टक्के सवलतीचा लाभ घेण्यासाठी आता नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (छउचउ) म्हणजेच स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. या निर्णयामुळे यवतमाळ बसस्थानकात महिलांसह ज्येष्ठ नागरिकांची मोठी गर्दी होत असून कार्ड काढण्यासाठी लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. महाराष्ट्र शासनाने २०२३ पासून ङ्कमहिला सन्मान योजनाङ्क अंतर्गत एसटी बसप्रवासात महिलांना भाड्यात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला होता. या योजनेचा राज्यभरातील महिलांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला असून एसटी बसमधील महिला प्रवाशांची संख्या देखील लक्षणीयरीत्या वाढली आहे.

मात्र अलीकडे एसटी महामंडळाने डिजिटल व्यवहाराला चालना देण्यासाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड प्रणाली लागू केली आहे. या कार्डसाठी सुमारे १९९ रुपये शुल्क आकारले जात असून त्यामध्ये काही रक्कम शिल्लक ठेवणे आवश्यक असल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे पूर्वी केवळ ओळखपत्र दाखवून सवलतीत प्रवास करणाऱ्या महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना आता हे कार्ड काढणे बंधनकारक झाले आहे.

यवतमाळ बसस्थानकात कार्ड काढण्यासाठी महिलांच्या व ज्येष्ठ नागरिकांच्या मोठ्या रांगा लागल्या असून ग्रामीण भागातून आलेल्या महिलांना उन्हात उभे राहून तासन्?तास प्रतीक्षा करावी लागत आहे. यामुळे प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या संदर्भात प्रा. पंढरी पाठे, सोशल मीडिया काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके, सुरेश कुमरे व कॉम्रेड सचिन मनवर यांनी या निर्णयाचा निषेध नोंदविला आहे. महिलांना सवलतीच्या नावाखाली कार्डसाठी शुल्क आकारणे योग्य नसून शासनाने तातडीने प्रक्रिया सुलभ करून प्रवाशांना दिलासा द्यावा, अन्यथा जनआंदोलन उभारण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# ‘भाऊंच्या’ आशीर्वादाने गुंजमध्ये सुरेशचा हैदोस?

■ जनमाध्यम प्रतिनिधी




**महागाव :** महागाव तालुक्यातील गुंज परिसरात गेल्या काही महिन्यांपासून मटका, जुगार, अवैध दारूविक्री आणि हाणामाऱ्या यांसारख्या गुन्हेगारी प्रकारांनी डोकेवर काढले असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या सर्व अवैध धंद्यांच्या मागे सुरेश नावाच्या व्यक्तीचा हात असल्याची चर्चा परिसरात रंगली असून त्याला उमरखेड येथील एका सत्ताधारी पक्षाशी संबंधित ‘भाऊ’चा वरदहस्त असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. महागाव पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गुंज भागात सट्टा, जुगार आणि दारूविक्रीचे अड्डे खुलेआम सुरू असल्याचे सांगितले जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, सुरेशवर हाणामाऱ्या, दहशत निर्माण करणे आणि शस्त्र बाळगणे यांसारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याची चर्चा असूनही तो परिसरात उजळमाथ्याने फिरत असल्याने पोलिसांचा धाक उरला नसल्याची भावना नागरिकांत निर्माण झाली आहे.

नुकत्याच घडलेल्या एका अॅट्रॉसिटी प्रकरणातही कठोर कारवाई न होता केवळ सूचना देऊन प्रकरण सोडण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे या प्रकरणामागे राजकीय दबाव असल्याची चर्चा रंगू लागली आहे. गुंज परिसर शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. मात्र येथे सुरू असलेल्या अवैध धंद्यांमुळे अल्पवयीन विद्यार्थी आणि तरुण वर्ग चुकीच्या मार्गाकडे वळत असल्याची चिंता पालक आणि नागरिकांनी व्यक्त केली आहे. काही कुटुंबांवर आर्थिक व सामाजिक परिणामही दिसू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर गुंजमधील अवैध धंद्यांवर पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करावी आणि राजकीय आडोशाला चालणाऱ्या अशा प्रवृत्तींना लगाम घालावा, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## राष्ट्रपती पदकाच्या सन्मानानिमित्त राजेंद्र बनसोड यांचा कुटुंबीयांकडून गौरव

**यवतमाळ :** आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे (८ मार्च) औचित्य साधून यवतमाळ जिल्ह्यातील गृहरक्षक दलाचे सेंटर कमांडर राजेंद्र बनसोड यांचा कुटुंबीयांच्या उपस्थितीत सन्मान सोहळा पार पडला. ७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त (२६ जानेवारी २०२६) जाहीर झालेल्या राष्ट्रपती पदक (President's Medal for Distinguished Service in Ho$me Guards and Civil Defence) या प्रतिष्ठित सन्मानाबद्दल त्यांच्या कुटुंबीयांनी एकत्र येत हा कार्यक्रम आयोजित केला होता.

कार्यक्रमात अमरावती येथील एंजल वनचे संचालक रवी इंगळे, मनीषा इंगळे, पोतदारच्या शिक्षिका गाडे मॅडम, पंकज गाडे, गायक आशिष गाडे तसेच दीपा गाडे यांनी राजेंद्र बनसोड व त्यांच्या पत्नींचा शाल, पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. यावेळी कुटुंबातील लहान मुलांना मिठाई वाटून आनंद साजरा करण्यात आला. कार्यक्रमात गायक आशिष गाडे यांनी ङ्कगारवाङ्क हे गीत सादर करून वातावरण रंगतदार केले. त्यानंतर राजेंद्र बनसोड यांनी आपल्या मनोगतात सेंटर कमांडर ते राष्ट्रपती पदकापर्यंतचा प्रवास, गृहरक्षक दलातील सेवा, गुणवत्तापूर्ण कार्य आणि त्या मागील संघर्ष व समर्पण याबाबत आपले अनुभव मांडले.

कार्यक्रमाच्या समारोपावेळी ‘तुम भी चलो हम भी चलो चले’ हे प्रेरणादायी गीत सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे सुंदर चित्रांकन कुमारी गार्गी बनसोड यांनी केले. यावेळी पी. बी. इंगळे (कास्ट्राईब संघटना) आणि पुष्पा इंगळे (माजी अध्यक्षा, भारतीय विद्यालय) यांच्यासह कुटुंबीय व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजेंद्र बनसोड यांच्या उल्लेखनीय कार्याचा आणि मिळालेल्या सन्मानाचा अभिमान व्यक्त करत उपस्थितांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## संक्षिप्त

### पत्रकार व प्रशासनाचा संयुक्त होळी स्नेहमिलन सोहळा

**तिवसा-** पत्रकार आणि प्रशासन हे दोन्ही समाजासाठी सतत जागरूक राहून काम करीत असतात मात्र कुठेतरी रोजच्या धकाधकीच्या जीवना त, कामाच्या ताण तणाव यातून थोडा आनंद घेण्यासाठी होळी या सणाचे औचि त्य साधून तिवसा येथील पंचवटी चौक स्थित पत्रकार संपर्क कार्यालय येथे सर्व पत्रकार आणि प्रशासन असा संयुक्त होळी स्नेहमीलन सोहळा होळीच्या दिवशी संपन्न झाला. या सोहळ्याला तिवसा तहसीलचे नायब तहसिलदार आशिष नागरे, तिवसा पो स्टे चे पीएसआय पिसाळकर, पीएसआय बुरगुल, जेष्ठ पत्रकार भूषण यावले, मुंबईचे शासन पुरस्कृत पत्रकार प्रशांत कांबळे, सामाजिक कार्यकर्ते शिवहरी बोकडे, महाविद्यालयिन कर्मचारी संदीप चक्रनारायण, आदी सर्वच क्षेत्रातील मंडळी उपस्थित झाली होती. प्रस्ताविकातून हेमंत निखाडे यांनी कार्यक्रमामागील उद्देश व्यक्त केला. यावेळी पत्रकार प्रशिक मकेश्वर, संदीप राऊत, जानराव मनोहर, संदीप दहाट, जयंत निखाडे, विजय क्षीरसागर, प्रफुल मकेश्वर, राहुल येरणे, प्रशिक शापामोहन, नंदू मते, आशिष देशमुख, अंकित ठाकरे आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.



### शशिकांत बोंडे सनदी लेखापाल परीक्षेत उत्तीर्ण

**अमरावती-** जिल्ह्यातील ग्रामीण भागातील कुंड खुर्द येथील रहिवासी शशिकांत बोंडे यांनी सनदी लेखापाल परीक्षेत उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शशिकांत बोंडे यांच्या यशाची बातमी गावात पोहोचताच ग्रामस्थांनी फटाके फोडून व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. त्यांच्या या यशामुळे गावातील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला असून ग्रामीण भागातील मुलांनाही मोठ्या क्षेत्रात यश मिळवता येते, याचा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला आहे.



### आज कर्तृत्ववान महिलांचा सत्कार

**अमरावती-** अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ महिला मंच अमरावतीच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन शहरातील कांचन रिसॉर्ट येथे सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. कार्यक्रमात महिलांवर आधारीत गीत गायन, नृत्य, कवितेचे सादरीकरण होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा. शोभना देशमुख, विशेष उपस्थिती आ. सुलभा खोडके, प्रमुख अतिथी म्हणून प्रिती देशमुख जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, डॉ. अनुभूती पाटील सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ, सुरेखा लुंगारे नगरसेविका, राजश्री जढाळे (संचालक) महात्मा फुले अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक अम, अक्षरा लहाने महिला मंच पश्चिम विदर्भ कार्याध्यक्षा अचलपूर, मनोहर सुने, युसुफभाई खान केंद्रीय कार्याध्यक्ष, कैलासबापू देशमुख महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी कार्यक्रमात डॉ. माया बोरखडे आयुर्वेदाचार्या, हर्षा ढोक क्रीडा क्षेत्र, कांता काळे आरोग्य सेवा, कहुता घाटोळ उद्योग क्षेत्र, श्रुतिका तायडे उद्योजक, कांचन उल्हे उद्योग क्षेत्र, कविता बोंडे समुपदेशिका, मीना राहिंज पत्रकारिता क्षेत्र, वैशाली बरडे स्वयंरोजगार व उद्योग, आदिती मेहता नृत्यकला, गौरी सतके गायन, डॉ. प्राचार्या मंजुषा सागर वडकी शिक्षण क्षेत्र, सुयोगा संतापे लेखन, या विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात येणार आहे.

### कृषी निसर्गोपचार थेरपी मार्गदर्शन शिबीर शनिवारी

**अमरावती-** रोजगार निर्मितीसाठी वलगाव येथील सिकची रिसॉर्ट येथे सकाळी ९ ते ५ पर्यंत कृषी निसर्गोपचार मार्गदर्शन शिबिराचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज लोक विद्यापिठाचे महासंचालक डॉ. मंगेश देशमुख यांनी शनिवार १४ मार्च रोजी केलेले आहे. सदर कृषी निसर्गोपचार थेरपी ही रोजगार निर्मितीसाठी आणि निरोगी जीवन जगण्यासाठी कशी उपयुक्त आहे याबाबत डॉ. प्रशांत मुळीक मार्गदर्शन करणार आहेत. सदर शिबिराचा लाभ घेण्यासाठी आणि अधिक माहिती करिता नागरिकांनी मो. ९२८४८२३५२१ वर संपर्क साधावा.

### विहार कॉलनी येथे जागतिक महिला दिन साजरा

**अंजनगाव बारी -** येथील अंजू कॉलनी व आकाश विहार कॉलनी नवी वस्ती बडनेरा येथे जागतिक महिला दिन विविध कार्यक्रमासह साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या फोटोचे पूजनाने झाली. संचालन शुभांगी सावंग, गणवीर व पायल वाघमारे यांनी केले. सर्वांनी आपल्या भाषणातून महिला दिनाचे महत्व विशद केले. कार्यक्रमाचे आयोजन निशा ब्रामणे व केसर चोपडे यांनी केले. यांमध्ये सरस्वता वासनिक, ललिता लोखंडे, प्रतिभा बोरकर, माया गवई, सांगमित्रा मुन, वर्षा चक्रे, पुष्पा जवंजाळ, नेहा लोणारे, उषा बागळे, भरती रामटेके, अर्चना डोंगरे, पायल जाधव, रेणू पिल्ले, प्रणाली काकड, कौशल्या मेश्राम, रिकु बांबोळे, रामटेके, घोडेस्वार, वर्षा दंदे, गायकवाड, प्रीती डोंगरे, प्रीती गणवीर, श्रुती शृंगारे, साक्षी चोपडे, गार्गी ब्रामणे तसेच पुरुष वर्गातील देवानंद वाघमारे, जितेंद्र सावंग, विनायक दंदे, मनोज टेकाडे, सुधीर मून उपस्थित होते. आभार प्रदर्शन गौरी टेकाडे यांनी केले.



### गो-सेवेसह संशोधन कार्य प्रेरणादायी-अभिनेता गणेशपूरे

**दर्यापूर-** माझ्या जन्मभूमी परिसरात गेल्या सहावर्षांपासून सुरु असलेली माहूली (धांडे) येथील गोरक्षण संस्था ही अभिनंदनास पात्र असून या ठिकाणी निष्काम सेवादेणारे संस्थेचे संस्थापक प्रा गजानन भारसाकळे यांचे शेणखत व शेणाची गोवरी निर्मिती यावरील संशोधन अतिशय प्रेरणादायी असल्याचे गौरवपूर्ण प्रतिपादन सुप्रसिद्ध कलावंत भारत गणेशपूरे यांनी केले.



# राज्यातील शाळा महिला आयोगाच्या रडारवर !

## मुलींवरील अत्याचाराचा मागविला अहवाल, अहवालासाठी १७ मार्च चा 'अल्टीमेटम'

**अमरावती/प्रतिनिधी**

अलीकडे राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थिनींची सुरक्षा चव्हाट्यावर आली आहे. बहुतांश शाळांमध्ये विद्यार्थिनींवर केल्या जात असलेल्या अत्याचाराची दखल स्वतः महिला आयोगाने घेतली आहे. गेल्या तीन वर्षात ज्या ज्या विद्यार्थ्यांवर अत्याचार झाले त्या संदर्भात संबंधित शाळांवर नेमकी काय कारवाई करण्यात आली याचा अहवालच राज्य महिला आयोगाने तात्काळ मागविला आहे.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी राज्याच्या शिक्षण आयुक्तांना या संदर्भात पत्रव्यवहार केला आहे. शालेय विद्यार्थिनींची सुरक्षा राज्यात कशा प्रकारे केली जाते याबाबतचा अहवाल मागितला आहे.

मागील तीन वर्षात राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थिनीवर झालेले अत्याचार प्रकरणात संबंधित शाळांवर आतापर्यंत काय कायदेशीर व प्रशासकीय कारवाई केली याचा अहवाल राज्य महिला आयोगाने मागितला आहे. प्रत्येक शाळेत तक्रार पेटी व त्यामध्ये प्राप्त झालेल्या तक्रारी आणि त्यावर केलेल्या कार्यवाहीचा मासिक अहवाल शिक्षण विभागाकडे सादर करणे शाळांना अनिवार्य करण्यात आले आहे. याबाबत नेमकी काय कार्यवाही झाली त्याचाही अहवाल मागविण्यात आला आहे.

प्रत्येक शाळेमध्ये असलेल्या सखी सावित्री समितीला अधिक सक्रिय करण्यात येऊन बळकट करण्यासाठी शिक्षण विभागाने विशेष मार्गदर्शक तत्वे जारी करावी असेही आदेशात म्हटले आहे.

राज्य महिला आयोगामार्फत राबविल्या जाणाऱ्या सायबर सुरक्षा व युवती सक्षमीकरण उपक्रमासाठी प्रत्येक शाळेत एका नोडल ऑफिसर ची नेमणूक करून समन्वयाची जबाबदारी निश्चित करावी असेही महिला आयोगाचे आदेशात म्हटले आहे.

या आदेशामुळे राज्यातील ज्या ज्या शाळांमध्ये गेल्या तीन वर्षात विद्यार्थिनींवर अत्याचार झाले त्या संबंधात शाळांवर नेमकी काय कार्यवाही केली याचे अहवाल तात्काळ मागविले आह. ज्या शाळांवर या संदर्भात कार्यवाही केली नसेल त्या शाळा राज्य महिला आयोगाच्या रडारवर राहणार आहे..

**अनधिकृत शाळांची होणार तपासणी**

शिक्षण विभागाच्या परवानगा शिवाय चालवल्या जाणाऱ्या शाळांमध्ये विद्यार्थिनीच्या सुरक्षेसाठी नेमक्या कोणत्या उपाययोजना केल्या आहेत याचा स्वतंत्र अहवाल सादर करण्याचे आदेश शिक्षण विभागाला देण्यात आले आहे.

प्रत्येक शाळेच्या दर्शनी भागात तक्रार पेटी आणि सी बॉक्स पोर्टल ची माहिती देणारे फलक लावने बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे राज्यातील अनधिकृत शाळांच्या तपासण्या करून त्याचा स्वतंत्र अहवाल शिक्षण विभागाला महिला आयोगाकडे पाठवावा लागणार आहे. सदर अहवाल महिला आयोगाकडे सादर करण्यासाठी १७ मार्च २०२६ चा अल्टिमेट देण्यात आला आहे.

# चांदूर रेल्वेतील एकमेव क्रीडा संकुलाची दुर्दशा

## तालुका क्रीडा विभागावर प्रश्नचिन्ह

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

तालुक्यातील एकमेव क्रीडा संकुल सध्या अत्यंत दयनीय अवस्थेत असल्याचे चित्र समोर आले आहे. तालुका क्रीडा अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे या क्रीडा संकुलामध्ये आवश्यक सुविधांचा पूर्णपणे अभाव दिसून येत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

क्रीडा संकुलाच्या परिसरात सर्वत्र गांजर गवत वाढले असून स्वच्छतेकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले दिसते. तसेच व्यायामासाठी ठेवण्यात आलेले साहित्यही मोडकळीस आले असून त्याची देखभाल होत नसल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे येथे येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या क्रीडा संकुलावर दररोज लहान मुलांपासून ते वृद्ध नागरिकांपर्यंत अनेक जण व्यायाम व सकाळ-संध्याकाळ फेरफटका मारण्यासाठी येतात. मात्र परिसरातील अस्वच्छता व गैरसोयीमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.



या काही नागरिकांनी थेट प्रतिक्रिया देत सांगितले की, शहरातील एकमेव क्रीडा संकुलाची अशी अवस्था असणे अत्यंत दुर्दैवी आहे. संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन स्वच्छता, गवत काढणे आणि व्यायाम साहित्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. आता तरी तालुका क्रीडा अधिकारी या समस्येकडे लक्ष देणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज दूरदृष्टी असलेले राजे -प्रा. डॉ. नरेश इंगळे

**कुऱ्हा/वार्ताहर**

छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक वर्षांपूर्वीच भविष्यातील आव्हानांचा अंदाज घेऊन तयारी केली होती.

नौदलाची स्थापना, किल्ल्यांची सुरक्षा, संरक्षण व्यवस्था, प्रशासकीय व्यवस्था, लष्करी शिस्त, आर्थिक विकास इत्यादी बाबी आधुनिक काळातही थक्क करणाऱ्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी आणि अद्वितीय नेतृत्व क्षमता आजही भारतीयांना/युवकांना प्रेरणादायी आहे असे मत प्रा. डॉ. नरेश शं. इंगळे यांनी व्यक्त केले आहे.



अमरावती जिल्ह्यातील शेंदुरजना माहुरे येथील मानवता मंदिर परिसरात आयोजित शिवजयंती महोत्सव कार्यक्रम प्रसंगी उपस्थितीताना मार्गदर्शन करताना केले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गुणवंतराव देवतारे तर प्रमुख पाहुणे म्हणूने विलासराव माहुरे, अभिजित बेलूरकर, सुरेश मेटकर, प्रा. डॉ. नरेश इंगळे, प्रा. डॉ. शीतल माहुरे, हर्षदा श्याम मंजूरकर, दिलीप केणेकर, देविदास निकाळजे, गुरुदेव सेवा मंडळ पिंपळखुटाचे प्रा. प्रशांत टांगले, आकाश माहुरे, सरपंच आशिष माहुरे, गौरी आमले, प्रदीप माहुरे आदी मान्यवर उपस्थितीत होते.

विलासराव माहुरे यांचे पुढाकारातून गत ४६ वर्षांपासून हा शिवजयंती महोत्सव आयोजित केला जातो. याप्रसंगी उपस्थिती मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यकर्तृतवार प्रकाश टाकला. प्रास्ताविक विलासराव माहुरे, संचालन धनराज मनवरे तर आभार राधा हर्षल माहुरे हिने केले.

कार्यक्रमाला देवेंद्र आमले, सुनील तालन, जानराव मनवरे, संजय निगोट, योगेश गुमळे, शाम मंजूरकर, किसनराव माहुरे, संदीप माहुरे, दादाराव काळे, किसनराव इंगोले, जयकांत माहोरे, महेश माहोरे, संजय माहोरे, अशोक माहोरे, अमोल माहोरे, प्रेरणा माहुरे, सीमा माहुरे, लता माहुरे, कोंडेकर, रवी माहुरे, राज माहुरे, किसना काळे, निलेश आमले, महादेव देवतारे, रामदास समरीत, रामचंद्र देवतारे, सुरेश हरणे, धनराज मनवरे यांचेसह शिवजयंती महोत्सव समिती पदाधिकारी व गावकरी यांनी परिश्रम घेतले.

# इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयात 'स्नेहपर्व'

**अमरावती/का.प्र.**

महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या सुप्त गुणांना वाव मिळावा या उद्देशाने शैक्षणिक सत्र २०२५-२६ चे वार्षिक स्नेहसंमेलन झाले. या सोहळ्यात उद्घाटन समारंभ, माजी विद्यार्थिनी मेळावा, विविध सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धा तसेच समारोपीय व बक्षीस वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने समूह नृत्य, एकल नृत्य, अंताक्षरी, फॅशन शो, वेशभूषा स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, पाककला स्पर्धा तसेच विविध क्रीडा व मनोरंजनात्मक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.




उद्घाटन समारंभास अध्यक्ष म्हणून विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे सचिव युवराज सिंग चौधरी उपस्थित होते. उद्घाटक म्हणून संस्थेच्या कार्यकारिणी सदस्य प्रा. डॉ. पूनम चौधरी, प्राचार्य डॉ. अजय कोल्हे, स्नेहसंमेलन प्रभारी डॉ. सीमा अढाऊ आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी विविध विषयांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला. एम.ए. भाग २ ची विद्यार्थिनी शुभांगी वाघमारे हिने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ च्या उन्हाळी परीक्षा २०२५ मध्ये गृहअर्थशास्त्र विषयात गुणवत्ता यादीत स्थान मिळवून महाविद्यालयाचा गौरव वाढविला. तसेच नेहा कलोसिया हिने आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावून आंतरविद्यापीठीय स्पर्धेत सहभाग नोंदविला. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार इंग्रजी विषयाचे प्रा. अनुप आत्राम यांना, उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार अधीक्षक प्रशांत देशमुख यांना प्रदान करण्यात आला. उत्कृष्ट विद्यार्थिनी पुरस्कार पल्लवी गाडगे हिने पटकावला. प्राचार्य डॉ. अजय कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली माजी विद्यार्थिनी मेळावा पार पडला. या मेळाव्यास विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीच्या कार्यकारिणी सदस्य प्रा. डॉ. पूनम चौधरी, ॲड. डॉ. नमिता अवस्थी, डॉ. वनिता भोपत, ॲड. सीमा तोंडर, प्रा. अरुणा तसरे, डॉ. मंजूषा बारबुद्धे, प्रा. वनिता राऊत आदी माजी विद्यार्थिनी उपस्थित होत्या. 'घे भरारी' माजी विद्यार्थिनी बहुद्देशीय संस्थेच्या वतीने होतकरू विद्यार्थिनींना रोख शिष्यवृत्ती तसेच गरजू विद्यार्थिनींना नवीन सायकलींचे वितरण करण्यात आले.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अजय कोल्हे यांनी केले. संचालन डॉ. वंदना भोयर व डॉ. स्वाती भेटाळू यांनी केले. अहवाल वाचन छात्रसंघ सचिव श्रुतीका अपराधे हिने केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अनुप आत्राम यांनी केले. डॉ. वामन जावंजाळ यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. समारोपीय व बक्षीस वितरण कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रांजली बारस्कार, सहाय्यक आयुक्त, कौशल्य विकास कार्यालय, अमरावती उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला. तसेच प्राविण्यप्राप्त विद्यार्थिनींना स्मृतिपरितोषिके प्रदान करण्यात आली. स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापकवर्ग, कर्मचारी व विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

# अंजनगाव बारीत खाजगी दारु विक्रेत्यांचा सुकाळ

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

१७ हजार लोकसंख्येच्या या विस्तृत परिसरात परवानाधारक दुकानाबरोबरच खाजगी दारू विक्रेत्यांनाही पोलीस प्रशासनाच्या आशिर्वादाने उत्तम रोजगार लाभला आहे. संबधीत पोलीस प्रशासणाचे याकडे जातीने दुर्लक्ष असल्याने अंजनगाव बारीत खाजगी दारू विक्रेत्यांचा सुकाळ असल्याचे चित्र दिसत आहे.



स्थानिक ग्राम पंचायतीने या गावात जेवढ्या (एकुण ६) वार्डाची निर्मिती केली त्या प्रत्येक वार्डात एक ना दोन खानगी दारु विक्रेते असल्याचे निदर्शनास येते. या खाजगी व्यवसायात घट होण्याऐवजी कालांतराने वाढ होत असल्याचे दिसते. परवानाधारक दुकान गावापासुन् १ ते दिड किमी. अंतरावर असल्याने थोड्या पैशासाठी येथील ग्राहक असुविधा टाळतात. या दारू विक्रेत्यांकडे एवढा सारा माल कोठून येतो. यांनी कोणत्या परवानाधारक दुकानदाराला आपला 'पुरवठामंत्री' बनविले आहे.

याबाबत संभ्रमच आहे. पिणाऱ्यांना २ दोन पावलांवर त्यांचे हे पेय मिळत असल्याने व्यसनाधिनतेत लक्षणीय वाढ होत असल्याचे चित्र दिसत आहे.

# जातींमधील रक्तसंबंधांचे एकत्रीकरण अनिवार्य-बीजभाषक डॉ. जे. व्ही. पवार

## विद्यापीठात एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

**अमरावती/का.प्र.**

समाजातील जातीभेद मुळापासून उखडून टाकण्यासाठी रक्तसंकर हाच एकमेव प्रभावी मार्ग असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखनातून जातीभेदाच्या निर्मूलनासाठी आंतरजातीय विवाहांना दिलेले महत्त्व व केवळ प्रेमाच्या नावाखाली होणारे विवाह नव्हे, तर जातीची घट्ट विणलेली चौकट मोडण्यासाठी दोन भिन्न जातींमधील रक्तसंबंधांचे एकत्रीकरण होणे अनिवार्य असल्याचे प्रतिपादन आंबेडकरी चळवळीतील प्रसिध्द विचारवंत व चर्चासत्राचे बीजभाषक डॉ. जे. व्ही. पवार यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग आणि नारायणराव राणा महाविद्यालय, बडनेरा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आर्थिक दृष्टिकोन : आधुनिक भारताची निर्मिती आणि त्याची समकालीन प्रासंगिकता' या विषयावर बीजभाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्य विद्यापीठ, महू चे कुलगुरू डॉ. रामदास आत्राम, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. आर. डी. सिकची, श्री गजानन महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. आशिष मालू, प्राचार्य डॉ. गोपाल वैराळे, आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते.

चर्चासत्राचे उद्घाटन झाल्याची घोषणा करुन डॉ. रामदास आत्राम म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक क्षेत्रातील विचार आणि त्यांनी मांडलेले विकासाचे दृष्टिकोन आजही आधुनिक भारतीय धोरणांचा पाया ठरत आहेत. शिक्षणामुळे केवळ गतिशीलता वाढत नाही, तर पिढयानपिढया चालत आलेली विषमता मोडीत निघण्यासही मदत होते, असेही ते म्हणाले. डॉ. आशिष मालू म्हणाले, शिक्षण क्षेत्रातील त्यांची ही वाटचाल थेट डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानावर आधारित आहे. आजचे स्टार्टअप्स, नाविन्यपूर्ण कल्पना आणि आत्मनिर्भरतेचे स्वप्न हे डॉ. आंबेडकरांनी दशकांपूर्वी मांडलेल्या विचारांचेच आधुनिक रूप आहे. याप्रसंगी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. आर. डी. सिकची यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, बीजभाषक डॉ. जे. व्ही. पवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, आर्थिक विचार प्रकर्षाने मांडले. प्रास्ताविकेतून डॉ. संतोष बनसोड यांनी चर्चासत्र आयोजनामागील भूमिका मांडली. स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ. गोपाल वैराळे यांनी केले. याप्रसंगी १३८ शोधनिबंधाच्या संपादकीय ग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.



संचालन डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक डॉ. रत्नशिल खोब्रागडे यांनी, तर आभार प्राचार्य डॉ. मनिष सिरसाट यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, आंबेडकरी चळवळीतील गणमान्य नागरिक, विचारवंत, अभ्यासक, साहित्यिक, विद्यार्थी उपस्थित होते.

# टीम इंडिया विश्वविजेता

२०२६ टी ट्वेंटी विश्वचषक अंतिम सामन्यात टीम इंडियाने एकतर्फी सामन्यात न्यूझीलंडचा दारुण पराभव केला आहे. स्टेडियमवर भारतीय प्रेक्षकांना गप्प करण्याच्या वल्गना करणाऱ्या इंग्लंड आणि न्यूझीलंड या दोन्ही संघाच्या कर्णधारांचे दात टीम इंडियाने आपल्या दणदणीत कामगिरीने त्यांच्याच घशात घातले आहेत. इंग्रजीत एक म्हण आहे, देअर आर नॉट बॅड सोल्जर्स, देअर आर बॅड जनरल्स. म्हणण्याचे तात्पर्य की, विश्वचषकाचा अंतिम सामना असताना किवी कर्णधार सॅंटनरने कर्णधार पदाच्या भिकार कामगिरीने त्यांच्या संघाचा बट्ट्याबोळ केला आहे.उत्कृष्ट खेळाडूंचा भरणा असलेल्या किवी संघाचा सॅटनरने चुकीचे निर्णय घेतल्याने फायनलला पाय खोलात गेला आहे.

फायनलची पीच सुद्धा वानखेडे सारखी बाऊंस आणि पेस असलेली होती. त्यातही फायनलला पाठलाग करणाऱ्या संघावर दडपण असते. अशा परिस्थितीत टॉस जिंकून पहिले फलंदाजी करणे शहाणपणाचे होते. सोबतच सेमिफायनलला दणक्यात अडीचशे धावा करणाऱ्या टीम इंडियाच्या हाती सॅटनरने आयते कोलीत दिले.या संधीचा भारतीय संघाने पुरेपूर फायदा घेतला.पहिला ओव्हर मॅट हेन्री तर दुसरा ग्लेन फिलिप्स ने उत्तम टाकला होता. या दोन षटकात केवळ १२ धावा निघाल्या होत्या. मॅट हेन्रीची लाईन लेंथ तर फिलिप्सच्या ॲक्युरसीने आपले सलामीवीर थबकले होती. प्रेशर संजू अभिषेक वर असताना सॅटनरने विनाकारक गोलंदाजीत बेक्कार बदल केले आणि टीम इंडियासाठी फ्लड गेट्स उघडले.

हेन्रीच्या जागी डफी येताच दोन्ही सलामीवीरांनी न्यूझीलंडची डफली वाजवने सुरू केले. फॉर्म साठी झगडणा-या अभिषेकने संजू सोबत तुफानी खेळी केली. या दोघांच्या झंजावातात लॉकी फर्ग्युसन सापडला. पुन्हा एकदा सॅटनरने मॅट हेन्रीला पाचारण केले परंतु तोपर्यंत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले होते. हेन्री फलंदाजांना बाद करण्यापेक्षा मार कसा कमी पडेल यासाठी वाईड गोलंदाजी करत होता, शेवटी तो वाईडग्रस्त झाला पण काही केल्या त्याला सलामीवीरांनी दाद दिली नाही. अभिषेक अर्धशतकी खेळी करून परतला पण न्यूझीलंड चे दु:ख काही कमी झाले नव्हते. येणारा इशान त्याच्यापेक्षा तिखट निघाला. त्याने संजूसोबत ४८ चेंडूत १०५ धावांची भागीदारी करत अडीचशेचा पाया रचला.

पहिले फलंदाजी करण्याचे स्वातंत्र्य, फलंदाजीला साजेशी खेळपट्टी आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या भरवश्यावर भारतीय फलंदाजांनी किवी गोलंदाजांचा फडशा पाडला. विशेषत: संजू सॅमसने तर कहर केला. विंडीज, इंग्लंड पाठोपाठ त्याने फायनलला शतकाचा विचार न करता, वैयक्तिक धावसंख्येला महत्त्व न देता जबरदस्त फटकेबाजी करत तिन्ही सामन्यात लाजवाब खेळी केल्या. यापूर्वी विराट जी स्ट्रेंथ, स्थिरता आणि डावाला आकार द्यायचा, तेच काम संजू सलामीला येऊन करत आहे. त्याने गेल्या पाच डावात जवळपास सव्वातीनशे धावा काढल्या. सामन्याच्या १६ व्या षटकात निशमने संजू इशान आणि सूर्याला बाद करत सामन्यात थोडंफार थ्रिल आणले होते परंतु शेवटी दुबेने अवघ्या आठ चेंडूत २९ धावा वसूल करून हिशोब चुकता केला.

फायनलला अडीचशे धावांचे टार्गेट कधीच सोपे नसते. त्यातही त्यांची मुख्य मदार सेफर्ट आणि ॲलन या जोडीवर होती. या दोघांनी सेमीफायनलला द.आफ्रिकेला तोंड दाबून बुक्क्याचा मार दिला होता. मात्र इथे परिस्थिती वेगळी होती. जवळपास तेराच्या स्ट्राईक रेटवर धावा करणे अवघड होते. शिवाय बुमराहचे चार ओव्हर म्हणजे निव्वळ सासुरवास, ना धावा निघतात, ना मोकळे खेळता येत ना विकेट वाचवता येते. बुमराह यायाच्या अगोदर इतर गोलंदाजांना टार्गेट करताना बरेचदा अर्शदीप पांड्या किंवा अक्षर बळी टिपतो. त्यातही तुरळक अपवाद वगळता ग्राऊंड फिल्डिंग, कॅचींग मध्ये सुधारणा झाल्याने प्रतिस्पर्धी फलंदाजांची नाकाबंदी झालेली असते.

धोकादायक ॲलनला जीवदान मिळाले परंतु तो त्याचा फायदा घेऊ शकला नाही तर रचिन रविंद्रला बुमराहने लिलया फसवले. सेम टू सेम सेमिफायनलला जसे हॅरी ब्रुकला चकवले होते. हे दोन बळी जाताच किवी संघ बॅकफूटवर आला तो कायमचाच. यानंतर ते सामन्यातून जवळपास बेदखल झाले होते. टीम सेफर्टने थोडाफार प्रतिकार केला परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही. न्यूझीलंड खेळाडू केंव्हाचेच मनाने पराभूत झाले होते. केवळ सामना संपण्याची औपचारिकता बाकी होती ती बुमराहने पूर्ण केली.

थोडक्यात काय तर जगज्जेतेपदात संजूच्या सलामीच्या खेळींनी प्रमुख भूमिका बजावली. तर त्याला तोलामोलाची साथ दिली इशानने. खरेतर हे दोन्ही खेळाडू या संघात फर्स्ट प्रिफरंस नव्हते परंतु या दोघांनीही आपली निवड सार्थ ठरवली. तर फिनिशिंग टच दिले तिलक आणि दुबे ने. दुबेच्या छोटेखानी पण उपयुक्त खेळी कौतुकास्पद आहेत. हार्दिक पांड्या भलेही फलंदाजीत फारसा चमकला नाही परंतु ती कसर त्याने गोलंदाजीत भरून काढली. अक्षर पटेल गोलंदाजी, क्षेत्ररक्षणात नाव कमावून गेला पण वरूणला मात्र अखेरपर्यंत



सूर गवसला नाही. आईसींग ऑन दी केक होता बुमराह.

त्याचे स्लोअर वन, धारदार यॉर्कर फलंदाजांसाठी अगम्य होते. हेटमायर, रोस्टन चेस, हॅरी ब्रुक आणि रचिन रविंद्र या दिग्गज फलंदाजांना त्याने सहज फसवले. या चौघांनाही बाद झाल्यापेक्षा फसवल्या गेल्याचे दुःख असेल. सामना कुठलाही असो, प्रतिस्पर्धी संघ , फलंदाज कोणताही असो, सगळ्यावर रामबाण इलाज एकच, तो म्हणजे बुमराह. कोणत्याही कर्णधाराला हवाहवासा वाटणारा बुमराह टीम इंडियासाठी 'हारे का सहारा, बुमराह हमारा' आहे. यासोबतच सूर्या फलंदाजीत फारसा चमकला नसला तरीही त्याचे काही निर्णय, मैदानावरील सहज वावर आणि सांघिक कामगिरीने त्याची कर्णधारपदाची खुर्ची शाबूत राहील यात वाद नाही. एकंदरीत हे विजेतेपद एकट्या दुकट्या खेळाडूच्या भरवश्यावर नव्हे तर ते सांघिक कामगिरीचे फळ होय!

**डॉ अनिल पावशेकर**
मो. ९८२२९३९२८७

# भारताचा इतिहास डिफिट आणि रिपिट

९ मार्च २०२६ ही तारीख भारतीय क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदली गेली आहे कारण या दिवशी टी २० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने



न्युझीलंड संघावर ९६ धावांनी विजय मिळवत टी २० विश्वचषकावर तिसऱ्यांदा भारताचे नाव कोरून इतिहास रचला. या विश्व विजयासोबतच भारताने अनेक विक्रम आपल्या नावे केला. या विजयासोबत भारत तिसऱ्यांदा टी २० चा विश्व विजेता संघ तर बनलाच शिवाय सलग दुसऱ्यांदा आणि घरच्या मैदानावर टी २० विश्वचषक जिंकणारा पहिला संघही ठरला याचाच अर्थ भारताने इतिहास डिफिट आणि रिपिटही केला. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी मी माझ्या 'इंडिया इतिहास डिफिट करणार आणि रिपिटही करणार' या माझ्या लेखात तसे भाकीत वर्तवले होते ते आज खरे ठरले.

या विश्वचषक स्पर्धेत भारत सुरुवातीपासूनच भारत विजेतपदाचा प्रबळ दावेदार होता. काहीही करून यावेळी संघाला विश्व विजयी करायचेच अशी खूणगाठ कर्णधार सूर्यकुमार यादव आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी बांधली होती. टी २० विश्वचषक स्पधेसाठी कोणते खेळाडू हवेत याचा पक्का विचार करून सूर्यकुमार यादवने त्याला हवे ते खेळाडू संघात घेतले. टी २० स्पधेत अष्टपैलू खेळाडूंचे महत्व ओळखून त्याने संघात हार्रिदक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल यांचा संघात समावेश केला. वरुण चक्रवर्ती आणि वॉशिंगस्ट सुंदर यांचा समावेश संघात केला तर जगातील सर्वात घातक वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा, अर्शदीप सिंग मोहम्मद सिराज यांचा संघात समावेश करण्यात आला होता. भारताची गोलंदाजी या स्पर्धेतील सर्वोत्तम गोलंदाजी ठरली. ज्या ज्या वेळी सामना भारताच्या हातातून निसटला असे वाटत होते त्या त्या वेळी गोलंदाजांनी संघाला विजय मिळवून दिला. अंतिम फेरीतही भारताच्या सर्व गोलंदाजांनी घातक गोलंदाजी केली. जसप्रीत बुमराने संपूर्ण स्पर्धेत जशी घातक गोलंदाजी केली तशीच घातक गोलंदाजी अंतिम सामन्यात करून ४ प्रमुख फलंदाजांना बाद केले आणि न्यूझीलंडच्या फळा फलंदाजीचा कणा मोडत भारताच्या विजयाचा मार्ग सुकर केला. केवळ बुमरानेच नाही तर सर्वच गोलंदाजांनी अप्रतिम गोलंदाजी करून न्यूझीलंडच्या फलंदाजांना जेरीस आणले आणि भारताला ९६ धावांनी एकतर्फी विजय मिळवून दिला. जसप्रीत बुमराने त्याच्या घातक गोलंदाजीने अंतिम सामन्यातील सामानावीर हा किताब मिळवला.

संपूर्ण क्रिकेट विश्वाचे लक्ष लागलेल्या या अंतिम सामन्यात न्यूझीलंडने भारताला प्रथम फलंदाजीसाठी निमंत्रित केले. भारताने मिळालेल्या या संधीचा पुरेपूर फायदा उचलत धमाकेदार सुरुवात केली. भारताचे सलामीवीर संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांनी भारताला धडाकेबाज सुरुवात करून विश्व विजयाचा पाया रचला. त्यांनी न्यूझीलंडच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडले. अभिषेक शर्माने अर्धशतक झळकावले. या स्पर्धेत त्याला त्याच्या लौकिकाप्रमाणे फलंदाजी करता आली नाही मात्र अंतिम सामन्यात त्याने ती कसर भरून काढली. संजू सॅमसनसाठी तर ही स्पर्धा अविस्मरणीय ठरली. सुरवातीच्या काही सामन्यात त्याला संघाबाहेर बसावे लागले पण जेव्हा त्याला संधी मिळाली तेव्हा त्याने या संधीचे सोने केले. वेस्ट इंडिज, इंग्लंड यांच्या विरुद्ध त्याने जशी स्फोटक फलंदाजी केली तशीच अंतिम सामन्यातही करून संघाला पुन्हा एकदा अडीचशेचा टप्पा ओलांडून दिला आणि भारताचा विजय पक्का केला. त्याने संपूर्ण स्पर्धेत तीनशेपेक्षा अधिक धावा काढत मालिकावीर हा किताब मिळवला. भारतीय संघाने संपूर्ण स्पर्धेत फलंदाजी आणि गोलंदाजीत अप्रतिम कामगिरी केली . या स्पर्धेत भारताचे क्षेत्ररक्षणही अप्रतिम होते. एकूणच गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही आघाड्यांवर भारताने अप्रतिम कामगिरी करीत हे विश्व विजेतेपद मिळवले. सूर्यकुमार यादवने संघाचे कर्णधारपद अतिशय कुशलतेने सांभाळले. या विजतेपदात जितका खेळाडूंचा वाटा आहे तितकाच सपोर्ट स्टाफचाही आहे.

प्रशिक्षक गौतम गंभीर आणि त्यांच्या टीमने पडद्यामागे मोठी कामगिरी बजावली त्यामुळेच भारत पुन्हा एकदा आयसीसीच्या स्पर्धेत विजेता बनला. भारतीय संघाचे हे विजेतेपद खास आहे कारण भारतीय संघाचे हे तिसरे टी २० चे विश्व विजेतपद आहे. २००७ साली भारताने पाकिस्तानला हरवत पहिल्यांदा विजेतपद मिळवले होते. तेंव्हा भारताचा कर्णधार महेंद्रसिंग धोनी हा होता . त्यानंतर २०२४ साली रोहित शर्मा कर्णधार असताना भारताने दक्षिण आफ्रिकेला हरवून दुसऱ्यांदा टी २० विश्वचषक जिंकला. त्यानंतर आता म्हणजे २०२६ साली भारतीय संघाने या स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. तीनदा टी २० विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिला देश आहे. त्यामुळेच भारतासाठी हे विजेतेपद ऐतिहासिक आहे. तीनदा टी २० विश्वचषक जिंकून भारताने आम्हीच टी २० चे चॅम्पियन आहोत हे जगाला दाखवून दिले. हे विजेतेपद मिळवून भारतीय संघाने क्रिकेट विश्वावर आपली मक्तेदारी पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. कारण आयसीसीच्या सलग चार स्पर्धेत भारताने अंतिम फेरी गाठली त्यात भारताला तीनदा विजेतेपद मिळवण्यात यश मिळाले. फक्त एकदाच भारताला अंतिम फेरीत पराभव स्वीकारावा लागला तो २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलिया कडून मात्र त्यानंतर मागील म्हणजे २०२४ च्या टी २० विश्वचषक स्पर्धेत भारताने दक्षिण आफ्रिकेला हरवून विश्व विजेतेपद मिळवले त्यानंतर मागीलवर्षी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. आता हे विश्व विजेतेपद मिळवून भारताने क्रिकेट विश्वातील आपली मक्तेदारी सिद्ध करून आपणच क्रिकेट मधील सर्वोत्तम संघ आहोत हे जगाला दाखवून दिले आहे. तिसऱ्यांदा टी २० विश्वचषक स्पर्धेचे विजेतेपद मिळवून इतिहास रचणाऱ्या भारतीय संघाचे अभिनंदन!

**श्याम ठाणेदार**
मो.९९२२५४६२९५

# सावित्रीबाई फुले:स्त्रीशिक्षणाच्या प्रकाशवाटेच्या शिल्पकार



**भा**रतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांनी आपल्या धैर्य, दूरदृष्टी आणि निःस्वार्थ कार्यातून समाजाच्या विचारविश्वाला नवे परिमाण दिले. स्त्रीशिक्षणाचा पाया रचणाऱ्या, सामाजिक समतेचा विचार रुजवणाऱ्या आणि मानवतेच्या मूल्यांना जीवनकार्याचे स्वरूप देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव त्या थोर व्यक्तिमत्त्वांमध्ये अग्रक्रमाने घेतले जाते. स्त्रीला शिक्षणाचा अधिकार नसलेल्या, जातिभेद आणि अंधश्रद्धांच्या जोखडात अडकलेल्या भारतीय समाजात त्यांनी प्रबोधनाची ज्योत पेटवली. स्त्रीला शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. १० मार्च हा दिवस त्यांच्या स्मृतिदिनाच्या रूपाने साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका महान समाजसुधारकाची आठवण करून देणारा दिवस नसून स्त्रीशिक्षण, सामाजिक समता आणि मानवतेच्या मूल्यांची जपणूक करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे.

**पुण्यतिथीनिमित्त**

सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठीही मोठा संघर्ष केला. त्या काळात विधवा स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. समाजाने त्यांच्यावर अनेक बंधने लादली होती. विधवांना शिक्षण घेण्याची किंवा पुनर्विवाह करण्याची संधी नव्हती. अनेक वेळा अविवाहित किंवा विधवा स्त्रियांना समाजाच्या भीतीने नवजात बालकांची हत्या करण्यास भाग पाडले जात असे. या अमानुष प्रथेला आळा घालण्यासाठी सावित्रीबाई आणि ज्योतिराव फुले यांनी पुण्यात 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू केले. येथे अवांछित किंवा अनाथ बालकांना सुरक्षित आश्रय दिला जात असे. या कार्यामुळे अनेक बालकांचे प्राण वाचले आणि अनेक स्त्रियांना सन्मानाने जगण्याची संधी मिळाली. सावित्रीबाई फुले या केवळ शिक्षिका नव्हत्या तर त्या एक संवेदनशील कवयित्रीही होत्या. त्यांच्या 'काव्यफुले' आणि 'बावनकशी सुबोध रत्नाकर' या काव्यसंग्रहांमधून समाजजागृतीचा प्रभावी संदेश दिला आहे. त्यांच्या कवितांमध्ये शिक्षणाचे महत्त्व, आत्मसन्मान, सामाजिक समता आणि मानवतेचा विचार स्पष्टपणे दिसून येतो. अज्ञानाच्या अंधारातून बाहेर पडण्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे, हा संदेश त्यांनी आपल्या साहित्यामधून समाजापर्यंत पोहोचवला.

सावित्रीबाई फुले यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेतला. सत्यशोधक समाजाचा उद्देश समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद आणि अन्यायकारक प्रथा दूर करून समतेवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करणे हा होता. सावित्रीबाई फुले यांनी या चळवळीच्या माध्यमातून स्त्रियांमध्ये आत्मविश्वास आणि स्वाभिमान जागृत करण्याचे कार्य केले. त्यांनी स्त्रियांना स्वतःच्या अधिकारांची जाणीव करून दिली आणि समाजातील अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा दिली.सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा प्रभाव आजच्या भारतीय समाजावरही स्पष्टपणे दिसून येतो. आज स्त्रीशिक्षणाला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जाते. मुली शिक्षणाच्या विविध क्षेत्रांमध्ये प्रगती करत आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, राजकारण, साहित्य, कला आणि क्रीडा अशा अनेक क्षेत्रांमध्ये महिलांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या सर्व परिवर्तनामागे सावित्रीबाई फुले यांच्यासारख्या समाजसुधारकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी पेटवलेली शिक्षणाची ज्योत आज लाखो मुलींच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करत आहे.

१० मार्च हा दिवस सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने आपण त्यांच्या महान कार्याचे स्मरण करतो. परंतु त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली म्हणजे त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे होय. समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, स्त्री-पुरुष समानतेची जाणीव वाढवणे आणि मानवी मूल्यांवर आधारित समाजरचना निर्माण करणे ही आजच्या काळातील महत्त्वाची गरज आहे.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवन म्हणजे संघर्ष, धैर्य, समर्पण आणि सामाजिक परिवर्तनाची प्रेरणादायी गाथा आहे. त्यांनी आयुष्यभर शिक्षण, समता आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजाला नवी दिशा मिळाली. म्हणूनच सावित्रीबाई फुले यांचे नाव भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासात सदैव आदराने घेतले जाईल. त्यांच्या स्मृतिदिनी आपण त्यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून अधिक न्याय्य, समताधिष्ठित आणि शिक्षित समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील राहणे हीच त्यांना अर्पण केलेली खरी श्रद्धांजली ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# पाण्यासाठी पैसा : भविष्यातील समृद्धीची गुंतवणूक

**'पाणी वाचवा' हा संदेश आपण अनेकदा ऐकतो; पण आता काळ आहे 'पाण्यात गुंतवा' असे म्हणण्याचा. कारण, पाणी ही केवळ नैसर्गिक संपत्ती नसून भविष्यातील अर्थव्यवस्थेचा कणा आहे. जागतिक स्तरावर पाणी व्यवस्थापन, जलसुरक्षा आणि पायाभूत सुविधा यामध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणुकीची गरज असल्याचे अनेक अभ्यासांतून स्पष्ट झाले आहे.**



McKinsey Company या जागतिक सल्लागार संस्थेच्या अहवालानुसार २०१३ ते २०३० या कालावधीत पाण्याशी संबंधित पायाभूत सुविधांसाठी सुमारे ११.७ ट्रिलियन अमेरिकन डॉलर इतकी गुंतवणूक आवश्यक असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. याचा अर्थ दरवर्षी सरासरी ६५० अब्ज डॉलर इतकी गुंतवणूक करावी लागेल. ही रक्कम केवळ जलपुरवठा नाही, तर सांडपाणी प्रक्रिया, सिंचन व्यवस्था, पूरनियंत्रण, जलसंधारण आणि जलगुणवत्ता सुधारणा यासाठी आवश्यक आहे. या अहवालात काही महत्त्वपूर्ण शिफारसीदेखील करण्यात आल्या आहेत. सर्वप्रथम शाश्वत पाण्याशी संबंधित पायाभूत सुविधा आणि सेवांमध्ये गुंतवणुकीसाठी सक्षम वातावरण तयार करणे आवश्यक आहे. म्हणजे, धोरणे, कायदे आणि प्रशासकीय प्रक्रिया या गुंतवणूकदारांसाठी सुलभ व पारदर्शक असाव्यात.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे, सध्याच्या गुंतवणुकीची पातळी किमान दुप्पट करणे. पाणी क्षेत्राकडे दीर्घकालीन दृष्टीने पाहिले गेले पाहिजे. सीमावर्ती जल प्रशासन (TranWoundary Water Governance) मजबूत करणेही तितकेच आवश्यक आहे. कारण, अनेक नद्या व जलस्त्रोत हे एकापेक्षा अधिक देशांमध्ये पसरलेले आहेत. सहकार्याशिवाय जलसुरक्षा शक्य नाही. जगातील सर्व सरकारांनी शाश्वत जलसंबंधित गुंतवणुकीसाठी सक्षम वातावरण निर्माण करण्यास प्राधान्य द्यावे, अशीही शिफारस करण्यात आली आहे. पाणी क्षेत्रासाठी स्वतंत्र व व्यापक व्यासपीठ उभारणे, ज्यात सार्वजनिक आणि खासगी क्षेत्राचा सहभाग असेल. ही काळाची गरज आहे.

पाण्यातील गुंतवणूक ही केवळ भौतिक पायाभूत सुविधांपुरती मर्यादित नसून ती जल अर्थव्यवस्था उभारण्याची संधी आहे. जलतंत्रज्ञान, जलमापन प्रणाली, सांडपाणी पुनर्प्रक्रिया उद्योग, जलडेटा विश्लेषण आणि हवामान संवेदनशील नियोजन या क्षेत्रांत नव्या उद्योगसंधी निर्माण होत आहेत. जागतिक स्तरावर ब्लू इकॉनॉमी ही संकल्पना वेगाने पुढे येत आहे, ज्यामध्ये जलस्त्रोतांचे शाश्वत व्यवस्थापन आणि आर्थिक वाढ यांचा समतोल साधण्यावर भर दिला जातो. योग्य धोरणे आणि पारदर्शक नियोजन असल्यास पाणी क्षेत्र हे गुंतवणूकदारांसाठी सुरक्षित व दीर्घकालीन परतावा देणारे क्षेत्र ठरू शकते.

पाण्यातील गुंतवणूक ही केवळ खर्च नसून ती सामाजिक व आर्थिक परतावा देणारी गुंतवणूक आहे. स्वच्छ पाणी उपलब्ध झाल्यास आरोग्य सुधारते, कामगारांची उत्पादकता वाढते आणि वैद्यकीय खर्च कमी होतो. शेतीसाठी विश्वासार्ह पाणीपुरवठा मिळाल्यास उत्पादन वाढते, अन्नसुरक्षा बळकट होते आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होते. उद्योगांना पुरेसे पाणी मिळाल्यास उत्पादन क्षमता वाढते आणि रोजगारनिर्मिती होते. भारताच्या संदर्भात पाहिले, तर शेती क्षेत्रात जवळपास ८० टक्के गोड्या पाण्याचा वापर होतो. सूक्ष्म सिंचन, ठिबक व फवारणी पद्धती, पावसाचे पाणी साठवण आणि जलपुनर्भरण प्रकल्पांमध्ये गुंतवणूक केल्यास पाण्याची उत्पादकता वाढू शकते. शहरांमध्ये सांडपाणी पुनर्वापर प्रकल्प उभारल्यास औद्योगिक वापरासाठी गोड्या पाण्यावरील ताण कमी होईल. जलस्त्रोतांचे डिजिटल मॅपिंग, डेटाआधारित नियोजन आणि हवामान जोखमीचे व्यवस्थापन यामध्येही गुंतवणूक करणे आवश्यक आहे. यासाठी गुंतवणूक योजना तयार करताना लोकसहभाग वाढवणे अत्यावश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांचा सहभाग असेल, तर प्रकल्प अधिक परिणामकारक आणि टिकाऊ ठरतात. सर्व क्षेत्रांमधील परस्पर संबंध लक्षात घेऊन शेती, उद्योग, शहरी विकास आणि पर्यावरणसमन्वित दृष्टिकोन स्वीकारणे गरजेचे आहे.

व्यवहार्य, गुंतवणुकीसाठी तयार आणि उच्च प्रभाव असलेल्या प्रकल्पांना प्राधान्य दिल्यास गुंतवणुकीचा परिणाम लवकर आणि स्पष्ट दिसू शकतो. उदाहरणार्थ, जलपुनर्भरण प्रकल्प, सांडपाणी पुनर्वापर, सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञान आणि स्मार्ट जलमापन प्रणाली हे उच्च परिणामकारक उपक्रम ठरू शकतात. आज पाण्यात गुंतवणूक करणे म्हणजे उद्याच्या संकटांना आळा घालणे होय. हवामान बदल, वाढती लोकसंख्या आणि शहरीकरण यामुळे जलस्त्रोतांवरील ताण वाढत आहे. आज योग्य आर्थिक नियोजन आणि गुंतवणूक केली नाही, तर भविष्यातील सामाजिक व आर्थिक किंमत अधिक मोठी असू शकते. पाणी हे भविष्यातील 'ब्लू गोल्ड' मानले जाते. त्यामुळे पाण्यासाठी पैसा खर्च करणे म्हणजे खर्च नव्हे, तर सुरक्षित, समृद्ध आणि शाश्वत भविष्यासाठी केलेली दूरदृष्टीची गुंतवणूक होय.

**डॉ. मंगेश कश्यप**

# विश्वचषक विजेता भारतीय संघ

**मुं**बईकर सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय क्रिकेट संघाने अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव करत २०२६ चा आयसीसी टी-२० विश्वचषक जिंकला आणि टी-२० विश्वचषकावर तिसऱ्यांदा आपले नाव कोरले. भारतीय संघ आजच्या घडीला जागतिक क्रिकेटमधील सर्वोत्तम संघांपैकी एक ठरला असून भारतीय संघाने दोनदा आयसीसी एकदिवसीय विश्वचषक (१९८३ आणि २०११), तीनदा आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी (२००२, २०१३ आणि २०२५) आणि तीनदा आयसीसी टी-२० विश्वचषक (२००७, २०२४ आणि २०२६) असे एकूण आठ आयसीसी विश्वचषक जिंकण्याचा पराक्रम केला आहे. विशेष म्हणजे २०१९-२१ आणि २०२१-२३ मध्ये जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतीय संघाने प्रवेश केला होता. पण भारताला दोन्ही वेळेस उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. आता अहमदाबाद



येथे टी-२० विश्वचषक २०२६ जिंकणाऱ्या भारतीय संघाने सलग दुसऱ्यांदा विजेतेपद राखणारा संघ, यजमान देश म्हणून घरच्या मैदानावर विश्वचषक जिंकणारा एकमेव संघ आणि सर्वाधिक तीन वेळा टी-२० विश्वचषक जिंकणारा संघ असे अनेक विक्रमही प्रस्थापित केले. टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचे अभिनंदन!

-

**प्रदीप मोरे**

# महिला सक्षमीकरणामध्ये वर्धा जिल्हा राज्यात अव्वल :पालकमंत्री

## उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांचा 'पालकमंत्री नारीशक्ती सन्मान', महिला व बालविकासच्या ५० पर्यवेक्षिकांना लॅपटॉपचे वितरण



**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा जिल्हा हा राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांची कर्मभूमी आहे. याच मातीने सिंधुताई सपकाळ यांच्यासारखी थोर समाजसेविका देशाला दिली. महिला भगिनी आणि अंगणवाडी सेविकांच्या रक्तातच माणुसकी आणि सेवेचा वारसा आहे. म्हणूनच महिला व बालविकास विभागाच्या महिला सक्षमीकरणाच्या अनेक निर्देशकात वर्धा जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे, असे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांगितले.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने चरखागृह येथे महिला व बाल कल्याण विभागाद्वारे आयोजित पालकमंत्री नारीशक्ती सन्मान सोहळा व अंगणवाडी सेविक, मदतनिस यांच्या कला व सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याहस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, गिमाटेक मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीच्या संचालक प्रेमलतादेवी मोहता, माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त स्वाती कराड (चाटे), अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, प्रकल्प संचालक वैशाली रसाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्निल बेले, महिला व बालकल्याण अधिकारी मनिषा कुरसंगे आदी उपस्थित होते.महिला सक्षमीकरणासाठी शासनाने ऐतिहासिक पावले उचलली आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत राज्यातील सव्वा कोटी भगिनींना सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे पालकमंत्री डॉ.भोयर यांनी सांगितले. नुकतीच शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहिर केली आहे. सेलू आणि वर्धा तालुक्यासाठी ही प्रक्रिया सुरू झाली असून, लवकरच आठही तालुक्यांत अशी स्वतंत्र कार्यालये उभारण्यात येतील, असे ते पुढे बोलतांना म्हणाले.जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस बालकांच्या सुदृढ भविष्यासाठी अहोरात्र काम करत आहेत. तसेच, 'उमेद' अभियानांतर्गत महिला बचतगटांची चळवळ जिल्ह्यात अतिशय सक्षमपणे राबविली जात आहे. लवकरच या बचतगटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी विशेष विक्री केंद्र उमेद मॉलची निर्मिती केली जाणार असल्याचे पालकमंत्री म्हणाले.

प्रशासकीय कामकाजात गती आणण्यासाठी आणि अंगणवाडी पर्यवेक्षिकांच्या अडचणी दूर करण्यासाठी गिमाटेक इंडस्ट्रीजच्या माध्यमातून ५० लॅपटॉप वितरित करण्यात आले. प्रेमलतादेवी मोहता यांनी सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या या मदतीबद्दल पालकमंत्री डॉ. भोयर यांनी विशेष आभार मानले.स्वातंत्र्य चळवळीच्या कालावधीपासूनच महिला पुढे आल्या आहेत. महिला व पुरुषांना समान संधी उपलब्ध होणे आवश्यक असून अंगणवाडी सेविका आपल्या कामातून नव्या पिढीला घडविण्याचे काम करित आहे. पालकमंत्री डॉ.पंकज भोयर व मान्यवरांच्याहस्ते महिला अधिकारी, कर्मचारी, अंगणवाडी सेविका, विद्यार्थीनींचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनिषा कुरसंगे यांनी केले. संचालन व आभार पल्लवी पुरोहित यांनी मानले. यावेळी अंगणवाडी सेविका, मदतनिस, बचत गटांच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उद्घाटनानंतर अंगणवाडी सेविका व मदतनिससाठी आयोजित कला व सांस्कृतिक महोत्सवांतर्गत विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. यात महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

# महिलांनो आधी मनाची गुलामी तोडा

## परिवर्तन स्वीकारल्याशिवाय खरे स्वातंत्र्य नाही : राजेश धोटे

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

जगभरात मोठ्या उत्साहात जागतिक महिला दिन साजरा केला जातो; मात्र महिलांनी स्वतःलाच एक कठोर प्रश्न विचारला पाहिजे, भारतीय संविधान लागू झाल्यानंतर खरोखरच आपण स्वतंत्र आणि मुक्त झालो आहोत का? की अजूनही जुनाट रूढी, परंपरा, प्रथा, सण-उत्सव यांच्या बेड्यांत अडकून आपणच आपल्या स्वातंत्र्याला अडसर ठरत आहोत असा प्रश्न महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे उपाध्यक्ष राजेश धोटे यांनी उपस्थित केला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या जिल्हा व शहर शाखा हिंगणघाट यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. जयंत दुधे यांच्या निवासस्थानी महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मंचावर समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार, माजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयंत दुधे, कार्याध्यक्ष ज्योत्स्ना जांभुळकर आदी मान्यवर उपस्थित होते.राजेश धोटे पुढे म्हणाले, शिक्षणामुळे महिला अनेक क्षेत्रांत पुढे गेल्या हे सत्य असले तरी कुटुंब आणि समाजाच्या रूढी-परंपरांच्या अदृश्य बेड्यांत त्या आजही अडकल्या आहेत. जिथे श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धा वाढते, तिथे प्रश्न विचारण्याची आणि तपासून पाहण्याची वृत्ती आवश्यक आहे. महिला दिन साजरा करायचा असेल तर आधी या मानसिक गुलामीतून मुक्त व्हा आणि परिवर्तन स्वीकारा,



असे त्यांनी आवाहन केले.या वेळी गजेंद्र सुरकार यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, भारतीय संविधानाने दिलेले देव-धर्म व उपासनेचे स्वातंत्र्य समिती मान्य करते. मात्र त्या स्वातंत्र्याचा वापर करून जर लुबाडणूक, फसवणूक, भीती दाखविणे किंवा महिलांचे शारीरिक-मानसिक शोषण केले जात असेल, तर त्याविरोधात ठाम भूमिका घेतली जाते. आम्ही श्रद्धा नाही तर अंधश्रद्धा दूर करण्यासाठी काम करतो, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. जयंत दुधे यांनी इतिहासातील उदाहरणे देत महिलांनी पूर्वी कशी गुलामीची जीवनशैली जगली यावर प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ज्योत्स्ना जांभुळकर यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. किशोर मांडवकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानेश्वर बडोले, इंजि. महिपाल रामटेके, सुनील कानकाटे, रजनी सुरकार, अजय जवादे, दिपाली रंगारी, मंगला कांबळे, सुजाता जिवणकर, गीता कापसे, रजनी मांडवकर, सुरेश बुरनुले, द्वारपाल वनकर, सुरेश ढोले आदींनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त

### साहित्यासह जीप लंपास

**वर्धा -** यात्रेत विक्रीसाठी ठेवलेले साहित्य भरलेली जीप अज्ञात चोरट्याने घरासमोरून लंपास केल्याची घटना पुलगाव येथील राणा प्रतापनगर परिसरात घडली. या घटनेमुळे जीप मालकाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. मयूर लांडे हे यात्रेत लहान मुलांच्या खेळण्यांचे व मनोरंजनाचे साहित्य विक्री करण्याचा व्यवसाय करतात. त्यांनी विक्रीचे साहित्य जीपमध्ये ठेवून ती घरासमोर उभी केली होती. दरम्यान अज्ञात चोरट्याने संधी साधत जीपसह सर्व साहित्य पळवून नेले. सकाळी ही बाब लक्षात येताच परिसरात खळबळ उडाली. याप्रकरणी पुलगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. चोरट्याचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### विटांचे तुकडे उचलण्यावरून वाद

**वर्धा-**घरासमोर पडलेले विटांचे तुकडे उचलण्यावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीस काठीने मारहाण केल्याची घटना सिरसगाव (ध.) येथे घडली. अजित नगराळे हे घरासमोर पडलेले विटांचे तुकडे उचलत होते. त्यावेळी निखील सुभाषराव कांबळे याने त्यांच्याशी वाद घालत शिवीगाळ केली. वाद वाढताच त्याने काठीने अजित नगराळे यांना मारहाण केली. या घटनेत अजित जखमी झाले. दरम्यान त्यांचे वडील मध्ये पडून भांडण सोडवण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांनाही मारहाण करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला. याप्रकरणी देवळी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी पुढील तपास सुरू केला असून आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.

### शिवीगाळ रोखल्याचा मारहाण

वर्धा - शेतमालकाच्या मुलीला शिवीगाळ करणाऱ्या तरुणाला मजुराने हटकले असता संतापलेल्या दोन भावांनी मजूर आणि त्याच्या भावाला मारहाण केल्याची घटना आर्वी तालुक्यातील धनोडी (बहाद्दरपूर) येथे घडली. सचिन वानखेडे व आकाश वानखेडे अशी जखमींची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार गावातील अनिकेत ठाकरे हा शेतमालकाच्या मुलीला शिवीगाळ करीत होता. ही बाब शेतात काम करणाऱ्या सचिन वानखेडे यांच्या निदर्शनास आली.

# बालविवाह रोखण्यासाठी समाजाने पुढे यावे-खा.अमर काळे

**आर्वी/ जनमाध्यम**

ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट, यवतमाळ यांच्या वतीने जिल्ह्यात बालविवाह मुक्त भारत व बाल कामगार विरोधी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत आर्वी तालुक्यातील हैबतपूर येथे जिल्हा परिषद शाळेत जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला खासदार अमर काळे यांनी भेट देऊन मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना खासदार अमर काळे म्हणाले की, देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षांहून



अधिक काळ लोटला असला तरी काही समाजात अजूनही बालविवाहाची प्रथा सुरू आहे. ही अत्यंत चिंताजनक बाब असून बालविवाहामुळे मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि भविष्य धोक्यात येते. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाने या प्रथेविरुद्ध जागरूक राहणे आवश्यक आहे.समाजात स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक ठिकाणी मुलांना घराचा वारसदार मानून अधिक महत्त्व दिले जाते, तर मुलींना दुय्यम स्थान दिले जाते. ही मानसिकता बदलून स्त्री-पुरुष समानतेचा विचार समाजात रुजविणे आवश्यक आहे. समाजाने सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारल्यास बालविवाहासारख्या प्रथांवर आळा बसू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमाला सरपंच सचिन पाटील, ग्रामसेवक कौरती, उपसरपंच दिलीप कैलुके, शाळेतील शिक्षिका, विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते.

# राजेंद्र प्राथमिक शाळेला साउंड सिस्टीम व वॉटर कूलर भेट

**सिंदी (रे.) -** सामाजिक बांधिलकी जपत मयूर पिपरे यांनी वडील नारायण विठोबा पिपरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नगर परिषदेच्या राजेंद्र प्राथमिक शाळेला साउंड सिस्टीम व वॉटर कूलर भेट दिला. विद्यार्थ्यांना शाळेत प्रार्थना, सांस्कृतिक कार्यक्रम व शैक्षणिक उपक्रम अधिक प्रभावीपणे पार पाडता यावेत या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना स्वच्छ व थंड पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून वॉटर कूलर देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी मुख्याध्यापक नागफासे, शिक्षक अमजद शेख तसेच पालक उपस्थित होते.
शाळेला आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल शाळा प्रशासन व पालकांनी पिपरे परिवाराचे आभार मानले. सामाजिक कार्यातून विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करणाऱ्या या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

# तरुण शेतकऱ्याची विष प्राशन करून आत्महत्या

**कारंजा घाडगे -** तालुक्यातील आजनडोह येथील तरुण शेतकरी मंथन सुनील हजारे (वय २१) यांनी विष प्राशन करून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. मंथन हा शेतातील जनावरांची देखभाल करण्यासाठी रात्री शेतात गेला होता. त्याचदरम्यान त्याने विष प्राशन केले. काही वेळानंतर त्याने मित्रांना फोन करून याची माहिती दिली. ही बाब समजताच मित्रांनी तातडीने शेतात धाव घेत त्याला कन्नमवार ग्राम येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. मंथन हा उत्कृष्ट कबड्डी खेळाडू म्हणून पंचक्रोशीत ओळखला जात होता. त्याच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### तलावात बुडून वृद्धाचा मृत्यू



मोझरी/(शेकापूर) - गावालगत असलेल्या तलावात बुडून एका वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली असून यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. रामचंद्र सुखदेवराव वैद्य (वय ८५) असे मृताचे नाव आहे. ते घरातून बाहेर गेल्यानंतर बराच वेळ परतले नाहीत. दरम्यान गावाजवळील तलावात त्यांचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच अल्लीपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह पुढील तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला. पोलिसांनी या प्रकरणी मर्ग दाखल केला असून मृत्यूचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे. रविवारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, सुन, नाती व मोठा आप्त परिवार आहे.

# स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच खासदारांची तुळजापूर येथे भेट

## गावकऱ्यांनी केला अमर काळेंचा सत्कार

**सेलू/ जनमाध्यम**

तालुक्यातील तुळजापूर गावाने स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच खासदाराचे प्रत्यक्ष दर्शन घेत इतिहासाचा क्षण अनुभवला. खासदार अमर काळे यांच्या भेटीने गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कबड्डी स्पर्धेच्या निमित्ताने गावात आलेल्या खासदारांचे ग्रामस्थांनी जल्लोषात स्वागत करत विशेष सत्कार केला.

तुळजापूर येथे स्व. राजाभाऊ देशमुख स्मृतीप्रित्यर्थ जय मातृभूमी क्रीडा मंडळ, तुळजापूर रेल्वे यांच्या वतीने भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा स्व. बाबासाहेब ढोणे क्रीडांगणावर पार पडल्या. स्पर्धेचा शुभारंभ खासदार अमर काळे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून व नारळ फोडून करण्यात आला.या कबड्डी स्पर्धेत राज्यातीलच नव्हे तर राज्याबाहेरील संघांनीही सहभाग घेतल्याची माहिती आयोजकांनी दिली. त्यामुळे क्रीडांगणावर खेळाडू आणि क्रीडाप्रेमींची मोठी गर्दी उसळली होती.या कार्यक्रमाला अर्चनाताई भोमले यांच्यासह गावातील अनेक मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान, तुळजापूर गावासाठी हा क्षण अत्यंत ऐतिहासिक ठरला. देशाच्या स्वातंत्र्यापासून आजपर्यंत कोणत्याही खासदाराने गावात प्रत्यक्ष भेट दिली नव्हती. त्यामुळे खासदार अमरभाऊ काळे हे तुळजापूरमध्ये पाऊल ठेवणारे पहिले खासदार ठरले. या अभूतपूर्व भेटीमुळे गावकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी त्यांचा विशेष सत्कार करून आनंद व्यक्त केला.



# रोहणा येथे 'महाराजस्व' समाधान शिबिर



**आर्वी/ जनमाध्यम**

राज्य शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत रोहणा येथे आयोजित समाधान शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिराच्या माध्यमातून शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना गतिमान प्रशासकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या तसेच विविध तक्रारी व समस्या तात्काळ मार्गी लावण्यात आल्या.

या समाधान शिबिराचे उद्घाटन आमदार दादाराव केचे यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून विविध शासकीय योजनांची माहिती घेतली. यावेळी तहसीलदार हरीश काळे, गटविकास अधिकारी प्रदीप चव्हाण, वनपरिक्षेत्र अधिकारी गवारले, तालुका कृषी अधिकारी उघडे, रोहणा येथील प्रशासक सरपंच तृप्ती पावडे, राजेंद्र पावडे, राजू हिवसे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार केचे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी विविध योजना राबवत आहे. सातबारा दुरुस्ती, शेत व पाणंद रस्ते तसेच महसूल विभागाच्या विविध सेवांबाबत मार्गदर्शन या शिबिरात देण्यात येत आहे.दरम्यान, शिबिरात नागरिकांना डिजिटल सातबारा, नव्याने नोंद व दुरुस्ती केलेले सातबारा, अंत्योदय कार्ड, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना तसेच संजय गांधी योजना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. विविध विभागांच्या स्टॉल्सलाही नागरिकांनी भेट देत योजनांची माहिती घेतली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार हरीश काळे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सागर झाडे यांनी केले.

# दुचाकीच्या धडकेत तरुण जखमी

**वर्धा-**भरधाव दुचाकीच्या धडकेत एक तरुण जखमी झाल्याची घटना सिद्धार्थ नगर परिसरात घडली. किर्तीराज ज्ञानेश्वर अंबोरे (वय २६) असे जखमी तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार किर्तीराज अंबोरे हे सायकलवरून रस्ता पार करत होते. त्यावेळी भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत ते रस्त्यावर कोसळून जखमी झाले. दुचाकी चालक पळून गेला. जखमी तरुणाला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. अज्ञात दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# थायलंडमध्ये वर्धेची कन्या झळकली

## जागतिक शांतता नीतिमत्ता स्पर्धेत प्रत्यंशा साहूचा आंतरराष्ट्रीय सन्मान

**वर्धा/ जनमाध्यम**

थायलंड येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील जागतिक शांतता नीतिमत्ता स्पर्धा (वर्ल्ड-पीईसी) मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत वर्धेची विद्यार्थिनी प्रत्यंशा संतोष साहू हिने आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मान पटकावला. ४ मार्च २०२६ रोजी पार पडलेल्या या प्रतिष्ठित समारंभात जगातील विविध देशांतील तरुणांना शांतता, नीतिमत्ता व मूल्याधारित शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल गौरविण्यात आले

या अभिमानास्पद सोहळ्यासाठी चेतना एज्युकेशन सोसायटीच्या सचिव डॉ. चेतना सवाई तसेच संस्थेचे संचालक मयुर डफळे यांनी थायलंडमध्ये



उपस्थिती लावली. विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर संधी देत मूल्याधारित शिक्षणाला प्रोत्साहन देण्याची संस्थेची भूमिका यामुळे अधोरेखित झाली.

या वेळी प्रत्यंशाचे पालकही समारंभाला उपस्थित होते. आपल्या मुलीला आंतरराष्ट्रीय मंचावर सन्मानित होताना पाहण्याचा क्षण त्यांच्या दृष्टीने अत्यंत भावनिक आणि अभिमानास्पद ठरला. प्रत्यंशाने या स्पर्धेत यश संपादन करत आपल्या शाळेसह देशाचेही प्रतिनिधित्व करत वर्ध्याचे नाव उज्ज्वल केले.

या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक फादर डॉ. सुधीर जिंदे यांनी प्रत्यंशाचे मनापासून अभिनंदन केले. संपूर्ण शिक्षकवर्गानेही तिच्या मेहनतीचे, शिस्तीचे आणि नैतिक मूल्यांप्रती असलेल्या बांधिलकीचे कौतुक केले.जागतिक शांतता नीतिमत्ता स्पर्धेत मिळालेला हा सन्मान तरुण पिढी मूल्याधारित शिक्षणाच्या बळावर जागतिक स्तरावर शांतता आणि नैतिक नेतृत्वाचे दूत बनू शकते, याचे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

## जाहीरनामा

ज्याअर्थी, विधि व न्याय विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची दिनांक ११/०८/२०२३ ची अधिसूचना अन्वये जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, ज्या जन्म व मृत्यूच्या नोंदणीबाबत १ वर्षापेक्षा अधिक कालावधीने सूचना प्राप्त होते, अशा प्रकरणात नोंदी घेण्यासाठी कार्यकारी दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे, अशा कार्यक्षेत्रासाठी ज्या ठिकाणी अशा व्यक्तीचा जन्म व मृत्यू झाला आहे, त्याबाबतच्या अचूकतेबाबत खात्री करुन विलंब शुल्क आकारुन अशा नोंदी घेण्याबाबत आदेशित करण्याची सुधारीत तरतूद करण्यात आली आहे. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम १३ (३) नुसार जन्म-मृत्यू घटना नोंदणी संदर्भातील निबंधक, जन्म व मृत्यू यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : जमृनों २५२५/ई.ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दिनांक १२ मार्च, २०२५ मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ व सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यु नोंदीबाबतची कार्यपध्दती निश्चित केली आहे.

ज्याअर्थी, नत्थुजी किसनाजी दांडेकर, रा. मोरांगणा ता.आर्वी जि. वर्धा यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, मोरांगणा येथे उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र, रहीवासाचे पुरावे, मालमत्तेचे पुरावे, ओळखीबाबतचे पुरावे व कौटुंबिक पुराव्यासह सचिव तथा जन्म-मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, मोरांगणा ता. आर्वी जि. वर्धा यांनी या कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे.

त्याअर्थी, नत्थुजी किसनाजी दांडेकर, रा. मोरांगणा ता.आर्वी जि. वर्धा यांच्या विलंबाने मृत्युच्या नोंदीबाबत कोणाचे काही आक्षेप / हरकती असल्यास त्या सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत (विहीत मुदतीत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळी लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीनंतर आक्षेप / हरकतींचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**(हरीश काळे)**
**तहसिलदार, आर्वी**

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १०२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन
# इराणवर अमेरिका-इस्रायलने केलेल्या हल्ल्याचा निषेध

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमेरिका व इस्त्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्याचा भारत सरकारने निषेध करून अलिप्तवादी भूमिका घेण्याची मागणी करत भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने आज सोमवार ९ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन केले. निवेदनात म्हटले आहे की, अमेरिकाच्या साम्राज्यवादी धोरणामुळे जग पुन्हा युद्धाच्या उंबरठ्यावर आले आहे. इराणवर लादलेले युद्ध हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन आहे. देशातील तेल व इतर नैसर्गिक संपत्तीवर नियंत्रण मिळवण्यासाठी तसेच जागतिक व्यापारात डॉलरचे वर्चस्व कायम ठेवण्यासाठी अमेरिका असे करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या हल्ल्याचा भारताने निषेध करावा. आपल्या कोणत्याही भूभागाचा आणि लष्कराचा वापर या युद्धासाठी अमेरिकाला करू देऊ नये. अमेरिका भारत करार रद्द करावा. भारताने अमेरिकन साम्राज्याच्या गटातून बाहेर पडावे. या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. आंदोलन करणाऱ्यांमध्ये तुकाराम भस्मे, अशोक सोनारकर, सुनील मेटकर, ओमप्रकाश कुटेमाटे, सागर दुर्योधन, सुनील घटाळे, नीलकंठ ढोके, देवेंद्र भोंगे, संतोष सुरजुसे, शिरिष सडमाके, राहुल मंगळे, अनिकेत वाकपांजर, धनंजय मस्के, दामोदर पवार सह कम्युनिस्ट पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ता मोठ्या संख्येने सहभागी होते.




**पाहिजेत**

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.
शिक्षण- १२ वी पास
पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन
(ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)
**संपर्क - ९६०७५८२०९४**

# पोलीस आयुक्तांनी केली विविध विभागाची पाहणी

## सायबर फसवणुकीच्या फिर्यादीची घेतली तक्रार

**अमरावती/प्रतिनिधीः-** पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी आज सोमवार ९ मार्च रोजी आयुक्तालय अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागाचे निरीक्षण केले आणि अधिकारी कर्मचाऱ्यांना आवश्यक दिशा निर्देश दिले.

माहिती नुसार पोलीस आयुक्त राकेश ओला सोमवारी दुपारी १२ वाजता अचानक आपल्या कक्षाच्या बाहेर निघाले. यानंतर त्यांनी विविध विभागाचे निरीक्षण केले आणि आवश्यक दिशा निर्देश देऊन अधिकारी कर्मचाऱ्यांच्या कामाच्या पद्धतीचे अवलोकन केले. त्यांनी प्रशासन, लायसन्स, तक्रार निवारण, सायबर सेल, ११२ नियंत्रण कक्ष सह इतर विभागाला भेट देऊन पाहणी केली. पोलीस आयुक्त जेव्हा सायबर कक्षामध्ये पोहोचले तेव्हा काही लोक तिथे फसवणुकीच्या तक्रारी देण्यासाठी आले होते. यावेळी स्वतः पोलीस आयुक्तांनी त्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. त्यावर योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.



# दर्यापूर बाजार समितीत नाफेडतर्फे चना खरेदीचा शुभारंभ

## हमीभाव योजनेत शेतकऱ्यांना ५८७४ रुपये दर

**खल्लार/प्रतिनिधीः-** कृषी उत्पन्न बाजार समिती दर्यापूर व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आज(दि.९) ला कृषी उत्पन्न बाजार समिती, दर्यापूर येथे नाफेडतर्फे चना खरेदीचा शुभारंभ करण्यात आला. ज्या शेतकऱ्यांनी चना नोंदणी केलेली आहे अशा शेतकऱ्यांचा एफ.ए.क्यू. दर्जाचा शेतमाल शासनाच्या हमीभाव योजनेअंतर्गत प्रतिक्विंटल ५८७५ रुपये दराने खरेदी करण्यात येत आहे.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनिल गावंडे, उपसभापती श्रीकृष्ण कराळे, सहाय्यक निबंधक किशोर बलिंगे यांच्या प्रमुख उपस्थितीत खरेदी प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला.

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 146/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.राजाराम राठी सार्वजनिक ट्रस्ट, अमरावती ता. जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.गिरीष रामकिसन कासट**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन)**
**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - जागेचे वर्णन**

१) **श्री.राजाराम राठी सार्वजनिक ट्रस्ट, अमरावती यांचे मालकीची मालमत्ता-**
मौजा वाठोडा शुक्लेश्वर, ता.भातकुली, जि.अमरावती, भुमापन क्र.९९, खाते क्र.८३५, क्षेत्रफळ २.५३ हे.आर. चतुःसिमा--
पुर्वेस - गट नं.८३ आणि ९८; पश्चिमेस - गट नं.१०८, १०९
उत्तरेस - गट नं.१००; दक्षिणेस - गट नं.१११
अंदाजित किंमत - २४,४७,२६९/-
पुरावा दस्त - सातबारा

२) **श्री.राजाराम राठी सार्वजनिक ट्रस्ट, अमरावती यांचे मालकीची मालमत्ता-**
मौजा वाठोडा शुक्लेश्वर, ता.भातकुली, जि.अमरावती, भुमापन क्र.१९९, खाते क्र.८३५, क्षेत्रफळ २.२७ हे.आर. चतुःसिमा--
पुर्वेस - गट नं.२०२, २०५
पश्चिमेस - गट नं.१७०, १७१, १७२, १७३
उत्तरेस - गट नं.१९६, १९७, १८७
दक्षिणेस - गट नं.२०१,२००
अंदाजित किंमत - २६,७९,४२१/-
पुरावा दस्त - सातबारा

३) **श्री.राजाराम राठी सार्वजनिक ट्रस्ट, अमरावती यांचे मालकीची मालमत्ता-**
मौजा वाठोडा शुक्लेश्वर, ता.भातकुली, जि.अमरावती, भुमापन क्र.२०६, खाते क्र.८३५, क्षेत्रफळ ३.२० हे.आर. चतुःसिमा--
पुर्वेस - गट नं.२१३
पश्चिमेस - धामोरी रस्ता
उत्तरेस - गट नं.२०५, २०७
दक्षिणेस - गट नं.२०४
अंदाजित किंमत - ३०,९५,३६०/-
पुरावा दस्त - सातबारा

४) **श्री.राजाराम राठी सार्वजनिक ट्रस्ट, अमरावती यांचे मालकीची मालमत्ता-**
मौजा वाठोडा शुक्लेश्वर, ता.भातकुली, जि.अमरावती, भुमापन क्र.२१९, खाते क्र.८३५, क्षेत्रफळ ०.६६ हे.आर. चतुःसिमा--
पुर्वेस - गट नं.२२०
पश्चिमेस - गट नं.१८६
उत्तरेस - वडली रस्ता
दक्षिणेस - गट नं.२१८
अंदाजित किंमत - ६,३८,४१८/-
पुरावा दस्त - सातबारा

५) **श्री.राजाराम राठी सार्वजनिक ट्रस्ट, अमरावती यांचे मालकीची मालमत्ता-**
मौजा वाठोडा शुक्लेश्वर, ता.भातकुली, जि.अमरावती, भुमापन क्र.६४०, खाते क्र.८३५, क्षेत्रफळ २.१७ हे.आर. चतुःसिमा--
पुर्वेस - गट नं.६४१
पश्चिमेस - गट नं.६७०
उत्तरेस - गट नं.६४३, ६६८
दक्षिणेस - गट नं.३६९
अंदाजित किंमत - २०,९९,०४१/-
पुरावा दस्त - सातबारा

६) **श्री.राजाराम राठी सार्वजनिक ट्रस्ट, अमरावती यांचे मालकीची मालमत्ता-**
मौजा सोनारखेडा, ता.भातकुली, जि.अमरावती, भुमापन क्र.१६, खाते क्र.१५१, क्षेत्रफळ १.९२ हे.आर. चतुःसिमा--
पुर्वेस - गट नं.३९
पश्चिमेस - गट नं.१५, १३, १२
उत्तरेस - गट नं.१७
दक्षिणेस - गट नं.१०
अंदाजित किंमत - २६,३५,७१०/-
पुरावा दस्त - सातबारा

७) **श्री.राजाराम राठी सार्वजनिक ट्रस्ट, अमरावती यांचे मालकीची मालमत्ता-**
मौजा वाठोडा शुक्लेश्वर, ता.भातकुली, जि.अमरावती, भुमापन क्र.५४६, खाते क्र.८३५, क्षेत्रफळ ६६ आर. चतुःसिमा--
पुर्वेस - गट नं.५४७
पश्चिमेस - गट नं.४७९
उत्तरेस - गट नं.५४५
दक्षिणेस - गट नं.५४७
अंदाजित किंमत - ९,५७,६२७/-

८) **श्री.राजाराम राठी सार्वजनिक ट्रस्ट, अमरावती यांचे मालकीची मालमत्ता-**
मौजा अमरावती, शिट नं.६८ सी, प्लॉट नं.५/४, धारणाधिकार-ई, एकुण क्षेत्रफळ ८९१.९० चौ.मी.. चतुःसिमा--
पुर्वेस - बालवाडी
पश्चिमेस - धापीबाई दवाखाना
उत्तरेस - जाफरजीन प्लॉट
दक्षिणेस - रस्ता
अंदाजित किंमत - ४१,२१,०००/-
पुरावा दस्ता - मालमत्ता पत्रक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २७.०२.२०२६ रोजी दिली.

शिक्का

**(श्रीमती वाय.एस.शेख)**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

---

## जाहीर नोटीस

सर्व जनतेला/लोकांना सुचित करण्यात येते की, आमची पक्षकार **पुष्पादेवी रामजीवन मिश्रा,** रा.ब्राम्हणसभा मंगल कार्यालयाजवळ, रायगढ कॉलनी, खामगांव, ता.खामगांव, जि.बुलढाणा यांच्या वारसा प्रमाणे मालकी हक्काची खालील नमुद मिळकत असून तिचे वर्णन येणेप्रमाणे -

**मिळकतीचे वर्णन -** अ) अमरावती मनपाच्या हद्दीतील मौजे-शेगांव (विस्तारित), अमरावती येथील नगर भुमापन क्र.१९९६, धारणाधिकार-सी, शिट नंबर १८ मधील संपूर्ण प्लॉटस् तसेच

(ब) अमरावती मनपाच्या हद्दीतील मौजे-शेगांव (विस्तारित), अमरावती येथील भुमापन क्र.९९५, धारणाधिकार-सी, शिट नंबर १७ मधील संपूर्ण प्लॉटस्.

वरील मिळकत आमच्या पक्षकाराची वडीलोपार्जित मिळकत असून सदर मिळकतीच्या मालकी हक्कामध्ये **हरिशंकर शिवपालप्रसाद तिवारी व भगवतप्रसाद शिवपालप्रसाद तिवारी** यांची पुर्वी मालकी हक्काने नोंद होती. यापैकी **हरिशंकर शिवपालप्रसाद तिवारी** यांचे नांव **भगवतप्रसाद शिवपालप्रसाद तिवारी** यांच्या वारसाकडून लबाडी करुन व खोटे काम करुन वगळण्यात आलेले आहे. आमची पक्षकार, **हरिशंकर शिवपालप्रसाद तिवारी** यांच्या ४ अपत्यापैकी मुलगी म्हणून एक वारस असून वरील मिळकतीवर **हरिशंकर शिवपालप्रसाद तिवारी** यांचा अर्धा समान हिस्सा असल्याकारणाने आमची पक्षकार सुध्दा अर्ध्या अविभाज्य समाज हिश्श्यापैकी १/४ हिश्श्याची समान मालक आहे. त्यामुळे भगवतप्रसाद शिवपालप्रसाद तिवारी **यांच्या वा**रसांद्वारे ज्यामध्ये सुरेखा चंद्रमाप्रसाद शुक्ला, केशरबाई प्रेमप्रसाद मिश्रा, ताराबाई चंद्रभान मिश्रा, दुर्गा शंभुनाथ उपाध्याय, मिना भानुदान तिवारी, गंगा घनश्याम तिवारी, शारदा राजेश तिवारी, रेखा रामप्यारे तिवारी, अनिता रमेशप्रसाद दुबे आहेत. जे वरील मिळकत हरिशंकर शिवपालप्रसाद तिवारी यांचा वारसांना डावलून परस्पर वर नमुद प्लॉट मिळकती विक्री करण्याच्या बेतात आहेत. तेव्हा भगवतप्रसाद शिपालप्रसाद तिवारी यांच्या वरील नमुद वारसासंबरोबर इतर कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये आणि तसे केल्यास तो व्यवहार आमची पक्षकार व हरिशंकर शिवपालप्रसाद तिवारी यांच्या इतरवारसांवर बंधनकारक राहणार नाही व त्यामुळे आमच्या पक्षकारांच्या नुकसानास व होणाऱ्या परिणामास व्यवहार करणारे पुर्णतः जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. करीता सदर जाहीर नोटीस प्रकाशित करीत आहे.

**अमरावती**
**दिनांक ०९.०३.२०२६**

**(ॲड.प्रतिक पी.पाटील)**
कार्या.- ग्राऊंड फ्लोअर, श्रीराम सुपर मार्केट श्रीराम मंदिर समोर, कोल्हटकर मंगल कार्यालयाजवळ, राजापेठ, अमरावती
मो.नं.९८६०८२७९४७

---

## नाव बदलण्याबाबत जाहीर सुचना

मी **राजश्री उमराव मानकर** रा वासेवाडी ता भातकुली जि अमरावती, जाहीर करते की माझा विवाह दि २६/०१/२०१० रोजी अविनाश रमेशराव काळे रा अमरावती यांच्यासोबत झाला व आता माझे विवाहानंतर चे प्रचलित नाव **सौ माधवी अविनाश काळे** हे आहे ..

आपल्या माहितीसाठी सादर
विनीत
**सौ माधवी अविनाश काळे**
अमरावती

---

**दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.३५/२०२६ — ने.ता.१३.०४.२०२६

**अर्जदार :**
१. शालिनी प्रल्हादराव साखरकर
२. निलेश प्रल्हादराव साखरकर
दोन्ही रा.मोरगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. मेघा संतोष बोंडे
रा.एमआयडीसी शिवार, अकोला, जि.अकोला
४. स्नेहल दिनेशराव औतकर
रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
५. स्वाती शशांक निवारे
रा.अंबागेट, अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत प्रल्हाद ज्ञानेश्वर साखरकर** यांचा मृत्यू दि.**०३.१२.२०२५** रोजी मोरगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताचे अर्जदार नं.१ ही पत्नी, अर्जदार नं.२ हा मुलगा असून अर्जदार नं.३ ते ५ हया मुली आहेत. आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०३ फेब्रुवारी २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

प्रोसेस का.-७२७/४
दि ०२/०३/२०२६

## जाहिरनामा / सायटेशन

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**श्री.एस.बी. कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्रमांक ४२०/२०२६ अलकाताई व निरंक पुढील तारीख २२.०४.२०२६**
**अर्जदार- १. अलकाताई चिंतामण सुरूशे** वय - ७८ वर्ष व्यवसाय - घरकाम
**२. विनोद चितामण सुरूशे** वय ५३ वर्ष व्यवसाय -नोकरी
**३. रविंद्र चिंतामण सुरूशे** वय ५० वर्ष व्यवसाय - नोकरी
१ ते ३ रा. गजानन महाराज मंदिरा जवळ श्री विहार कॉलनी साई नगर अमरावती
**४. सौ रजनी सुभाष खरे** वय ५८ वर्ष व्यवसाय -घरकाम
रा. खामगाव रोड चेतना नगर सुंदरखेड बुलढाणा

**विरुध्द**
**गैरअर्जदार निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत चिंतामण निंबाजी सुरूशे** हे **दि.०२ ०२.२०२६** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार अलकाताई व इतर वि निरंक वरीलप्रमाणे** या कोर्टात सवहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**त्यापेक्षा अलकाताई व इतर वि निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदई कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत याचे वारसाचे ०२.०३.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालम वरीष्ठ स्तर, अमरावती**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **निमखेड** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय **निमखेड** येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **मोहम्मद अनीस मोहम्मद युनूस** अर्जात नमूद जन्म दिनांक **२५.०७.१९७७** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **निमखेड** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण ...................... हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) -----------------------------------------------.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) प्रल्हाद प.सिरसाट (सरपंच) | १) प्रल्हाद प.सिरसाट (सरपंच) |
| २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) | २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) |
| ३) पंकज नाना राऊत (पो.पा.) | ३) पंकज नाना राऊत (पो.पा.) |
| ४) जी.डी.फुटाणे (तलाठी) | ४) जी.डी.फुटाणे (तलाठी) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत निमखेड**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक २२.०९.२०२५

आज दि. २२.०९.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **निमखेड** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय **निमखेड** येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **नजहत आफरीन मो.समीर** अर्जात नमूद जन्म दिनांक **०८.०३.१९८६** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **निमखेड** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण ...................... हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) -----------------------------------------------.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) प्रल्हाद प.सिरसाट (सरपंच) | १) प्रल्हाद प.सिरसाट (सरपंच) |
| २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) | २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) |
| ३) पंकज नाना राऊत (पो.पा.) | ३) पंकज नाना राऊत (पो.पा.) |
| ४) जी.डी.फुटाणे (तलाठी) | ४) जी.डी.फुटाणे (तलाठी) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत निमखेड**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक ०४.०२.२०२६

आज दि. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **निमखेड** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय **निमखेड** येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **शहेनाज परवीन मोहम्मद नजीर** अर्जात नमूद जन्म दिनांक **२६.०७.१९६०** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **निमखेड** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण ...................... हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) -----------------------------------------------.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) प्रल्हाद प.सिरसाट (सरपंच) | १) प्रल्हाद प.सिरसाट (सरपंच) |
| २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) | २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) |
| ३) पंकज नाना राऊत (पो.पा.) | ३) पंकज नाना राऊत (पो.पा.) |
| ४) जी.डी.फुटाणे (तलाठी) | ४) जी.डी.फुटाणे (तलाठी) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत निमखेड**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.०९.०९.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **निमखेड** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय **निमखेड** येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **मोहम्मद आसिम तलहा मोहम्मद जहांगीर** अर्जात नमूद जन्म दिनांक **२५.१२.२००२** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **निमखेड** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण ...................... हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) -----------------------------------------------.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) प्रल्हाद प.सिरसाट (सरपंच) | १) प्रल्हाद प.सिरसाट (सरपंच) |
| २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) | २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) |
| ३) पंकज नाना राऊत (पो.पा.) | ३) पंकज नाना राऊत (पो.पा.) |
| ४) जी.डी.फुटाणे (तलाठी) | ४) जी.डी.फुटाणे (तलाठी) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत निमखेड**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.................. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **निमखेड** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय **निमखेड** येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **नरगीस जहॉं मोहम्मद युनूस** अर्जात नमूद जन्म दिनांक **२५.०४.१९८४** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **निमखे** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण ...................... हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) -----------------------------------------------.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) प्रल्हाद प.सिरसाट (सरपंच) | १) प्रल्हाद प.सिरसाट (सरपंच) |
| २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) | २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) |
| ३) पंकज नाना राऊत (पो.पा.) | ३) पंकज नाना राऊत (पो.पा.) |
| ४) जी.डी.फुटाणे (ग्रा.म.अधि.) | ४) जी.डी.फुटाणे (ग्रा.म.अधि.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत निमखेड**

---

## जाहीर सुचना

सर्वत्र आम जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी खालील वर्णनातील स्थावर मिळकत **संजय रतनलाल शर्मा,** रा.सावता चौक, वलगांव रोड, अमरावी, ता.जि.अमरावती यांचेकडून विकत घेण्याचा सौदा करारानुसार निश्चित केला आहे. वर्णन येणेप्रमाणे-

**नोंदणी** पोट तुकडी, अमरावती शहर वि.कचेरीचे कक्षेतील व अमरावती मनपाच्या हद्दीतील मौजे रहाटगांव, प्रगणे नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.१९३/३ मधील लेआऊट कन्व्हर्शन मंजुर झालेला प्लॉट क्र.२ (दोन) याची साईज मंजूर नकाशानुसार असून याचे एकुण क्षेत्रफळ ४३४.६३ चौ.मी., (४६७८ चौ.फुट) आहे. यावर बांधलेल्या बहुमजली सदनिका **दि बेस्ट रेसिडेन्सी** मधील फ्लॅट क्र.१०४, पहिला माळा, बिल्टअप क्षेत्रफळ ३६.७९ चौ.मी. सुपर बिल्टअप क्षेत्रफळ ४९.४३ चौ.मी. याची चतुःसिमा- पुर्वेस - पॅसेज, पश्चिमेस - रस्ता, उत्तरेस - दुसऱ्याचे लेआऊट, दक्षिणेस - रस्ता

येणे प्रमाणे वर्णन असलेली स्थावर मिळकत वर कोणाचाही ताबा, हक्क, गहाण, बोझा, वारसाची भानगड, हितसंबंध, न्यायालयीन वाद इत्यादी असल्यास जाहीर सूचना प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांचे आत लेखी पुराव्यासह खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा. विहीत मुदतीनंतर कोणाचाही उजर ऐकल्या जाणार नाही, तसेच तद्नंतर माझे पक्षकार विहीत मुदतीत उपरोक्त स्थावर मिळकतीचे खरेदीखत नोंदवून घेण्यास कायदेशीररित्या पात्र/सक्षम राहतील, याची कृपया नोंद घ्यावी.

**अमरावती**
**दिनांक ०९.०३.२०२६**

पक्षकारातर्फे अधिवक्ता
(ॲड.वैभव वि.देशमुखे)
लक्ष्मीनारायण चौक, अमरावती
मो.९०९६९१६९८५

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.................. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **निमखेड** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **यासमिन बानो मोहम्मद युनूसं** अर्जात नमूद जन्म दिनांक **०७.११.१९७३** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **निमखे** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण ...................... हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) -----------------------------------------------.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) प्रल्हाद प.सिरसाट (सरपंच) | १) प्रल्हाद प.सिरसाट (सरपंच) |
| २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) | २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) |
| ३) पंकज नाना राऊत (पो.पा.) | ३) पंकज नाना राऊत (पो.पा.) |
| ४) जी.डी.फुटाणे (ग्रा.म.अधि.) | ४) जी.डी.फुटाणे (ग्रा.म.अधि.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत निमखेड**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.................. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **निमखेड** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **मोहम्मद तौसिफ मोहम्मद युनूस** अर्जात नमूद जन्म दिनांक **०४.०२.१९८८** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **निमखे** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) -----------------------------------------------.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) प्रल्हाद प.सिरसाट (सरपंच) | १) प्रल्हाद प.सिरसाट (सरपंच) |
| २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) | २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) |
| ३) पंकज नाना राऊत (पो.पा.) | ३) पंकज नाना राऊत (पो.पा.) |
| ४) जी.डी.फुटाणे (ग्रा.म.अधि.) | ४) जी.डी.फुटाणे (ग्रा.म.अधि.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत निमखेड**

---

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १८४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त



### छत्रपति शिवाजी महाराज जयंतीनिमित्त रुग्णांना फळवाटप

**कुऱ्हा-** संपूर्ण राज्यात नव्हे तर देशात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा उत्सव सोहळा हा मोठ्या दिमाखात साजरा केला जातो अगदीं थोरा पासून ते लहान मोठ्या सर्वांसाठीच हे गर्वाचे आणि स्वाभिमानाचे क्षण असतात.महाराजांची जयंती वर्षातून दोन वेळा साजरी केली जाते.छत्रपतींच्या तिथीनुसार जयंतीच हेच औचित्य साधून शिवसेना उबाठा पक्षाच्या तिवसा तालुका कर्यकरणीच्या वतीने शिवसेना ऊबाठा पक्षाचे तिवसा विधानसभा संघटक माजी पं.स.सभापती तथा ज्येष्ठ नेते श्री विलास माहुरे यांच्या प्रमुख नेतृत्वात एका विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.यावेळी जय भवानी जय शिवाजी छत्रपती शिवाजी महाराज की जय अश्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.त्यानंतर या सर्व मंडळींनी शहरातील सामान्य रुग्णालयात जाऊन तिथल्या रुग्णांची आपुलकीने भेट घेत त्यांना फळ वाटप केले.या प्रसंगी विलासराव माहूरे यांच्या सोबत दिलीपराव केने, शरदराव वानखडे, शरदराव इंगळे, अनीलभाऊ गावंडे, देवीदास निकाळजे, सुभासरव केवतकर,अनिल नांदणे,दिनेशभाऊ वानखडे, देवेंद्र आमले,सुनील आंबोरे,आकाश माहूरे, देवेंद्र निषांदार,बाळू भाऊ केचे यांच्या सोबतच असंख्य शिवसैनिक कार्यकर्ता मंडळी उपस्थित होते.



### अचलपूर येथे भ.बुद्ध मूर्तीची स्थापना

**अमरावती-** तालुका अचलपूर मधील बेगमपुरा येथील त्रिरत्न महिला मंडळ च्या वतीने तथागत भ. बुध्दाच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली असून त्यानिमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम भन्ते सारिपूत्त यांनी त्रीशरण, पंचशील घेऊन विधिवत मूर्तीची स्थापना केली. याप्रसंगी मंडळाच्या अध्यक्षा शिलाताई मोहोड, वर्षा तायडे, राजकन्या मोहोड, नैना तायडे, कृष्णा वानखडे, सुनील तायडे, गौतम सदानशिव, कैलास घडेकर,राजीव जाधव, बाबाराव वानखडे, व इतर बौध्द उपासक, उपासिका उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता भोजनदानाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनेक कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.



### पालकमंत्र्यांच्या हस्ते श्रूती तडस सन्मानित

**अमरावती-** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे आयोजित कार्यक्रमात यावली शहीद येथील श्रुती अरुणराव तडस हिची सरळ सेवा परीक्षा २०२५ मध्ये उत्तीर्ण होऊन जिल्हा लेखा व कोषागार कार्यालय अमरावती येथे कनिष्ठ लेखापाल पदी निवड झाल्याबद्दल पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते श्रुती तडस यांना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन महानगरपालिका अंतर्गत महिला व बालविकास विभाग द्वारा संचालित संत गाडगेबाबा प्रशासकीय प्रबोधिनी अभ्यासिका व ग्रंथालय यांनी केले होते.

# झेनिथ हॉस्पिटलने पुन्हा रचला वैद्यकीय इतिहास

## पहिला अत्याधुनिक लीडलेस पेसमेकर बसविण्यात यश

**अमरावती/का.प्र.**

शहरातील झेनिथ हॉस्पिटल येथे पुन्हा एकदा वैद्यकीय क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी नोंदवली गेली आहे. ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ डॉ. नीरज राघानी आणि त्यांच्या टीमने अमरावतीमध्ये पहिल्यांदाच अत्याधुनिक लीडलेस पेसमेकर यशस्वीपणे बसवला आहे. विदर्भ प्रदेशात अशा प्रकारची ही दुसरी प्रक्रिया असल्याचे मानले जात

ही प्रक्रिया ७६ वर्षीय पुरुष रुग्णावर करण्यात आली. या रुग्णाला यापूर्वी दुसऱ्या रुग्णालयात पारंपरिक पेसमेकर बसवण्यात आला होता. काही काळानंतर पेसमेकर बसवलेल्या जागी (खिशात) संसर्ग झाला आणि त्यामुळे गंभीर गुंतागुंत निर्माण झाली. त्यानंतर पुढील उपचारासाठी रुग्ण झेनिथ हॉस्पिटलमध्ये दाखल झाला.तपासणीनंतर डॉक्टरांच्या टीमने प्रथम संक्रमित पेसमेकर प्रणाली काढून टाकली. त्यानंतर रुग्णाला लीडलेस पेसमेकर बसवण्याचा पर्याय सुचविण्यात आला. या नव्या तंत्रज्ञानाबाबत रुग्ण आणि त्याच्या कुटुंबीयांना सविस्तर माहिती देण्यात आली. त्यानंतर त्यांनी उपचारासाठी संमती दिली.डॉ. नीरज राघानी यांच्या मते, या तंत्रज्ञानाचे अनेक महत्त्वाचे फायदे आहेत. या प्रक्रियेत छातीवर कोणताही चिरा किंवा व्रण राहत नाही. तसेच पेसमेकरच्या खिशात संसर्ग होण्याचा धोका अत्यंत कमी असतो.

लीड्स (तारा) नसल्यामुळे तारा तुटणे किंवा हलणे यांसारख्या गुंतागुंतींची शक्यता देखील कमी होते. ही प्रक्रिया तुलनेने सुरक्षित असून रुग्ण सामान्यतः लवकर बरे होतात. मात्र प्रगत तंत्रज्ञानामुळे या पेसमेकरची किंमत पारंपरिक पेसमेकरपेक्षा जास्त असते.



### पारंपरिक पेसमेकर म्हणजे काय?

ब्रॅडीकार्डिया ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये हृदयाचे ठोके नेहमीपेक्षा खूप कमी होतात. अशा वेळी रुग्णांना चक्कर येणे, थकवा जाणवणे, श्वास लागणे किंवा कधी कधी बेशुद्ध पडणे यांसारखी लक्षणे दिसू शकतात. अशा परिस्थितीत पेसमेकर बसवण्याची आवश्यकता भासते. पारंपरिक पेसमेकरमध्ये छातीच्या त्वचेखाली एक लहान उपकरण बसवले जाते. त्याला जोडलेल्या पातळ तारा (लीड्स) नसांद्वारे हृदयापर्यंत पोहोचविल्या जातात आणि त्याद्वारे हृदयाचे ठोके नियंत्रित केले जातात. डॉ. नीरज राघानी गेल्या १४ वर्षांपासून अमरावतीमध्ये पारंपरिक पेसमेकर रोपणाची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करत आहेत.

### लीडलेस पेसमेकरचे वैशिष्ट्य

लीडलेस पेसमेकर हे लहान कॅप्सूलसारखे उपकरण असते. हे मांडीतील रक्तवाहिनीद्वारे कॅथेटरच्या साहाय्याने थेट हृदयात बसवले जाते. या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे विशेष प्रशिक्षण डॉ. नीरज राघानी यांनी मलेशियामध्ये घेतले आहे. त्यामुळे ही प्रगत उपचारपद्धती आता अमरावतीमध्ये उपलब्ध झाली आहे. हे उल्लेखनीय आहे की, डॉ. नीरज राघानी अमरावतीमध्ये जटिल व नाविन्यपूर्ण कार्डिओलॉजी प्रक्रियांसाठी ओळखले जातात. त्यांनी येथे अनेक अत्याधुनिक प्रक्रिया यशस्वीपणे केल्या आहेत. यामध्ये ट्रान्सकॅथेटर तंत्रज्ञानाद्वारे हृदयाच्या झडपा बदलणे, शस्त्रक्रियेशिवाय झडप बदलणे तसेच ओपन हार्ट सर्जरी न करता जन्मजात हृदयातील दोष बंद करणे यांचा समावेश आहे. अमरावतीमध्ये झालेली ही यशस्वी लीडलेस पेसमेकर इम्प्लांटेशन प्रक्रिया हृदयरोग उपचार क्षेत्रातील एक महत्त्वाची कामगिरी मानली जात आहे. या प्रगत तंत्रज्ञानामुळे आता अमरावती आणि आसपासच्या परिसरातील रुग्णांना अत्याधुनिक हृदय उपचारांसाठी मोठ्या शहरांमध्ये जाण्याची आवश्यकता राहणार नाही.

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मैदानीखेळ महत्त्वाचे-डॉ.अनिल खांडेकर

**परतवाडा/वार्ताहर**



येथील भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय येथे वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेला क्रीडा महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांच्या हस्ते खो-खो मैदानाचे पूजन करून करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत क्रीडा स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर म्हणाले, 'विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबर क्रीडा अत्यंत महत्त्वाची आहे. क्रीडा महोत्सवाचे प्रास्ताविक वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रमुख प्रा.डॉ.प्रमोद गारोडे यांनी केले.प्रा. डॉ. प्रमोद गारोडे म्हणाले, 'महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही आपली क्षमता दाखवण्याची संधी मिळावी या उद्देशाने दरवर्षी क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग हीच या उपक्रमाची खरी यशस्विता आहे.या क्रीडा महोत्सवात खो-खो, गोळाफेक, धावण्याच्या स्पर्धा, बुद्धिबळ, स्लो-सायकलिंग, सिट-अप्स स्पर्धा, पुश-अप्स स्पर्धा, दोरीवरच्या उड्या, संगीत खुर्ची, तीन पायांची स्पर्धा, चमचा-लिंबू स्पर्धा, पासिंग-द-पिलो तसेच दंड-बैठक स्पर्धा अशा विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते.महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. सतीश भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली खेळ समिती सदस्य प्रा. डॉ. वंदना किल्लेदार आणि प्रा. सुमित घोगे यांनी स्पर्धांचे नियोजन व व्यवस्थापन केले. या स्पर्धांचे यशस्वी आयोजन झाल्याबद्दल प्रा. डॉ. सतीश भागवत यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवृंद तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाचे आभार मानले. खेळीमेळीच्या वातावरणात आणि विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण सहभागामुळे हा क्रीडा महोत्सव यशस्वीरीत्या झाला.

## सिकची रिसॉर्टमध्ये कृषी निसर्गोपचार थेरपी शिबिर

**अमरावती -** रोजगार निर्मितीसाठी वलगाव येथील सिकची रिसॉर्ट येथे सकाळी ९ ते ५ पर्यंत कृषी निसर्गोपचार मार्गदर्शन शिबिराचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज लोक विद्यापिठाचे महासंचालक डॉ. मंगेश देशमुख यांनी १४ मार्च रोजी केलेले आहे.

निसर्गात उपलब्ध असलेल्या औषधी वनस्पती (वन औषधी) याचा योग्य वापर करून आणि आहारात बदल करून निरोगी राहतात याच तत्वज्ञानाला अनुसरून मुंबईचे सुप्रसिद्ध डॉ. प्रशांत मुळीक नैसर्गिक शेती पद्धतीतून प्राप्त अन्नफळे, भाजीपाला याचा आहारात योग्य वापर करून हृदयविकार, कॅन्सर, मधुमेह, थायरॉईड, पॅरालिसिस, किडनीचे आणि श्वसनाचे इत्यादी अनेक रोग होऊ नये म्हणून शरीरामध्ये प्रतिकारशक्ती निर्माण करणेसाठी कृषी निसर्गोपचार थेरपी विकसित केलेली आहे. सदर कृषी निसर्गोपचार थेरपी ही रोजगार निर्मितीसाठी आणि निरोगी जीवन जगण्यासाठी कशी उपयुक्त आहे याबाबत डॉ. प्रशांत मुळीक मार्गदर्शन करणार आहेत. सदर शिबिराचा लाभ घेण्यासाठी आणि अधिक माहिती करिता नागरिकांनी मो. ९२८४८२३५२१ वर संपर्क साधावा असे आवाहन कुलसचिव, प्रा. गंगाधर नाखले, महात्मा फुले लोक विद्यापिठाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. प्रभाकर वानखडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# करिअर कट्टामध्ये आरडीआयके महाविद्यालय सन्मानित

**अमरावती/का.प्र.**



आर.डी.आय के महाविद्यालय यांना तिसऱ्या क्रमांकावर सर्वात्कृष्ठ महाविद्यालय म्हणून सन्मानित तसेच प्राध्यापक डॉ. एस. एम राठोड यांना अमरावती विभागातील उत्कृष्ठ तालुका समन्वयक म्हणून सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान व सहायता केंद्र यांच्या संयुक्त विभागाने आयोजित करिअर कट्टा या उपक्रमाद्वारे अमरावती विभागीय पुरस्कार वितरण सोहळा श्री शिवाजी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय अकोला, येथे विकसित भारत २०४७: महाराष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व उच्च शिक्षणाची भूमिका या एक दिवसीय विभागीय कार्यशाळेचे आयोजन वसंत सभागृहामध्ये करण्यात आले होते.

या मध्ये आर.डी.आय.के महाविद्यालयाला अमरावती विभागामधून तिसरा पारितोषिक मिळाला असून तसेच उत्कृष्ठ तालुका समन्वयक प्रथम पारितोषिक हे डॉ. एस. एम. राठोड यांना सुरेश राऊत सदस्य महाविद्यालय विकास समिती, डॉ. आर एम भिसे प्राचार्य शिवाजी आर्टस्, वाणिज्य आणि विज्ञान कॉलेज अकोला, यशवंत शितोळे अध्यक्ष महाराष्ट्र माहिती सहायता केंद्र, प्रमुख वक्ते प्राध्यापक डॉ. दिनेश खेडकर व उपस्थित सर्व सन्माननीय मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले, तसेच उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते प्राध्यापक डॉ. एस एम राठोड यांचा बी.ए. भाग एक तसेच विज्ञान व वाणिज्य शाखेत जि. ओ. इ. सि करिता इलेक्टिव्ह विषयावर आधारित इव्हेंट मॅनेजमेंट या पुस्तकाचे वितरण देखील करण्यात आले. हे पारितोषिक स्वीकारताना आर डी आय के महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. आर. डी. देशमुख तसेच करिअर कट्टा समन्वयक डॉ. अतुल पाटील, डॉ. एस. एम. राठोड. या यशाचे श्रेय हे संस्थेचे अध्यक्ष सन्माननीय डॉ.नितीन धांडे तसेच सचिव युवराज सिंग चौधरी तसेच कोषाध्यक्ष हेमंत देशमुख व महाविद्यालयाचे प्राचार्य यांना देण्यात आले.

# महिला दिनानिमित्त 'स्त्रीशक्ती वंदन' कृतज्ञता सोहळा उत्साहात

## डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात आजीवन महिला सभासदांचा भावपूर्ण सत्कार













**अमरावती/का.प्र.**

जागतिक महिला दिनानिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती येथे 'स्त्री शक्ती वंदन' हा कृतज्ञता सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या आजीवन महिला सभासदांना विशेष निमंत्रित करून त्यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोपटे देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला. तसेच महाविद्यालयातील कार्यरत महिला प्राध्यापक व कर्मचारी महिलांचाही सन्मान करण्यात आला.

महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा सन्मान सोहळा एक प्रेरणादायी व आगळावेगळा उपक्रम ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ होते.

व्यासपीठावर संस्थेच्या आजीवन महिला सभासद डॉ. सुशीलाताई मुरके, भाग्यरेखाताई देशमुख, पुष्पाताई बंड, शीलाताई अर्डर, साहित्यिक मुक्ताताई केचे, नीलांबरीताई देशमुख, कांचनमालाताई गावंडे तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वर्षा देशमुख यांची उपस्थिती होती.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या आजीवन महिला सभासदासह, संस्थेच्या अधीक्षक भावना गावंडे, अभियंता वृषाली वानखडे तसेच महिला प्राध्यापक व कर्मचारी महिलांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला.यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सर्व सत्कारमूर्ती महिलांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोपटे देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल करण्यात आलेला हा सन्मान विशेष लक्षवेधी ठरला.

सत्काराला उत्तर देताना आजीवन महिला सभासदांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, 'महिला दिनानिमित्त मिळालेला हा सन्मान आम्हाला अधिक प्रेरणा व बळ देणारा आहे.' यावेळी त्यांनी अनेक जुन्या आठवणींना उजाळा देत डॉ. पंजाबराव देशमुख व श्री शिवाजी शिक्षण संस्था यांच्यासोबत केलेल्या कार्याचा उल्लेख केला.

स्वागतपर भाषणातून प्राचार्या डॉ. वर्षा देशमुख यांनी आजीवन महिला सभासदांना महिला दिनाच्या शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

प्रफुल्ल घवळे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका मांडली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. राधिका देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. नेहा फांजे यांनी केले.डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष पुढाकार घेऊन या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. महिलांच्या सन्मानासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त करत प्राचार्या डॉ. वर्षा देशमुख यांचे विशेष आभार मानले.

### संस्काराचा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न- हेमंत काळमेघ



अध्यक्षीय भाषणात हेमंत काळमेघ यांनी सांगितले की, डॉ. पंजाबराव देशमुख यांनी ज्या उद्देशाने श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली, त्याच मार्गावर आपण कार्य करत आहोत. भाऊसाहेबांनी नेहमीच महिलांना समानतेची वागणूक देत त्यांना न्याय दिला. ज्या प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांना जिजामाता यांनी घडवले, त्याचप्रमाणे राधा आई यांनी भाऊसाहेबांना घडवले, असे सांगत त्यांनी त्या संस्कारांचा वारसा आजही श्री शिवाजी शिक्षण संस्थेत पुढे नेला जात असल्याचे नमूद केले. यावेळी त्यांनी आजीवन महिला सभासदांप्रति कृतज्ञता व्यक्त करत पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय येथील सर्व महिला शिक्षक व महिला कर्मचाऱ्यांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# आदिवासी बांधवांच्या प्रश्नांसाठी चिखलदऱ्यात बच्चू कडूंचा एल्गार

## सरकारच्या हस्तक्षेपानंतर मेळघाट संघर्ष महापदयात्रा स्थगित

**चिखलदरा/प्रतिनिधीः-** मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या मूलभूत प्रश्नांसाठी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी काढलेल्या शेतकरी कर्जमाफी आठवण व मेळघाट संघर्ष महापदयात्रेची सांगता आज (दि.९) चिखलदरा येथे झाली. हजारो आदिवासी बांधवांच्या उपस्थितीत झालेल्या या सभेमुळे चिखलदरा शहरात आंदोलनाचे वातावरण निर्माण झाले होते.

या आंदोलनाची दखल घेत राज्याचे मंत्री उदय सामंत, मंत्री प्रकाश आबीटकर तसेच माजी खासदार आनंदराव अडसूड हे चिखलदरा येथे आले आणि त्यांनी बच्चू कडू यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. या चर्चेनंतर सरकारकडून सकारात्मक भूमिका घेतली





जाईल, असे आश्वासन देण्यात आल्याने मेळघाट संघर्ष महापदयात्रा सध्या स्थगित करण्यात आली.

१ मार्चपासून सुरू झालेल्या या महापदयात्रेतून मेळघाटातील पाणीटंचाई, आरोग्य सुविधा, रस्ते, वीज, वनहक्क, रोजगार आणि शेतकरी कर्जमाफीसारख्या अनेक ज्वलंत प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधण्यात आले.

गावोगावी भेट देत स्थानिक नागरिकांच्या समस्या जाणून घेत बच्चू कडूंनी प्रशासनाला वारंवार इशारा दिला होता की, मेळघाटातील मूलभूत प्रश्नांकडे शासनाने तातडीने लक्ष दिले नाही तर संघर्ष अधिक तीव्र केला जाईल.

चिखलदरा येथे झालेल्या सांगता सभेला मेळघाटातील विविध गावांमधून हजारो आदिवासी बांधव उपस्थित होते. अनेकांनी हातात फलक घेऊन जोरदार घोषणाबाजी केली.

सभेत बोलताना बच्चू कडूंनी सांगितले की मेळघाटातील☞(पान २ वर)

### ■ उपमुख्यमंत्री शिंदेंचा बच्चू कडूंना फोन

दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बच्चू कडूंना दूरध्वनी करून आंदोलनाची दखल घेतल्याचे सांगितले. 'तुमच्या शेतकरी आंदोलनानंतर सरकारने समिती नेमली आणि ३० जून २०२६ पूर्वी कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला. मेळघाट संघर्ष यात्रेत मांडलेले प्रश्नही लवकर सोडवले जातील. तसेच स्काय वॉकचे कामही लवकर पूर्णत्वास नेले जाईल,' अशी प्रतिक्रिया शिंदे यांनी दिली.

### ■ मेळघाटवासीयांचा विश्वास तुटू देणार नाही- बच्चू कडू

सभेच्या शेवटी बोलताना बच्चू कडूंनी सांगितले की मेळघाटवासीयांनी आज मोठ्या विश्वासाने या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. 'मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या हक्कांसाठी हा संघर्ष सुरू झाला आहे. त्यांच्या प्रश्नांवर न्याय मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही. मेळघाटवासीयांचा विश्वास आम्ही कदापी तुटू देणार नाही,' असे त्यांनी ठामपणे सांगितले.

### ■ आम्ही बच्चू कडूंचे फॅन- मंत्री प्रकाश आबीटकर

सभेत बोलताना मंत्री प्रकाश आबीटकर यांनी बच्चू कडूंच्या संघर्षमय नेतृत्वाचे कौतुक केले. 'मी २०१४ पासून बच्चू कडूंसोबत आमदार म्हणून काम करत आहे. संघर्षातून उभ्या राहिलेल्या नेत्याच्या मागे मोठा जनसमुदाय असतो आणि तो जनसमुदाय बच्चू भाऊंनी कमावला आहे. म्हणून आम्ही त्यांचे फॅन आहोत,' असे आबीटकर म्हणाले. तसेच पुढील आठवड्यात बैठक घेऊन चुर्णी येथे उपजिल्हा रुग्णालय सुरू करण्याबाबत निर्णय घेऊ, आरोग्य सेवा देणाऱ्या भगिनींसाठी निवास व स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यासाठी आराखडा तयार करू.

# तलवार फिरवून दहशत करणारा सराईत गुन्हेगार पोलिसांच्या ताब्यात

## गाडगेनगर डी.बी. पथकाची धडक कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** जयसियाराम नगर परिसरात तलवार दाखवत नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला गाडगेनगर पोलिसांच्या डी.बी. पथकाने जेरबंद केले. आरोपीकडून लोखंडी तलवार जप्त करण्यात आली असून त्याच्यावर आर्म ॲक्टसह महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गाडगेनगर पोलिस ठाण्याचे डी.बी. पथक सोमवारी (दि. ९ मार्च) नियमित पेट्रोलिंगवर असताना गजानन बाबा चौक, जयसियाराम नगर येथे एक इसम तलवारीचा धाक दाखवून नागरिकांना घाबरवत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत छापा टाकला. कारवाईदरम्यान निक्कू उर्फ निखील राजू गायकवाड (वय २४, रा. शोभा



नगर, अमरावती) याला ताब्यात घेण्यात आले. त्याची तपासणी केली असता त्याच्याकडून सुमारे ५०० रुपये किंमतीची लोखंडी तलवार आढळून आली. पोलिसांनी☞(पान २ वर)

# अल्पवयीन विद्यार्थिनीच्या हत्येप्रकरणी आरोपीला जन्मठेप

## एकतर्फी प्रेमाचा विकृत शेवट -धामणगाव रेल्वेतील २०२० मधील खळबळजनक प्रकरण;

## -आत्महत्येच्या प्रयत्नाबद्दलही शिक्षा

**अमरावती/प्रतिनिधीः-** धामणगाव रेल्वे येथे २०२० साली घडलेल्या अल्पवयीन विद्यार्थिनीच्या खळबळजनक हत्येप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल देत आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश (क्र. ३) यशवंत आनंद गोस्वामी यांनी सोमवारी (दि. ९ मार्च) हा निकाल दिला.

या प्रकरणातील आरोपी सागर विठोबाजी तितुरमारे (वय ३५, रा. दत्तापूर, ता. धामणगाव रेल्वे) याला भारतीय दंड विधानाच्या कलम ३०२ अंतर्गत जन्मठेप व ५ हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. तसेच आत्महत्येचा प्रयत्न केल्याबद्दल कलम ३०९ अंतर्गत सहा महिन्यांचा साधा कारावास व ५०० रुपयांचा दंड सुनावण्यात आला. मात्र बलात्कार (कलम ३७६) आणि पोक्सो कायद्यांतर्गत आरोपांतून न्यायालयाने आरोपीची निर्दोष



मुक्तता केली.

विधी सूत्रांनुसार, फिर्यादीची मुलगी धामणगाव रेल्वे येथील एका शाळेत इयत्ता बारावीत शिक्षण घेत होती. आरोपी सागर तितुरमारे हा तिचा काही काळापासून पाठलाग करत असल्याचे समोर आले होते. १७ सप्टेंबर २०१९ रोजी आरोपीने विद्यार्थिनीला पळवून नेल्याची घटना घडली होती. दुसऱ्या दिवशी तिला☞(पान २ वर)

### ■ वैद्यकीय साक्षी ठरल्या निर्णायक

या प्रकरणात न्यायालयात एकूण १६ साक्षीदार तपासण्यात आले. काही साक्षीदार फितूर झाले असले तरी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या साक्षींना महत्त्व प्राप्त झाले. धामणगाव रेल्वे प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. आशिष सालनकर तसेच यवतमाळ येथील डॉ. विशाल येलके यांच्या साक्षींमुळे आरोपीने हल्ला केल्याचे स्पष्ट झाले. परिस्थितिजन्य व वैद्यकीय पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपीला दोषी ठरविले. या प्रकरणात सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड. दिपक मा. आंबलकर यांनी बाजू मांडली. त्यांना महिला पोलिस कॉन्स्टेबल अर्चना डांगे व पोलीस हेड कॉन्स्टेबल रोशन दुधे यांनी सहकार्य केले.

# मुंबई-अमरावतीपर्यंत ड्रग्जचे नेटवर्क

## ३ कोटींचे 'एमडी' ड्रग्ज प्रकरण, -अमरावतीत मोठे रॅकेट उघड

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर गुन्हे शाखेने अमरावतीत अमली पदार्थांच्या तस्करीवर मोठी कारवाई करत तब्बल ३ कोटी ११ लाख ८५ हजार रुपये किमतीचे 'एमडी' (मेफेड्रोन) ड्रग्ज जप्त केले. सुकळी–वाराणसी मार्गावरील लालखडी परिसरात रविवारी सायंकाळी सापळा रचून दोन संशयितांना अटक करण्यात आली. आरोपींकडून २ किलो ८० ग्रॅम एमडी पावडर, दुचाकी आणि मोबाईल असा एकूण ३ कोटी १२ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे शहरात कार्यरत असलेल्या मोठ्या ड्रग्ज नेटवर्कचा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

शहरात अमली पदार्थांविरोधात कठोर मोहीम राबविण्याच्या उद्देशाने पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली 'शून्य सहनशीलता' धोरण लागू करण्यात आले आहे. त्याच पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाला रविवारी (८ मार्च) गुप्त माहिती मिळाली. अब्दुल फहीम उर्फ फहीम एफ.बी. (२५, रा. आझाद नगर) आणि शेख अयान शेख रमजान (२०, रा. द्वारका नगर) हे मुंबईहून मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्ज खरेदी करून अमरावतीत विक्रीसाठी आणत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहितीची खातरजमा केल्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने सुकली–वाराणसी मार्गावरील लालखडी परिसरात सापळा रचला. सायंकाळी सुमारे ६ ते ७ वाजण्याच्या दरम्यान एमएच-२७/डीएन-७८८३ क्रमांकाच्या ॲक्टिव्हा दुचाकीवरून दोन्ही संशयित येताना दिसले. पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी संशय येताच शेताच्या दिशेने पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तत्काळ पाठलाग करून दोघांनाही वाहनासह ताब्यात घेतले. यानंतर दोन पंच आणि राजपत्रित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आरोपींची झडती घेण्यात आली.☞(पान २ वर)

# संसदीय कामकाजात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी महिलांना ५० टक्के आरक्षण लागू करा- आ. सुलभा खोडके

**अमरावती/प्रतिनिधी :-** वर्ष १९९४ साली महाराष्ट्र शासनाने पहिले महिला सर्वकष धोरण लागू केले. या धोरणानुसार प्रत्येक क्षेत्रात महिलांना निर्णयप्रक्रियेत सहभागी होता यावे , म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. त्या ठिकाणी महिलांना ५० टक्के आरक्षण लागू झाल्याने राजकारणातही महिला पुढे आल्या आहे. आता महाराष्ट्र शासन चवथे महिला धोरण आणत आहे. अशा परिस्थितीत लोकसभा व विधानसभा सारख्या संसदीय कामकाजात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी ५० टक्के आरक्षण लागू करण्याची लक्षवेधी सूचना अमरावतीच्या आमदार सुलभा संजय खोडके यांनी विधीमंडळासमक्ष केली.

आज राज्यविधीमंडळाच्या कामकाजा दरम्यान जागतिक महिला दिनानिमित्य महिला विकासाच्या धोरणांबाबत आ.सुलभाताई खोडके यांनी महिलांच्या आर्थिक सामाजिक , राजकीय विकासाबाबत चर्चा केली. आमदार महोदयांनी



सांगितले कि, महिलांचा सर्वांगीण विकासासाठी शासनाने धोरण ठरविले आहे. ज्यामध्ये महिलांना आत्मनिर्भर बनवून कुटुंबाबरोबरच समाजात महिलांची निर्णायक भूमिका वाढावी. व निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढवावा म्हणून महाराष्ट्राने महिलांना ५० टक्के आरक्षण लागू केले. त्यामुळे महिलांना प्रत्येक क्षेत्रात प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे. बँकिंग पासून ते संरक्षक दलापर्यंत महिलांनी मजल मारली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक असो , मग ग्रामपंचायत पासून ते महानगर पालिका , कृषी उत्पन्न बाजार समिती अशा सर्वच ठिकाणी ५०☞(पान २ वर)

## विभागीय लोकशाही दिनात तेरा प्रकरणांवर सुनावणी

# प्रलंबित प्रकरणांचा तत्काळ निपटारा करा-विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल

**अमरावती/प्रतिनिधीः-** विभागीय लोकशाही दिनात दाखल होणाऱ्या प्रकरणांवर विहीत कालमर्यादेत कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करणे तसेच संबंधित अर्जदारास केलेल्या कार्यवाहीबाबत अवगत करणे आवश्यक आहे. यानुसार प्रत्येक विभागाने त्यांच्याकडील प्रलंबित प्रकरणांचा तत्काळ निपटारा करुन प्रकरण नस्तीबध्द करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी



संबंधित विभागप्रमुखांना दिले. लोकशाही दिनात दाखल एकूण तेरा प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या. विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज☞(पान २ वर)

## विषय समिती निवडणूक होणार १७ मार्चला

### -मनपाच्या आमसभेमध्ये होणार ९-९ सदस्यांची नियुक्ती

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या पहिल्या आमसभेमध्ये स्वच्छतेच्या मुद्द्यावर घमासान झाले. विशेष सभेमध्ये स्वच्छतेचा मुद्दा गाजला. यानंतर आता येणारी आमसभा १७ मार्च रोजी होणार आहे.या सभेमध्ये ४ विषय समिती शिक्षण, शहर सुधार,विधी, महिला व बालकल्याण यांच्या ९-९ सदस्यांची निवड होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

पक्षनिहाय संख्या बळाच्या आधारावर हे नाव गटनेता सभापतीकडे देणार आहे. स्थायी समिती सदस्य प्रमाणे विषय समितीची ही निवडणूक घेतली जाते. पक्षनिहाय गटनेता हे आपल्या आपल्या पक्षाचे नाव सभापतीकडे दाखल करतात. सभापती☞(पान २ वर)

# भारताच्या विजयानंतर अकोलात तणाव

## फटाके फोडल्यावरून दोन गटात दगडफेक

### -४ अटक ,पोलिसांचा परिसरात तगडा बंदोबस्त

**अकोला/प्रतिनिधीः-** भारताच्या विश्वचषक विजयानंतर शहरात मोठा वाद उफाळून आला. फटाके फोडण्याच्या कारणावरून हा वाद झाला. या वादातून दगडफेक व वाहनांची तोडफोड करण्यात आल्याची घटना शहरातील हरिहर पेठ भागात रविवारी रात्री घडली. या घटनेनंतर पोलिसांनी दोन्ही गटावर परस्परविरोधी गुन्हे दाखल करून चार जणांना अटक केली. घटनास्थळावर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून सध्या परिस्थिती पूर्वपदावर आली आहे. टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडवर



मोठा विजय मिळवत विश्वचषकावर आपले नाव कोरले. या विजयाचा सर्वत्र जल्लोष साजरा केला जात आहे. भारताच्या विजयाला अकोल्यात मात्र गालबोट लागले. विजयानंतर फटाके फोडण्याच्या कारणावरून जुने शहर



भागातील हरिहरपेठमधील सोनटक्के प्लॉट आणि गाडगे नगर भागात दोन गटात मोठा वाद झाला. यात दोन्ही बाजूने एकमेकांवर मोठ्या प्रमाणात दगडफेक करण्यात आली. फटाके फोडण्यावरून☞(पान २ वर)

# पत्रकार सुरक्षा कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी-आ.संजय खोडके

## बाळशास्त्री जांभेकर योजनेची व्याप्ती वाढविण्याची विधानपरिषदेतून सुचना

**मुंबई/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्यातील प्रसारमाध्यमातील पत्रकार, व्यक्ती व कर्मचाऱ्यांच्या कल्याण व सुरक्षेच्या दृष्टीने शासनाकडून प्रभावी उपाययोजना व अंमलबजावणी होण्यासंदर्भात महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य आ.संजय खोडके यांनी राज्य विधिमंडळातून महाराष्ट्र शासनाचे लक्ष वेधले. राज्यात पत्रकार संरक्षण कायदा लागू झाला, हा कायदा पुरेसा सक्षम आणि चांगला असला तरी त्याची अंमलबजावणी होत नसल्याने तो आता कुचकामी ठरला आहे.त्यामुळे या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी,यासाठी शासनाने ठोस पाऊले उचलण्याची गरज असल्याची लक्षवेधी सुचना आ.संजय खोडके यांनी सभागृहात सादर केली.

राज्यविधीमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या



कामकाजात सहभागी होत असतांना आ. संजय खोडके यांनी सभागृहाला अवगत केले कि, शासनाने पत्रकारांना आर्थिक साहाय्य करण्यासाठी आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना लागू केली आहे. मात्र या संदर्भात शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागाकडे अनेक प्रस्ताव प्रलंबित आहेत. यासंदर्भात अजूनही अर्जाची पडताळणी☞(पान २ वर)

# महिलांनी 'सुपरवुमन' होण्याच्या नादात आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये - संजिता महापात्र

## महावितरणतर्फे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** महिला आपल्या दैनंदिन जीवनात कुटुंब, समाज आणि कार्यक्षेत्र अशा विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत असतात. निसर्गाने महिलांना अनेक गुण दिले असले तरी 'सुपरवुमन' बनण्याच्या प्रयत्नात स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ देऊ नये. महिलांनी सर्वप्रथम स्वतःला एक 'ह्युमन बिइंग' म्हणून ओळखून आपल्या आरोग्याला



प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन जिल्हा परिषद अमरावतीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी केले. जिल्हा नियोजन भवन, अमरावती येथे महावितरणतर्फे आयोजित जागतिक महिला दिन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महावितरणचे मुख्य अभियंता अशोक साळुंके होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध स्त्री कर्करोग तज्ज्ञ डॉ. भावना सोनटक्के, महापारेषणचे मुख्य अभियंता संजीव भोळे, अधीक्षक अभियंते दिपक देवहाते, दीपाली माडेलवार आणि प्रणोती देशमुख उपस्थित होत्या. यावेळी बोलताना संजिता महापात्र म्हणाल्या की, महिलांनी आपल्या वैयक्तिक☞(पान २ वर)